नगरसचिव विभाग

मा. महासभा सुचना क्र. ०६ दिनांक ०२/०२/२

मा. महासभा दि. ११/०२/२०१०

मा. महासभा इतिवृत्तांत दि. ११/१२/२००

प्रकरण क्र. ४२ ते ५३

०८/१०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०२/०२/२०१०.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०६, दिनांक ०२/०२/२०१०.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ----------------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरूवार दि. ११/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०२/०२/२०१० रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा सुचना क्रमांक ०६, दि. ०२/०२/२०१० सोबतची विषय पत्रिका
सभा गुरूवार दि. ११/०२/२०१०

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ४२ | दि. ११/१२/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** |
| ४३ | सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्य जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याचं उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे. |
| -- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| -- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ४४ | परिवहन समितीवर नगरसेवक किंवा बाहेरुन सदस्य घेणेबाबत धोरण ठरविणे बाबत विचार विनिमय करणे. |
| ४५ | राज्य ग्रंथालय परिषदेवर २ सदस्य नामनियुक्त करणे बाबत. |
| ४६ | आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम करिता जागा भूसंपादन करणेबाबत विचार विनिमय करणे. |
| ४७ | ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याबाबत. |
| ४८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनी मार्फत देखभाल व दुरूस्त करण्यात येत असलेले स्ट्रीट लाईट पोल मनपाच्या ताब्यात घेवून खाजगी ठेकेदारास वार्षिक ठेकापद्धतीने देखभाल व दुरूस्तीसाठी देणे व टाटा पावर कंपनीकडून वीज पुरवठा घेणेबाबत विचा विनिमय करून निर्णय घेणे. |
| ४९ | उत्तन येथिल घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्य अहवालानुसार शिफारशींची अंमलबजावणी करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणे. |
| ५० | केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत येणाऱ्या बस मार्गस्थ करणेच्या धोरणाबाबत. |
| ५१ | मिरा रोड येथिल रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकिय संस्थांना चालविण्यास देण्याकरिता विचार विनिमय होणेबाबत. |
| ५२ | मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज व सार्वजनिक सोईसुविधा करिता वापर करण्यात येणाऱ्या इमारतींना वाढीव चटईक्षेत्र मिळणेबाबत. |
| ५३ | शाळा आरक्षण बी.ओ.टी. वर विकसित करणेकरिता नियमावली ठरविणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०२ फेब्रुवारी, २०१०.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा दि. ११/०२/२०१० रोजी आयोजित केली आहे.
सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

**प्रश्न**

**२२. श्रीम. स्नेहा शैलेश पांडे मा. सदस्या यांनी दि. २०/१२/२००८ रोजी विचारलेला प्रश्न**

१. मिरा भाईंदर महानगरपालिकेत विविध कामाचे टेंडर काढण्याची काय प्रक्रिया आहे?

अ) जाहिर टेंडर नोटीस देताना किती रक्कमेची कोणत्या वर्तमानपत्रात निविदा दिली पाहिजे?

ब) महानगरपालिकेच्या काढलेल्या निविदा नोटीस महानगरपालिकेच्या दर्शनी भागात लावल्या पाहिजेत किंवा नाही? जर नियमाप्रमाणे लावली पाहिजे तर कोणत्या ठिकाणी त्याची व्यवस्था केली आहे?

क) स्थायी समिती सभा व महासभेत आर्थिक प्रशासकीय मंजुरी झाल्यानंतर किती दिवसात निविदा काढण्यात येतील?

ड) निविदा नोटीस महानगरपालिकेच्या दर्शनी भागात न लावल्यास कोणत्या नियमाखाली कोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई करता येईल?

**२३. श्रीम. कल्पना महेश म्हात्रे मा. सदस्या यांनी दि. १२/०१/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत महानगरपालिका जा.क्र.मनपा/जाम वि/०७/०७/२००८ निवीदा दिनांक २३/०४/२००८ खबरे आजतक बाबत.

अ) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना २ टाईम चहा, १ टाईम नास्ता व १ टाईम जेवण देणेबाबत निवीदा शिक्षण मंडळातर्फे काढण्यात आली होती. सदर निवीदा किती टेकेदारांनी भरल्या होत्या त्यांची नावे पत्त्यासह ?

ब) निवीदा भरलेल्यापैकी कोणत्या ठेकेदाराला निवीदा देण्यात आली होती ?

क) किती मुदतीकरीता व सध्या कोणकोणत्या शाळेत वरील पदार्थ दिले जात आहेत, किती विद्यार्थ्यांना?

ड) देण्यात येणारे खाद्यु पदार्थ चांगल्या स्वरुपाचे आहेत का ? कोणते अधिकारी पहाणी करीत आहेत ?

इ) आतापर्यंत साहित्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांना किती रक्कम देण्यात आली ?

**२५. श्री. संजय नारायण पांगे मा. सदस्य यांनी दि. ०४/०२/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१. जे.एन.एन.यु.आर.एन. अंतर्गत केंद्र शासनाचा व महाराष्ट्र शासनाचा ४१.४२ कोटी रुपयाच्या उपलब्धतेबाबत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. ३ कलम ८३ अन्वये महानगरपालिका निधीच्या खार्त जमा होणारा संपुर्ण पैसा आयुक्तांनी स्विकारणे व तो बँकेत ठेवणे ही जबाबदारी आयुक्तांची होती हे खरे आहे काय ?

अ) जे.एन.एन.यु.आर.एन. अंतर्गत प्राप्त झालेला निधी दि. २३/१०/०८ रोजी प्राप्त झाला व हा धनादेश ताब्यात घेण्याकरीता आपण दि. २२/१०/०८ रोजी मुख्य लेखाधिकारी यांना आपण संमती पत्र दिले होते हे खरे आहे काय ?

ब) सदरचा निधी आपणांस प्राप्त होणार होता. हे मागील किती दिवसापासून आपणांस अवगत होते ?

क) सदरचा धनादेश १२/११/०८ पर्यंत मुख्य लेखाधिकारी व लेखाधिकारी यांनी आपल्याच ताब्यात ठेवला हे खरे आहे काय ?

ड) सध्या हा निधी १०.५६% व्याजदराने फिक्स डिपॉजीट मध्ये ठेवला आहे हे खरे आहे काय ?

इ) सदरचा धनादेश १९ दिवस मुख्य लेखाधिकारी व लेखाधिकारी यांनी आपल्या ताब्यात ठेवल्याने महानगरपालिकेचे २२,७६,८५२/- एवढ्या रक्कमेचे नुकसान झाले आहे हे खरे आहे काय खरे असल्यास आयुक्त म्हणून आपण या संदर्भातील जबाबदारी आपण स्विकारणार आहात काय ?

ई) अधिकाऱ्यांमार्फत अक्षम्य हजगर्जीपणा दाखवून महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत आपण मुख्य लेखाधिकारी व लेखाधिकारी यांच्यावर कोणती शास्ती लादणार आहात. व वैयक्तीक त्यांच्याकडून सदरचा निधी वसूल करणार आहात काय ?

फ) आपणांस सदर प्रकरण ३०/१२/२००८ रोजी निदर्शनास आणून दिले. आजतयागत आपण यावर कोणती कार्यवाही केलीत ?

**२६ श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे मा. सदस्य यांनी दि. ०२/०२/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ७३४ ते ७४८ व मौजे मिरा सर्व्हे १९४ ते २१४, २५२, २५३ या भुखंडावरती शांतीनगर गृहसंकुल उभे राहीले असून यातील सेक्टर क्र. १ मध्ये प्राप्त माहितीनुसार ३४ इमारती (टॉवर) आहेत.

अ) या इमारतींपैकी किती इमारतींना मिरा भाईंदर मनपाच्या पाणी पुरवठा विभागातून अधिकृत नळजोडण्या देण्यात आल्या?

ब) नळजोडण्या देण्यात आल्या तो कालावधी?

इमारतींना भोगवठा दाखला प्राप्त आहे काय?

ड) उपरोक्त इमारतींचे सांडपाणी व मैला वाहून जाण्याकरीता महानगरपालिकेच्या गटारांना (भूमिगत) विना परवाना जोडण्यात आले आहे हे खरे आहे काय?

**२८ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. २१/०५/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) मा. स्थायी समिती सभा दिनांक ०१/०३/२००६ विषय क्र. २१२ ठराव क्रमांक २२३ विकास आकाराचे दर व भोगवटा दाखला प्राप्त न करता रहिवाशी व्याप्त इमारतींसाठी दंडनीय शुल्क निश्चित करण्यात आले होते. आज दिनांक ३ जुन २००८ पर्यंत किती विकासकांवर दंडनीय कारवाई करण्यात आली?

२) विकासकाचे नाव, ज्या प्रभागात बिल्डींग आहे त्या प्रभागाचे नाव व परिसराचे सिमारेषा?

३) एकूण किती दंडनीय शुल्क आतापर्यंत वसूल करण्यात आले आहे?

४) सदरचे काम कोणत्या खात्याकडून केले जाते?

**२९ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. २१/०५/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) मनपा/ जा.क्र. साबां/८६५/२००५-०६, दि. २८/१०/२००५ भाईंदर पश्चिम प्रभाग कार्यालय समोरील भाडेकरु इमारतीतील लोखंडी गज कापल्या बाबतच्या तक्रार केल्याचे मला पत्र दिले. सदर तक्रारीचे पोलीस ठाण्यातून तपासणीचे अहवाल आले त्यानुसार महानगरपालिकेने संबंधीत व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे काय? गुन्हा क्रमांक काय?

अ) पोलीस खात्याने महानगरपालिकेच्या तक्रारीची दखल न घेतली असल्यास त्यावर महानगरपालिकेने पुढील कार्यवाही काय केली?

**३० श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. २१/०५/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेची वेबसाईट आहे काय? असल्यास सदर वेबसाईटचे नाव काय?

अ) सदर वेबसाईटमध्ये कोणकोणता डेटा किंवा कामकाज बघता येते?

ब) वेबसाईट तयार करणाऱ्या संस्थेचे (कंपनीचे) नाव काय?

क) महानगरपालिकेने सदर वेबसाईटसाठी वार्षिक किती रक्कम कंपनीला किंवा ठेकेदाराला दिली?

**३१ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. २०/०६/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

अ) महानगरपालिका तर्फे धोकादायक बिल्डींग पहाणी कोणत्या खात्याकडून केली जाते?

ब) पाहणीसाठी एजन्सी नेमावी लागते किंवा महानगरपालिका तर्फे केली जाते काय?

क) धोकादायक बिल्डींग ठरवणाऱ्या एजन्सीला महानगरपालिका कोणत्या प्रकारे देय रक्कम दिली जाते व ती रक्कम धोकादायक इमारतीच्या मालकाकडून वसुल केली जाते काय?

ड) २००६-२००७/२००७-२००८/२००८-२००९ या वर्षातील धोकादायक बिल्डींगची यादी देणे.

**३२ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. २१/०५/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) आधिच विकासकर्त्याने बिल्डींग बांधताना बांधकाम मंजुरीपेक्षा जास्त चटईक्षेत्र वापरले असल्यास व त्यानंतर "टी.डी.आर." लोड करून सदर वाढीव क्षेत्र नियमाकुल करतात. नियमाकुल करताना तो जास्त वापरलेले चटईक्षेत्र बांधकाम अधिकृत किंवा अनधिकृत?

२) जास्त झालेले बांधकाम नियमीत करताना शासनाचे धोरण व नियम काय?

३) आतापर्यंत अशाप्रकारे किती प्रकरण रेग्युलाईज केले गेले? विकासकर्त्यांची सर्व्हे नंबर सह यादी.

४) यामधून महानगरपालिकेला किती महसुल २००८-२००९/२००९-२०१० पर्यंत मिळाला?

**३३ श्रीम. कल्पना महेश म्हात्रे मा. सदस्या यांनी दि. २९/०६/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) संजय गांधी निराधर अनुदान, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना महानगरपालिकेच्या कोणत्या खात्याकडून राबवली जाते?

अ) महानगरपालिकेतर्फे राबवण्यात येत नसेल तर शासनाच्या कोणत्या खात्याकडून राबवली जाते?

ब) महानगरपालिकेच्या आर्थिक तरतुदीमध्ये सदर योजनेच्या प्रचार / प्रसारासाठी आर्थिक तरतुद आहे काय? असल्यास आतापर्यंत या योजनेसाठी कोणकोणता प्रसार माध्यम महानगरपालिकेने वापरले आहे?

क) महानगरपालिकेतर्फे या योजनेसाठी लागणारी
  १) जातीचा दाखला
  २) रहिवाशी दाखला

३) दारिद्र रेषेखालील व्यक्ती म्हणून नोंद दाखला
४) ६५ वर्ष व त्याहून अधिक वयाच्या वृध्दांना दाखला
५) अंध अपंग, शारिरीक मानसिक रोगाने त्रस्त व्यक्तींना दाखला
कोणकोणत्या खात्याकडून दिले जातात?

**३४ श्री. डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०४/०७/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) नगरसेवको के प्रशिक्षण के लिए महाराष्ट्र शासन द्वारा स्विकृत सरकारी / अर्ध सरकारी / गैर सरकारी संस्थाए कौन कौनसी है?

२) इन संस्थाओं मे किस संस्था का स्तर सबसे अच्छा माना जाता है?

३) यशदा-पुणे मे महानगरपालिका बनने के बाद कितनी बार नगरसेवको को प्रशिक्षण हेतु भेजा गया?

४) क्या हर साल नगरसेवको को यशदा-पुणे मे प्रशिक्षण हेतु भेजना संभव नही है?

५) अगर हाँ, तो यशदा-पुणे में नगरसेवको को प्रशिक्षण हेतु भेजने की क्या तारीख निश्चित की गयी है?

**३५ श्री. डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०४/०७/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) विधी विभाग द्वारा पॅनल पर लिए गये वकील/काउन्सलर मिरा भाईंदर महानगरपालिका के लिए लडे गये मुकदमो की जानकारी विधी को कब तक देते है (दैनिक आधारपर या मासिक आधार पर या हर मुकदमे की तारीख के अगले दिन)

२) किस प्रकार देते है? (ई मेल द्वारा या लिखित रुप मे या मौखिक रुप से)

३) विधी विभाग इस सुचना को अपने रेकॉर्ड मे कब तक दर्ज कर लेता है?

४) क्या विधी विभाग इस सुचना को लॅपटॉप के माध्यम से नागरी सुविधा केंद्र मे प्रेषित करता है?

५) कोई भी निश्चित फैसला होने के बाद विधी विभाग संबंधित विभाग को सुचना मौखिक रुप से देता है या लिखित रुप से?

**३६ श्री. डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०४/०७/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

परिवहन विभाग की डी.पी.आर. के टेक्निकल कन्सल्टेन्ट के लिए स्विकृत की गयी ४० लाख की धनराशी के संदर्भ मे।

१) किस नियम के अंतर्गत उपरोक्त संदर्भ मे बिना टेंडर के ४० लाख की धनराशी मा. आयुक्त ने स्विकार की?

२) बृहन्मुबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका मे किस टेक्निकल कन्सल्टेन्ट को परिवहन की डी.पी.आर. रिपोर्ट बनाने को अधिकृत किया गया?

३) बृहन्मुबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका मे एस्टीमेटेड लागत कितना था?

४) बृहन्मुबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका मे सल्लगार को कितनी-कितनी फीस दी गयी?

५) बृहन्मुबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका मे दी गयी सल्लागार फीस कुल एस्टीमेटेड लागत का कितना प्रतिशत हुआ?

६) बृहन्मुबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका मे टेक्निकल कन्सल्टेन्ट द्वारा केंद्र सरकार से कितना बजट परिवहन के लिए पास हुआ?

७) बृहन्मुबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका मे दी गयी सल्लागार फीस कुल प्राप्त बजट का कितना प्रतिशत है?

**३७ श्री. डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०४/०७/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

१) इंद्रलोक परिसर मे ठेके के मजदुरो को दी गयी धनराशी के संदर्भ मे।

२) इंद्रलोक परिसर मे गिराई गयी बिल्डींग के स्क्रैप के संदर्भ मे।

अ) दि. १७/०६/२००९ की मा. महासभा मे उपरोक्त विषय अनुसार मैने और मा. नगरसेवक श्री. प्रफुल्ल पाटील ने यह बहेस की थी की मृत मजदुरो के प्रत्येक परिवार को ठेकेदार द्वारा कमसे कम १५ लाख रुपये मिलने चाहिए तभी महानगरपालिका द्वारा अतिरिक्त २ लाख की सहानुभुती राशी स्विकृत करनी चाहिए। इस विषय मे आपने हमारी भावना का सन्मान भी किया था व आश्वासन दिया था की ऐसा होगा।

ब) इसी मा. महासभा मे मा. प्रफुल्ल पाटील ने इस बिल्डींग के स्क्रैप की किमत करीब १८ लाख रुपये आँकी थी। इस स्क्रैप का क्या हुआ इसकी भी सुचना देनेकी कृपा करें।

**३८ श्री. डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०४/०७/२००९ रोजी विचारलेला प्रश्न**

| |
|---|
| विभिन्न कोर्टो मे मनपा द्वारा दायर किये गये मनपा केसेस के संदर्भ में। |
| अ) मनपा द्वारा दायर किये गये कितने केसेस हम हारे? |
| ब) किस-किस कारणो से मा. न्यायधिशने अपना निर्णय दिया? |
| क) उन कारणो पर विचार किया गया या नही? |
| ड) अगर नही तो क्यूँ? |
| इ) अगर हॉ तो क्या कारवाई की गयी? |
| **३९ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. ०१/०८/२००९ रोजी विचारलेला प्रश्न** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कारखाने व उद्योगधंदे नोंदणीकरण व नोंदणी शुल्क आकारणे बाबत. |
| १) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेले जून कारखाने व उद्योगधंदे आणि नव्याने उभारणी करावयाचे कारखाने उद्योग आस्थापना यांनी नोंदणीकरण व नोंदणी शुल्क आकारणी बाबत उपविधी तयार केली आहे काय? |
| २) केली असल्यास महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आली आहे काय? दिनांक व ठराव क्रमांक |
| ३) महासभेत मंजूर वरील उपविधी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली आहे काय? दिनांक जावक क्रमांक वरील शुल्क आकारणीसाठी |
| ४) उपविधी न करता महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेली व नव्याने उभारण्यात येणारे कारखाने व उद्योगधंदे यांचेकडून २००७-०८ / २००८-०९ वर्षात एकूण किती नोंदणी शुल्क आकारण्यात आले व कोणत्या नियमाप्रमाणे? |
| ५) उपविधी मंजूर न करता महानगरपालिका प्रशासक काळात किंवा महासभा यांना नोंदणीकरण व नोंदणी शुल्क आकारता येते काय? त्याचा कमाल किमान दर कोणते व किती मुदतीसाठी? |
| ६) आतापर्यंत १९९२ ते २००९, ३१ ऑगस्ट पर्यंत एकूण किती उद्योगधंदे व कारखान्यांची नोंदणी करण्यात आली. व सर्व्हे केला असल्यास सर्व्हेमध्ये किती उद्योग व कारखाने यांची संख्या प्राप्त झाली? |
| **४० श्री. मदन उदितनारायण सिंह मा. सदस्य यांनी दि. ११/११/२००९ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर नगरपरिषद तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात असताना आजतागायत पाण्या संदर्भात किती योजना राबवल्या गेल्या? |
| २) सदरच्या किती योजना कोणकोणत्या वर्षी राबविण्यात आल्या व कोणत्या वर्षी पूर्ण झाल्या? प्रलंबित असलेल्या योजना कधी पूर्ण होणार आहेत? तसेच प्रत्येक योजनेकरीता आजतागायत महानगरपालिकेचे तसेच शासनाचे किती रुपये खर्च झालेले आहेत |
| ३) आगामी योजना राबविण्याच्या योजना आहेत काय? व त्याकरीता निधीचे प्रयोजन केलेले आहे काय? |
| **४१ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. १२/११/२००९ रोजी विचारलेला प्रश्न** |
| दिनांक ०१/०१/२००५ ते आजपर्यंत. |
| १) महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडून वापर परवाना देण्यापूर्वी इमारतीचा वापर सुरु झाल्याचे आढळल्यास दंडनिय शुल्क घेण्यात येते काय? असल्यास कोणत्या नियमाखाली? |
| २) सदर बाबतच्या दंडनिय शुल्काचे दर काय आहे? त्यास मान्यता कोणी दिली आहे? |
| ३) नगररचना विभागाने आजपर्यंत अशाप्रकारे किती विकासकांकडून दंडनिय शुल्क वसूल केले त्याची नावे व रक्कम |
| **४२ श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल मा. सदस्य यांनी दि. १२/११/२००९ रोजी विचारलेला प्रश्न** |
| दिनांक ०१/०१/२००५ ते आजपर्यंत. |
| १) नगररचना विभागामार्फत वापर परवाना देताना रेन वॉटर हार्वेस्टींग व सोलार सिस्टीम बाबतचा अहवाल कोणत्या खात्याकडून तपासून दिला जातो? |
| २) आजपर्यंत असे अहवाल घेण्यासाठी किती प्रकरण संबंधित खात्यास पाठविण्यात आली? |
| ३) अशा प्रकरणात संबंधित खात्याकडून किती प्रकरणावर अहवाल नगररचना विभागास प्राप्त झाले? |
| ४) नगररचना विभागास प्राप्त झालेल्या किती प्रकरणा वापर परवाना देण्यात आला? |
| ५) महानगरपालिकेने आजपर्यंत किती वापर परवाने दिलेले आहेत? |

# मा. महासभा
# दि.११/१२/२००८
# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**मा. महासभा दि. ११/१२/२००८**

आज गुरुवार दि. ११/१२/२००८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १२ दि. ०१/१२/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता *महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली* भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | वैती चंद्रकांत सिताराम | विरोधी पक्ष नेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेलोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २०) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २१) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २३) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २४) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २५) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २६) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २७) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २८) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २९) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ३०) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| ३१) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ३२) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३३) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३४) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३५) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३६) | परेरा कॅटलीन ॲन्थोनी | सदस्या |
| ३७) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३८) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३९) | शर्मा भगवती | गटनेता |
| ४०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ४१) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४३) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४४) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४५) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४६) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४७) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४९) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ५०) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ५१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५२) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५३) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५४) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५५) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५६) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५७) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५९) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ६०) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ६१) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ६२) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६३) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६४) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६५) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६६) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६८) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६९) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ७०) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ७१) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७२) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७३) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७४) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७५) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७६) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | प्रकाश दुबोल | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| २) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |

**रजेचा अर्ज -**

| | | |
|---|---|---|
| १) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

(राष्ट्रीय गीत ''वंदे मातरम'' ने सभेला सुरुवात करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, सभा सुरू होण्यापुर्वी आजचे कामकाज सचिव म्हणून मी अजित पाटील साहेब पाहणार आहेत तर आपल्याकडे उपसचिव म्हणून श्री. राणे साहेबांना आपण कामकाज दिलेले आहे आणि निवडणूकीचे जे काही काढले आहे तरी ते आज सभागृहात हजर आहेत आणि आपण अचानक सचिव बदलण्याचे कारण काय? दुसरे असे की, मा. आयुक्त साहेब का हजर नाहीत त्याबद्दल प्रशासनाने खुलासा केला तर ते अधिक चांगले राहील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की सन्मा. विरोधीपक्ष नेते ह्या सभागृहात जो काही मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याचा मी प्रशासनाच्या वतीने खुलासा करतो मा. आयुक्त महोदय यांची तब्येत बरोबर नसल्यामुळे ते गेल्या ४ तारखेपासुन रजेवर आहेत. त्यामुळे त्यांच्यावतीने मी ह्याठिकाणी हजर आहे. सन्मा. नगरसचिव हे सुद्धा आजारी आहेत. आणि नुकतेच आय.सी.यु. तून घरी आलेले आहेत. आपल्या सर्वांच्या कृपेने आणि ते आजारी असल्यामुळे तसेच विशेष कार्यकारी अधिकारी तथा उपसचिव यांची देखील तब्येत बरोबर नाही म्हणून या आयुक्तांच्या परवानगीने उपसचिवांचे आजचे कामकाज मी अजित पाटील वर्ग-१ चे अधिकारी हे पहात आहेत.

**एस. ए. खान :-**

आयुक्त साहेब, त्या सर्वांची तब्येत बिघडलेली आहे तरी त्यांनी मेडीकल सर्टीफिकेट दिलेले आहेत का? एवढी तब्येत बिघडली आहे आणि त्यांनी रजा घेतलेली आहे. त्याचा खुलासा करावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्याचे कामकाज करण्यास असमर्थ असूनसुद्धा तिथे कामकाज कोणी चालवावे ही प्रशासनाची भुमिका आहे आणि ते आम्ही पार पाडत आहोत.

**एस. ए. खान :-**

मेडीकल सर्टिफिकेट दिलेले आहेत का?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. खतगांवकर साहेब मिरा भाईंदर महानगरपालिका महापौर चषक क्रिडास्पर्धा ही २००८ ची स्पर्धा आयोजित केलेली आहे आणि ह्या पत्रिकेमध्ये सर्व पक्षाचे निमंत्रण पत्रिकेमध्ये नावे आहेत परंतु आमच्याच पक्षाचे प्रथम आमदार यांचे नाव त्या पत्रिकेमध्ये दिसत नाही. त्याचा जरा खुलासा करावा त्यांचे नाव का वगळण्यात आले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने याबाबत खुलासा करतो.

**अनिल सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मा. खतगांवकर साहेब ही जी महापौर चषक क्रिडास्पर्धा आहे त्याच्यामध्ये आपल्या बजेटमध्ये किती प्रोव्हीजन आहे. २० लाख आहे तर तो महानगरपालिकेचा पैसा त्या पैशातुन आपण महापौर चषक क्रीडास्पर्धा आयोजित करतो. कॉंग्रेस पक्षाचे याठिकाणी ३३ नगरसेवक आहेत आउट ऑफ ७९ आणि आमचे ७ संयुक्त लोकशाही आघाडी. म्हणजेच एकूण ४० नगरसेवक संयुक्त लोकशाही आघाडीचे आहेत फिफ्टी परसेंट लोकांचे प्रतिनिधीत्व करणारी आमची संयुक्त लोकशाही आघाडी आहे आणि या शहराचे भुषण जे प्रथम आमदार म्हणून निवडून गेले एम.एल.सी. म्हणून मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसैन आणि त्यांच्या आमदार निधीमधून विकासाची बरीचशी कामे या शहरामध्ये झाली तरी तुमच्या सहीने ही पत्रिका निघालेली आहे तरी तुम्हाला असे वाटले नाही का की मा. आमदार साहेबांचे नाव असावे हा तुम्ही पन्नास टक्के लोकांचा अपमान करीत आहात असे तुम्हाला वाटत नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याबाबत मी खुलासा करतो ज्यावेळेस ही पत्रिका निघाली होती त्यावेळेस मी सुद्धा रजेवर होतो.

**अनिल सावंत :-**

तुमच्या नावाने निघालेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

निघू द्या ना. कामकाजाची पद्धत आहे. मी तुम्हाला सांगतो की, प्रत्येक वर्षाप्रमाणे महापालिकेच्या वतीने मा. महापौर चषक २००८ क्रिडास्पर्धा आपण आयोजित केलेला आहे. नुकतेच त्याचे उद्‌घाटन झालेले आहे. या अनुषंगाने ज्या अर्थसंकल्पीय तरतुद आहे त्या तरतुदीच्या आत खर्च करण्यात येत आहे. आणि ह्या कार्यक्रमासाठी मान्यवरांना उपस्थित राहण्यासाठी आणि कार्यक्रम पत्रिका निश्चित करण्यासाठी मा. महापौरांशी चर्चा झाली आणि मा. महापौरांनी जे धोरण निश्चित केलेले आहे त्याप्रमाणे ह्या पत्रिका प्रशासनाने तयार केलेल्या आहेत.

**अनिल सावंत :-**

मग मा. महापौरांनी सांगितले की मा. आमदारांचे नाव नको म्हणून त्या पत्रिकेमध्ये...

**एस. ए. खान :-**

आपण ज्या पत्रिका छापतो त्याचे धोरण काय?

**अनिल सावंत :-**

मा. खतगांवकर साहेबांनी सांगितले की, मा. महापौरांनी नावे निश्चित केली तर त्याच्यात मा. आमदारांचे नाव नसावे असे तुम्हाला वाटले का?

**मा. महापौर :-**

बघा पहिली गोष्ट अशी आहे की, ऑब्जेक्शन माझे नाही आणि अधिकार माझा असल्यामुळे मी नावे फिक्स केली मा. आमदार हुसैन साहेबांचे नाव नाही. आमदार पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेबांचे नाव नाही. ज्याप्रमाणे इतर कार्यक्रम् होतील त्यामध्ये आपण त्यांना नक्कीच आमंत्रित करू. ह्यामध्ये मी नावे ठरवलेली होती आणि माझ्या अधिकाराप्रमाणे मी त्यांना बोलावलेले आहे.

**अनिल सावंत :-**

पण आमदारांचे नाव नसावे असे का? परंतु ह्या मिरा भाईंदर शहराचे ते आमदार आहेत आणि ते या शहराचे आमदार आहेत हे तुम्ही अमान्य करतात का?

**जुबेर इनामदार :-**

पालकमंत्री गणेश नाईक साहेबांना तुम्ही वगळले असेल तुम्हाला चालत असेल....

**मा. महापौर :-**

मी वगळले नाही.

**जुबेर इनामदार :-**

आमच्या आमदारांचे नाव वगळले ते आम्हाला चालणार नाही. आणि आम्ही खपवून घेणार नाही आमचा स्पष्ट आक्षेप आहे. त्यांचा पालकमंत्री आहे त्यांना तसे चालत असेल.

**मा. महापौर :-**

माझा अधिकार होता त्यामध्ये कुठ कुठले नावे घ्यायची मा. सचिव साहेब दुसरा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

अधिकाऱ्यांचा दुरूपयोग करू नका.

**चंद्रकांत मोदी :-**

इसमे मा. संजिव नाईक साहब का नाम है।

**चंद्रकांत वैती :-**

सचिव साहेब एक मिनिट थांबा. तुम्ही या शहरामध्ये महापौर चषक पहिल्यांदाच होत आहे अशातला भाग नाही एकतर प्रथमतः सगळ्या शहरावासियांना असे वाटले की ठाण्याहून जे आयोजक मिनी मॅरेथॉन स्पर्धा घेतात. महापौर चषक स्पर्धा ही तेवढीच आहे. आज तुमची पत्रिका मिळाल्यानंतर आम्हाला असे कळते की मोठ्या प्रमाणात स्पर्धा आहेत मग स्पर्धा होत असतांना ह्याच महापालिकेला स्थायी समिती अस्तित्वात आहे. महासभा अस्तित्वात आहे. आजच्या सभेत दोन विषय घेतलेले आहेत. आजच्या सभेला तो विषय मान्यतेसाठी आणायला पाहिजे होता. याला अर्थिक प्रशासकिय कार्योत्तर मंजुरी घेणार का आपण काय प्रॉब्लेम झाला स्थायी समितीची आपण कधी घेतली.

**मा. महापौर :-**

स्थायी समितीने यापुर्वीच मंजुरी दिलेली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

कधी दिली.

**मा. महापौर :-**

आपल्या सन्मा. सदस्यांना विचारा मा. सभापती साहेबांना विचारा. ऑलरेडी आपण दिलेली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापतींनी सांगावे कधी मंजुरी दिली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण ह्या २० लाखाच्या तरतुदीमधून ८ लाखांची मंजुरी दिलेली आहे स्थायी समितीने.....

**चंद्रकांत वैती :-**

कुठच्या स्टँडींग समितीने दिली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

गेल्या वर्षीच्या.

**चंद्रकांत वैती :-**

गेल्या वर्षीच्या महापौर चषकासाठी दिलेली आहे. ह्या वर्षासाठी नाही.

**मा. महापौर :-**

गेल्यावर्षीच नाही त्यांचे म्हणणे आहे त्याचे गेल्यावर्षी त्याचे मागचे टर्म आर्थिक वर्ष हेच आहे. म्हणून त्यांनी गेल्यावर्षी असे सांगितले.

**चंद्रकांत वैती :-**

प्रशासनाकडून याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा व्हावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापतींनी याबाबत खुलासा केलेला आहे. त्यांनी गेल्यावर्षी हा जो शब्द वापरलेला आहे ते हे इलेक्शन सभापती महोदय होण्यापुर्वीच्या सभेत त्यांनी ते मान्य केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

चांगली आठवण राहिली मा. सभापती साहेबांना नाहीतर रहात नाही. ते कधी कधी विसरून जातात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, अभी जो विषयपत्रिका जो निकला है मैने पहिले ही बोला की भाईंदर मे लोकशाही की शुरूवात हो गयी है। इसके पहिले ही महापौर चषक हुए, इस बिल्डींग का उद्‌घाटन हुआ अनेक विषय आहेत. उस समय भी हमारे आमदार थे लेकीन कभी किसने आमदार का फोटो किसीने नही वापरा मेरी आपको रिक्वेस्ट है इनकी भावना, सभागृह की भावना समझके आगे आगे जो सन्मा. अतिथी है आमदार है यहाँ के महापौर है जो जो आ सकते है सबको आप समाविष्ट किजिए जो प्रथा बंद हुई उसको शुरू किजिए ऐसी मेरी सुचना आप ध्यान मे लिजिए।

**मा. महापौर :-**

ठिक है।

**जयंत पाटील :-**

मघाशी ॲडव्होकेट एस. ए. खान यांनी विषय काढला मा. आयुक्त साहेबांच्या बाबतीत मा. आयुक्त साहेबांनी रजेवर जाताना मा. स्थायी समितीची मंजुरी घेतली का? ३८ च्या (१) नुसार रजेवर जाताना स्थायी समितीची मंजुरी घ्यायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. आयुक्त हे काय दिर्घ मुदतीवर....

**जयंत पाटील :-**

नियमाप्रमाणे बोलत आहे की, दिर्घ मुदत शिवाय किंवा काय हे मला माहित नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते आजारी आहेत.

**जयंत पाटील :-**

त्यांनी ते स्टँडींग कमिटीला कळवायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी आयुक्त कार्यालयाकडून खात्री करून आपणांस तसे अवगत करतो.

**जयंत पाटील :-**

३ तारखेला स्थायी समिती झाली. मा. सभापती साहेब, इकडेच बसलेले आहेत आणि तुम्ही हंगामी आयुक्त बनू शकता. सरकार कडून असाही नियम ३९ मध्ये आहे. शासनाला आपण कळवायला पाहिजे की, मा. आयुक्त साहेब हे रजेवर आहेत म्हणून....

**प्र. नगरसचिव :-**

पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने विषयपत्रिकेचे वाचन करतो. या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा गुरुवार दि. ११/१२/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. १२, दि. ०१/१२/२००८ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराचा तास आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास आहे परंतु, सचिव साहेब, आजारी असल्याने कुठल्याही प्रश्नांना उत्तरे दिली गेलेली नाहीत. तर हा प्रश्नोत्तराचा तास पुढच्या सभेसमोर घेउ या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, गेल्या मिटींगला कातकरी समाजाचा विषय होता आणि बऱ्याचशा नगरसेवकांनी सांगितले की, माहिती अपुरी दिलेली आहे तरी पुढच्या मिटींगला हा विषय घ्या तरी ह्या मिटींगला तो विषय आलेला नाही.

**मा. महापौर :-**

त्यानंतर मा. आयुक्त साहेब, रजेवर गेल्यानंतर बरीचशी कामे विषय पेंडींग आहेत. पुढच्या मिटींगला नक्कीच घेउ.

**प्र. नगरसचिव :-**

आजच्या सभेला अनुपस्थित राहणेसाठी रजेची मागणी सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी केलेली आहे. आणि आजच्या सभेत लक्षवेधी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्याकडून आलेली आहे. आणि ती मी मा. महापौरांकडे सादर करित आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्याकडून लक्षवेधी आलेली आहे. एकच लक्षवेधी आलेली आहे आणि ती मी स्विकारत आहे. सचिव साहेब लक्षवेधीचे वाचन करावे.

**प्र. नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी लक्षवेधी सादर केलेली आहे. आणि ती मी सभागृहापुढे वाचून दाखवित आहे.

प्रति,
मा. महापौर सो.,
मा. नगरसचिव सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अनागोंदी कारभाराबाबत.

महोदय,

वरील विषयानुसार आपले तसेच संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाच्या कारभारात अनागोंदी पसरलेली आहे.

वृक्ष प्राधिकरण विभागाने काशिमिरा व काशिमिरा रोड येथे लावण्यासाठील मागवलेली झाडे त्या ठिकाणी न लावता तशीच भाईंदर पश्चिम इथल्या नर्सरीत पडून आहेत. तसेच झाडावर किड लागून झाडे मरुन जाऊ नये यासाठी औषधे, किटकनाशके मागवण्यात येतात. त्याबाबतचा रेकॉर्ड उपलब्ध नाही. औषधे किती मागवली, कुठे वापरली, किती वापरली ह्याचा रेकॉर्ड नाही. औषधे न मागवताच परस्पर बीले अदा केली जातात. काही महिन्यापूर्वी वन विभागाच्या नारळांच्या झाडांबाबत झालेला भ्रष्टाचार उघडकीस आला होता. त्याबाबतही महापालिकेने कोणतीही कारवाई केली नाही. नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर वन विभागाची माणेस हजर नसतात. मैदानावर होत असलेल्या माती भरावामध्ये देखील मोठा भ्रष्टाचार होत आहे. मैदानावर माती न टाकताच गाड्याची चलने सही करुन दिली जात आहेत त्याचा हिशेब नाही. अशा प्रकारचे अनेक घोटाळे ह्या वृक्ष प्राधिकरण विभागात झालेले आहेत. ह्या विभागात कसलाही रेकॉर्ड ठेवला जात नाही व त्याचा अहवाल देखील सदस्यांना दिला जात नाही.

सुदामा टाकीवर नर्सरीत किती झाडे लागवड झाली, ती कुठे नेवून लावली त्याचा रेकॉर्ड नाही. शहरामध्ये उद्याने आहेत त्यामध्ये किती माणसे काम करतात त्याचा हिशेब नाही. हजेरी लावल्यावर त्या ठिकाणी माणसे पोहोचतात का? त्यांची हजेरी कोण लावते? रोज माणसे किती येतात? तेथे ते काम करतात का? यावर कोणाचेही नियंत्रण नाही. रोजच्या रोज ठेक्याची किती माणसे येतात? ती रोज येतात का? त्यांची हजेरी कोण लावतो? रोज माणसे किती येतात? वन विभागाचे अधिक्षक श्री. ईरकर हे सकाळी रोज मुख्यालयात येतात ते चार वाजेपर्यंत इथे तिथे फार फिरत असतात. नगरभवन वन खात्यात कोणीही कर्मचारी वेळेवर हजर नसतो.

तरी ह्याची सर्व चौकशी मा. आयुक्तांनी करुन त्याचा अहवाल सुध्दा सभागृहाला देणे व महापौरांनी दोषींवर कारवाई करावी. तसेच ह्याबाबत मी सभागृहातर्फे मा. आयुक्त सो., ह्यांचेकडून वन विभागाची सखोल चौकशीची मागणी करीत असून त्यामध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

(मिलन पाटील)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, १७/०६/२००८ ला सुद्धा मी एक पत्र दिलेले आहे त्याचे सुद्धा मला अजुन उत्तर मिळालेले नाही. पुर्वी टॅक्स डिपार्टमेंटला हा अधिक्षक काम करत होता. पुर्वीचे आयुक्त म्हणजे शिंदे साहेब, त्यांच्या जावयाप्रमाणेच तो वागत होता. त्यांनी पुन्हा त्याला इथे आणलेले आहे. त्या अधिक्षकाचे काम काय असते त्याने काय करायला पाहिजे आजचे सुद्धा तुम्हाला मी उदाहरण देतो आज सुद्धा महापौर चषकाचे क्रिडांगणावर जे काम चाललेले आहे त्याचे काम आहे ते सर्व तयारी करण्यापासूनचे परंतु आज किती वेळ

झाला आपल्याला ८.०० वाजेचा टाईम दिलेला असताना त्याने काहीही पुर्तता केलेली नाही पाहूण्यासारखा तो तुमच्यासमोर खुर्चीत बसुन होता. तर अधिक्षक असा काय कामाचा आहे. आज झाडे तुम्ही तिकडे बघा दोन दोन तीन तीन वर्षे जाडबुंद झालेली आहेत. आपण लावलेली आहेत मेनरोड साठी, आज दोन वर्षे मेन रोड होउनसुद्धा एक झाड तिकडे लावले जात नाही आणि तिथे लोकांचे अतिक्रमणे होतात आणि एक झाड तिकडे लावता येत नाही. एवढे आपण झाडाच्या वृक्षरोपणासाठी पैसे खर्च करतो. तिन चार नर्सरी आहेत तरी कार नर्सरीचे काम होत असतात. किती झाडे लावली जातात एकदा तर मी यांना उंदीर मारायचे स्वतः आणून दिले होते. एक्सपायर झालेले तर हा अधिक्षक काय बघतो. तर एक्सपायर झालेली औषधे वापरतात. स्टेडीयमवर औषधे आहेत ते त्यांना माहित नाही. कुठली औषधे आहेत ती, झाडांना फवारणी होत नाही. फारच दुर्दशा झालेली आहे. आपण झाडे लावतो लाखो रूपये खर्च करतो. त्या खर्चावर सुद्धा आपली कामे ही पुर्ण होत नाहीत. आज मेनरोडला दोन वर्षात साहेब झाडांची पाच पाच फुटांची उंची वाढायला पाहिजे होती. आज तुम्ही गुजरात साईडच्या मेनरोडची झाडाची उंची बघा. आपल्याकडे असे एकसुद्धा झाड लावलेले नाही. तर हा अधिक्षक काय कामाचा आहे. कशासाठी त्याला आपण इथे ठेवलेले आहे. त्याला कुठलेही प्रकारचे ज्ञान (अक्कल) नसताना ठेवलेले आहे. आणि तो कीती औषधे आणतो किती कुठली औषधे आणतो किती माती आणतो त्याचे साधे व्हॅल्युएशन करता येत नाही. आपल्या स्टेडीयमवर माती किती लागणार आहे. अगोदर गार्डनकरिता माती किती मागवायची तसेच शेण किती मागवायचे ते त्यांना काहीच माहित नाही. त्याला समजत नाही तर तो वरिष्ठांकडून करून घेत असतो. सकाळी ११.०० वाजेपासुन ते ४.०० वाजेपर्यंत रोज मुख्यालयात बसून असतो तर त्याचे इकडे काम काय असते. कुठेही फिरत नाही. कुठल्याही नर्सरीकडे लक्ष देत नाही. साहेब सकाळी माणसे ७.०० वाजता येतात व ते ८.०० वाजता कामाला लागतात. एकदा सुदधा यांनी त्या माणसांकडे लक्ष दिलेले नाही. खरोखर ही माणसे ७.०० किंवा ७.३० वाजता येउन काम करतात किंवा नाही व ८.०० च्या नंतर ती जेवायला जातात ती माणसे खरोखरच काय काम करतात किंवा नाही नुसती त्यांना माणसे भरती करून द्या. १०७ माणसे १०८ माणसे नक्की कुठे कामाला जातात आणि रोजच्या रोज माणसे येतात किंवा नाही. कुणीही व्यवस्थित काम करत नाही. ११० रूपये प्रतिदिन आपण त्यांना पगार देतो. कमीत कमी आठ तासामध्ये त्यांनी चार तास तरी काम करायला पाहिजे. तरी माझी साहेब आपणांस अशी विनती आहे की त्या अधिक्षकाला काढून परत त्याला त्याच टॅक्स डिपार्टमेंटला टाका. नाहीतर मला याच्या पुढची स्टेप घ्यावी लागेल. जुना कोणी असेल त्याला तिथे बदली करावी.

**अनंत पाटील :-**

बऱ्याचशा गार्डनला धुप झाल्यानंतर माती टाकली जाते पुर्वी श्री. गणेश नाईक हे होते त्यावेळी कामगारांची व्यवस्था सुद्धा प्रत्येक गार्डनला करण्यात येत होती. आमच्या राई येथे क्रिकेटचे मैदान आहे. त्या मैदानावर सुद्धा बऱ्याच दिवसापासुन कामगार नाहीत. पाणी मारले जात नाही. झाडे ही तशीच आहेत आणि धुप झालेल्या पावसाळ्यानंतर त्याठिकाणी २५ गाड्या मी टाकण्यास सांगितले होते. तसेच मोर्वा येथे सुद्धा एक ग्राउंड आहे आणि अंतर्गत काही गार्डन्स आहेत. मातीचा भराव करण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार केला जातो. परंतु माती टाकली जात नाही. आणि झाडे ही सुद्धा मरत आहेत तरी या सर्व गोष्टीकडे लक्ष देण्यात यावे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सन्मा. नगरसेवक मिलन पाटील साहेबांनी जी सुचना मांडली त्याच्याशी मी सहमत आहे. कारण असे आहे की, गेल्या वेळेला एका पाच सहा महिन्यापुर्वी मी माझ्या प्रभागामध्ये वृक्षरोपणाचा कार्यक्रम हाती घेतला होता त्यावेळेला त्या वृक्षरोपणाच्या वेळी जी काही झाडे पाठवलेली होती किंवा माती पाठवलेली होती तर त्या झाडाची अवस्था अशी होती की त्याच्यामध्ये जीवच नव्हता व ती वाकडी तिकडी अशी होती. आणि लावताना सुद्धा ती तुटली गेली होती. त्यावेळेला वनविभागाचे अधिकारी जे होते त्यांना मी विचारले की अशी झाडे का? तर त्यांनी उत्तर दिले की, आमच्याकडे स्टॉक नाही. मग स्टॉक नव्हता तर ते आम्हाला सांगायला पाहिजे होते तर आम्ही हा कार्यक्रम हाती घेतला नसता. मातीचा स्टॉक नाही, खताचा स्टॉक नाही, झाडांचा स्टॉक नाही मग तुम्ही हे कशासाठी करतात मग आम्हाला त्यावेळेला सांगायला पाहिजे होते. की हा कार्यक्रम करू नका. आमच्याकडे रोपे किंवा झाडे ही अव्हेलेबल नाही. किंवा टी गार्ड नाहीत माती नाही. मग एवढा पैसा आम्ही खर्च करतो मग तो जातो तरी कुठे? सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी जी काही सुचना केलेली आहे ती खरोखर योग्य सुचना आहे आम्ही त्याच्याशी सहमत आहे. इकडे वनविभागाचे अधिकारी जर आलेले असतील तर त्यांनी त्याबाबत खुलासा करावा.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी मांडलेल्या लक्षवेधीला त्याच्यावर चर्चा करणे खरोखर योग्य आहे. मा. महापौर साहेब, साडेतीन कोटीचा वृक्षप्राधिकरणाचा बजेट आहे. वार्षिक बजेट आहे चाळीस लाख रूपये. आम्ही ठेके कर्मचाऱ्याकरिता वर्ग केलेले आहेत. हे ठेके कर्मचारी मा. आयुक्त साहेब, हा तुमचाच विषय आहे. कारण हा विभाग ही तुमचाच आहे. उपायुक्त खतगावकर साहेब योगायोगाने हा विषय आज ह्या महासभेसमोर आलेला आहे. तुमचाच विषय आहे तुम्हालाच त्याचे उत्तर देणे गरजेचे आहे. चाळीस लाख रूपये आपण खर्च करतो ठेके कर्मचाऱ्यावर तर सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी जे काही सांगितले ती सत्य

परिस्थिती आहे. सुभाषचंद्र बोस मैदानावर मी सुद्धा सकाळी वॉक करण्यासाठी जातो. कर्मचारी हे कामावर नसतात. चार कर्मचारी कामावर असतात. त्यांना एक गाडी माती टाकायला तर ती माती पसरवायला त्यांना आठ दिवस लागतात पुर्ण मैदानाची परिस्थिती स्वतः जाउन बघा. त्याला कारणीभूत हे अधिकारी असतात. इरकर आणि मेश्राम हे अधिक्षक होते. विशेष म्हणजे कोणाच्या मेहरबानीने त्याला सरळ अधिकारी करण्यात आला त्याला काहीतरी क्वालिफिकेशन पाहिजे तसेच त्याबद्दल काहीतरी माहिती पाहिजे. त्या कामासाठी त्यांना अनुभव हा असला पाहिजे. आम्ही बोलत नाही की त्याला त्या कामावरून काढा कदाचित त्याचे क्वालिफिकेशन असेल तर ती माहिती मी आता माहितीच्या अधिकारामध्ये मागणार आहे तो डिप्लोमा होल्डर, आहे की, डिग्री होल्डर आहे. त्या जागेकरिता त्याला ते काम देता येईल किंवा नाही. आम्ही मा. आयुक्त साहेब, असताना गेल्या महासभेमध्ये सुद्धा याबाबत चर्चा झालेली होती. त्यांनी मला त्यांच्या केबिनमध्ये सांगितले आणि शब्द दिला होता की, त्याच्यावर एक अधिकारी आम्ही नेमू. आणि दोघांना अधिक्षक म्हणूनच ठेवू आणि मुंबई शहरामध्ये अधिक्षक असतो आपल्या शेजारी असणारी मुंबई महानगरपालिका मोठे शहर तिथे अधिकारी वर्ग नाहीत. तिथे फक्त अधिक्षक असतो. एकाला अधिकारी केले की त्याला गाडी दिली, ऑफिस दिले त्याला कर्मचारी मिळाले तर त्याची काम करण्याची पद्धतच बदलून जाते. तो नैसर्गिक बदलाव हा ऑटोमेटिकली होतो. त्याच्याकरिता माझी मागणी आहे मा. महापौर साहेब, खतगांवकर साहेब, या विषयाबाबत बारकाईने लक्ष देवून तुमचा विभाग आहे हा निर्णय करावा लागेल. तुम्हाला त्याला परत अधिक्षक करा किंवा दुसरे कुठेतरी काम द्या. काहीच काम नसेल तर त्याला टॅक्स वसुल करायला पाठवा. बराचसा टॅक्स वसुल करण्याचा अजुन बाकी आहे. गरज आहे साहेब आणि भरपुर पैसा वृक्षप्राधिकरण समितीसाठी अर्थसंकल्पामध्ये देतो. आर्थिक तरतुद केली जाते. गरज आहे तिथे त्या पैशाचा वापर झाला पाहिजे. त्या अधिकाऱ्यांना त्या पैशाचा वापर करता आला पाहिजे. चांगला, शिकलेला तसेच त्याला कामाची जबाबदारी समजणारा अधिकारी तिथे नेमा ही माझी स्पष्ट मागणी आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

एक राहून गेले आहे की, जिथे प्रभागामध्ये माणसे पाठवतात आरोग्य विभागातर्फे की तिकडे २० माणसांचा एक ताफा असेल तर त्याठिकाणी २० माणसे तर नसतात जेमतेम १० माणसे असतात आणि १० माणसांबद्दल मुकादमाला विचारले की माणसे बाकीचे कुठे गेली तर मुकादम सांगतो की ही माणसे त्या गाडीवर पाठवली आज त्या इकडे पाठवली तिकडे पाठवली अशी कारणे सांगत असतो. मला तर असे वाटते की, तसेच मी असा आरोप करतो की जे कॉन्ट्रॅक्टर आहेत कॉन्ट्रॅक्टर आणि मुकादम यांचे मला वाटते सल्लामसलत झालेले असावे. कारण मुकादमला काहितरी नक्की केलेले असावे की, निश्चित रूपाने आम्ही तुम्हाला एवढे पैसे देउ आणि तुम्हाला जर विचारले तर तुम्ही त्याची माहिती घ्या की, कामाला माणसं आहेत आणि ती माणसं दुसऱ्या ठिकाणी कामाला पाठवलेली आहेत. हे असे मुकादम सांगतो. तरी आपण याची जरा चौकशी करावी कारण की मांणस २० असतात परंतु प्रत्यक्षात बघायला गेले तर माणस १० असतात. सन्मा. सदस्य मिलन पाटील खरोखर एक चांगली लक्षवेधी मांडलेली आहे. त्याचा आपण विचार करावा आणि याची चौकशी करावी असे मी आपणांस विनंती करतो.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आणखिन एक धक्कादायक बातमी मी आपणांस सांगतो की, अशी धक्कादायक बातमी आहे की त्याचे असे आहे की, वृक्षप्राधिकरणाची एक एन.ओ.सी. लागते. बांधकाम विभागाला एक वृक्षप्राधिकरणाची एन.ओ.सी. लागते हा महाशय सरकार हे बिल्डरकडे मागणी करतात. वृक्षप्राधिकरणाची एन.ओ.सी. मागणी करण्यासाठी गेले असता एक बिल्डरकडे या माणसाने फ्लॅटची मागणी केली तेव्हा मी तुम्हाला एक एन.ओ.सी. देतो. कॉम्प्लेक्समध्ये एन.ओ.सी. पाहिजे तर मला एक फ्लॅट दे. अहो धक्कादायक गोष्ट आहे. भले तो ३०० स्क्वे. फुटाचा असो, ५०० स्क्वे. फुटाचा असो साहेब तो जो बिल्डर आहे कारण बिल्डर हे नेहमी आमच्या सहवासात येत असतात. तो बोलतो की ह्या जुन्या लोकांनी काय कमविले हे कालचे आले त्यांना चार पाच वर्षे झाली नाहीत आणि ज्यांनी वीस पंचविस वर्षे ह्या नगरपालिकेत घालविले त्यांनी आजपर्यंत कोणाकडे फ्लॅट मागितला नाही. सांगावे अशा कोणीही बिल्डरने, आता ह्यांची एवढी मजल गेली एन.ओ.सी. करिता फ्लॅट. हाच गृहस्थ साहेब माझ्याकडे पाच हजार रूपये घेउन घरी आला होता त्याच काळामध्ये मी वृक्षप्राधिकरण समितीवर होतो.

**मा. महापौर :-**

मग त्यावेळी माहिती द्यायला पाहिजे होती ना.

**मिलन पाटील :-**

ऐका हा सकाळी ८-९ वाजता आला मला वाटले काहितरी कामासाठी आला असेल. कामाकरिता आल्यानंतर याने हळूच एक पाकिट काढले. सफेद आणि मला बोलला मिठाई आहे. मी बोललो किती आहेत त्याच्यात तर पाच हजार रूपये.

**मा. महापौर :-**

त्याच वेळी आपण रितसर तक्रार केली पाहिजे होती.

**मिलन पाटील :-**

यांची मजल कुठपर्यंत गेली ते बघा मी एक नगरसेवक आहे. माझ्याकडे १००-१५० लोक काम करतात. तुला काय १० हजार रूपये पगार आहे. परंतु माझ्याकडे असलेल्या अकाउंटंटला ३० हजार रूपये पगार आहे. विचार करून या माणसाने यायला पाहिजे होते.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मी आगोदर पासून उभी आहे मला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

ते अगोदर पासुन उभे आहेत त्यांना बोलून द्या त्यानंतर तुम्ही बोला.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब ने वनविभाग के बारे मे ठेके के बारेमे, मिट्टी के बारे मे जो अलग अलग समस्या उठाई है। पिछली बार वनविभाग की मिटींग मे मा. उपायुक्त साहब मौजुद थे और मैने उनको बताया था की, ठेके के मजदुर बारेमे बहुल बडी समस्या है वह क्या काम करते है और क्या नही करते है। और आरोग्य विभाग ने क्या किया है की हर नगरसेवक बोला है की भले ठेका जुना दिया हो लेकीन नगरसेवको को बोला है की हर नगरसेवक के इधर २० आदमी रहेंगे और हर नगरसेवक व्हेरीफाय कर सकते है। और आरोग्य विभाग के २० आदमी हमारे पास है और मैने सजेशन दिया था की सैम सिस्टम वन विभाग को दिया जाए ६० वनविभाग के कर्मचारी है उनके ठेकेदार पद्धतीसे काम होता है उनको हजेरी और जिम्मेदारी सिर्फ वनविभाग के सदस्य के हाथमे दिया जाए और वह उनको चेक करे मैने वनविभाग इसतरह का प्रस्ताव भेजा था और अभीतक अंमल नही हुआ है। क्योंकी आपकी सारी सिस्टम आपने आपकी हाथ मे रखी हुई है उसका आप भी सॅटेलाईट नही कर सकते हो। इसलिये हमको चिल्लाना पडता है। अगर वनविभाग के सात सदस्य को जो ठेकेदारके मजदुर है वह वनविभाग के सदस्य को बॉट देंगे और एक सदस्य हर महिने वह मजदुरोको हजेरी मेन्टेन करेगा और उसको व्हेरीफाय करेंगे और किसीको इस बारे मे बोलने की जरुरत नही पडेगी लेकीन आज तक मिटींग को ३०-३५ दिन हो गये है उसका जरा भी कारवाई नही हुई है। स्टॉक हॉकर्स मे नही है फिर आप कैसे कहते है की, हमारे वॉर्डमे पेड लगाने है चलो मे लगा लेता हु, नगरसेवक बोलते है लगा दो लेकीन मिट्टी नही है मिट्टी कहासे आयेगी लेकीन बाद मे सही करते है मिट्टी नही है तो पेड लगाये कहॉ से, भ्रष्टाचार मुद्दा खुला हो गया। यह सब बाते मैने वनविभाग के मिटींग मे चर्चा की हुई है। और अपने यहा महासभा चर्चा होती है लेकीन उसका अंमल नही होता है। अगर आप को चाहिए तो मेरे पिछे वनविभाग मिटींग चर्चा की नोट किजीए और कारवाई किजिए।

**मा. महापौर :-**

ठिक है। मॅडम बोला.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते की, श्री. गणेश पाटील वनविभाग खात्यात असतांना माणसे किती होती? आणि आता इरकर असतांना माणसे किती आहेत याची जरा आम्हाला माहिती द्या. कारण गणेश पाटील असतांना माणसे जास्त होती आणि इरकर आल्यानंतर माणसे कमी झाली. त्याच्यामुळे मला असे वाटते की वनविभागाचे काम थोडे थांबलेले असेल. त्याच्याबद्दल आम्हाला ह्या सभागृहात माहिती द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या आपण बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ऐसा लगता है की जब महासभा आती है, और जिसकी किसकी अधिकारोसे नही बना तो इसकी टोपी कैसी उडाने की ऐसी प्रथा इस महासभा चालू हूई है। मा. महापौर साहब, वृक्षप्राधिकरण के विषयपर नारीयल के पेड मे भ्रष्टाचार का विषय मै लाया था। नारीयल के पेडपर मा. खतगावकर साहब ने बोला जगह नही मिली इसलिए पडे हूए है। जो मैने नारीयल का पेड का विषय लाया इस सभागृह के सन्मा. नगरसेवकने मुझे बोला, इससे गोडाउन मे से शक्कर का गोणी चला जाता है नमक का गोनी बोल के क्यो तुम विषय लेते हो। और आज जो मालूम पडा की ऐसा विषय ही नही है, और पाच हजार पॅकेट घरमे आता है, दस हजार पॅकेट आता है एक विचित्र चिज इस सभा मे चल रही है, मा. महापौर साहब मै आपको बताता हू, बच्चो को संस्कार यह बचपन मे ही दिया जाता है। स्टँडींग का विषय था मा. आयुक्त ने १०५ कामगार इस वृक्षप्राधिकरण को मॉंगे मा. आयुक्त इस वृक्षप्राधिकरण के चेअरमन है। उन्होने अपनी टिप्पणी मे दिया, १०५ कामगार चाहिए ऐसे दिए। आप भी बजेट की चर्चा मे बैठे थे आपने यह बताया था की वृक्षप्राधिकरण के वर्कर को कम करने का मा. महापौर साहब आप यह विषय समझ लेना चाहिए। आपने बजेट के समय बोला था की बजेट मे थोडा हर खाते से थोडा थोडा कटौती करनी चाहिए। और जा वृक्षप्राधिकरण मे जो ठेकेसे बहारसे लाते है, हर डिपार्टमेंट मे जो प्युन है उनको कम करके वृक्षप्राधिकरणमे दिया जाए। आयुक्त महोदय १०५-१०७ कर्मचारी मांगे थे। हमारे सन्मा. सदस्य खान साहब ने १०७ नही १३२ कामगार चाहिए इसलिए

१३२ को मंजुरी दि। इनके सभागृह के नेता कटौती करो ऐसा विषय मांडते है। कहने का मतलब इस वृक्षप्राधिकरण का महत्वपुर्ण विषय है। एकबार गटार बांधकाम नही होगा तो चलेगा लेकीन इस शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी रखना चाहिए। तो पर्यावरण यह सबसे पहला मुद्दा है। लेकीन जिस पर्यावरण के चेअरमन आपके मा. आयुक्त है। और मुझे खास तौर पर यहापर जो अधिकारी लेखापाल है उनको पुछना है की, उनकी ड्युटी क्या है। यह जो काम चलते है और जो जादा काम होते है, वापस सरप्राईज व्हिजिट देनेकी उनकी ड्युटी है। एक जगह पर भी वह ड्युटी नही देते है। अगर वह सरप्राईज ड्युटी देते जाकर बांधकाम पर तो इस सभागृह मे इस तरह का विषय नही होता लेकीन नही, अभी मिट्टी का विषय निकाला २००६-२००७, २००८ उसी समय सुभाषचंद्र बोस मैदान मे पैतालिस लाख रूपये की मिट्टी की भरनी हुई। उसका हमने विषय निकाला चौकशी चालु है। उसके पहले सुभाषचंद्र बोस मैदान मे दस लाख मिट्टी भरने का ठेका इस स्थायी समितीने मंजुरी दिया। हमारे सन्मा. नगरसेवकोने विरोध किया दस लाखसे पाच लाख पर आ गया। आखिर आप क्या चाहते है। आखिर आपकी स्टॅन्डीग जो है जो स्टॅन्डीग सबसे बडी बॉडी है जो यहॉपर विषय आता है तो क्यो नही बोलते, विषय रखो ना की, हमने सुभाषचंद्र बोस मैदानमे दस लाखको कम करके पाच लाख की है हुई है। और बादमे विषय लानेका की इसमे भ्रष्टाचार हो गया फीर स्टॅन्डीग आप क्यो मंजूरी देते है। मा. महापौर साहब यह जो लक्षवेधी आयी हुई है। यह लक्षवेधी जितनी सक्त है उतनी अधिकारीओंको इस महासभा मे टार्गेट करनेका विषय है। और कुछ नही है। इसलीए इस विषय को आप गंभीरतासे लिजिए। मा. आयुक्त साहब चेअरमन है, मा. आयुक्त साहब उनके उपर इन्क्वायरी बैठाईए। आज सन्मा. सदस्य मिलन पाटील बोले कल मै बोलूंगा। नारीयल के १५०० झाड पडे हुए है, उनको लगानेका है यह भी एक विषय है। १५०० झाड नारीयल के गोडाउन मे पडे हुए है एक साल से उसका भी दस चर्चामे विषय होना चाहिए। झाड लगाने है की नही? हमने वो झाड खरेदा हुआ है।

**दिप्ती भट :-**

मा. महापौर साहेब, मी वन विभागामध्ये सदस्य होते त्यावेळेला मी प्रश्न केलेला की, वन विभागध्ये किती वर्कर आहेत म्हणून तर प्रत्येक वेळेला गणेश पाटील सुध्दा होते. त्यानंतर श्री. ईरकर सुध्दा होते. ते मला माहिती देणार म्हणून. परंतु, ती लिस्ट अजून आम्हाला दिलेली नाही आणि गार्डनमध्ये जी घास असते ते कटींग करण्याचे काम आरोग्याचे आहे की, वनविभागाचे आहे.

**मा. महापौर :-**

वन विभागाचे आहे.

**दिप्ती भट :-**

वन विभागाचे आहे तर आम्ही त्यांना सांगतो की ते म्हणतात की, आरोग्याचे आहे. त्यांना सांगा आणि आरोग्य विभागाला विचारले असता ते सांगतात की, वनविभागाचे आहे. तर त्यांनी काय आम्हाला असे नाचवायचे का? आणि दुसरे असे की सेक्टर नं. २ मध्ये .....

**मा. महापौर :-**

पण कुठल्या ठिकाणी घास.

**दिप्ती भट :-**

गार्डनमध्ये नगरपालिकेचे गार्डन आणि मी त्यांना आठ दिवसापूर्वी सुध्दा सांगितले व मा. आयुक्त साहेबांकडे सुध्दा कंम्प्लेट केली. ते बोलले की, मेश्राम आणि नागेश ईरकर वरती अजून तिसरा माणूस ठेवू या. म्हणजे ते व्यवस्थित काम होईल. पण एवढे सांगुन सुध्दा सेक्टर नं. २ मध्ये शांतीनगर मिरारोडमध्ये तिथे एवढी परिस्थिती गंभीर झालेली आहे की, तिथे नाग आणि नागीन दोघे फिरतात. तर तिथे मुलांना जर चावले किंवा काय झाले तर त्याची जबाबदारी नगरपालिका किंवा नागेश इरकर यांनी तसे लिहून द्या की, ती जबाबदारी तुम्ही घेणार आहात म्हणून आणि गार्डनमध्ये लाईट सुध्दा नाही. मैदानामध्ये सांगितले की पास झालेले आहे असे श्री. जानकर यांनी सुध्दा सांगितले. तरी तिथे पोलसुध्दा लावत नाही, घास कटींग सुध्दा करत नाही.

**मा. महापौर :-**

कुठले गार्डन आहे?

**दिप्ती भट :-**

सेक्टर नं. २ चा आहे. आपल्या महानगरपालिकेचा आहे. चार दिवसा अगोदर मी श्री. गणेश पाटील यांच्याकडे कंम्प्लेट करायला गेली. त्यांनी फोन केला रात्री साडे आठ वाजता, फायर ब्रिगेड आले ते सुध्दा बोलले की नाही मॅडम घास जोपर्यंत कटींग होत नाही तो पर्यंत आम्ही पकडू शकत नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सन्मा. सदस्य लक्ष्मण जंगमजी बोला.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, खतगावकर साहेब, विषय बघा. जरा गंभीर आहे आणि यांच्यावरती व्यवस्थित चर्चा व्हायला पाहिजे. सन्मा. जेष्ठ नगरसेवक मिलन पाटील यांनी सांगितले की आपण बाहेर ऐकतो. कोणाचे काहीतरी नडलेले असेल तर किंवा कुणी काही चुकीचे केलेले असेल तर तो लाच घेतो. पण आता या सभागृहामध्ये आणि उपस्थित अधिकाऱ्यांमध्ये आरोप झालेला आहे आणि सत्य परिस्थिती त्यांनी सांगितलेले आहे की, त्यासाठी लाच दिली जाते. या शहरामध्ये लाच देण्याच्या घटना घडलेल्या असतील. लोक विसरलेली असतील पण ही आज जी ऐकलेली घटना आहे. ही अतिशय गंभीर आहे. मला मा. महापौर साहेबांनी आणि मा. कमिशनर साहेबांनी आणि सर्व या सभागृहाच्या सदस्यांनी निश्चितपणे याचा निर्णय काहीतरी घ्यायला पाहिजे. यापैकी सत्यपरिस्थिती काय आहे, की नक्की कसे काय झाले? सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी म्हणतात की, सुडापोटी म्हणजे एका जणाने सत्यपरिस्थिती सांगितली. दुसऱ्या म्हणायचे सुडापोटी, कुठल्या तरी अधिकाऱ्यांवर सुड काढणे म्हणजे नक्की काय? तर याबाबत आपल्या स्तरावर योग्य चौकशी होत नसेल तर मला वाटते पोलीसांना त्याची चौकशी करु द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य सावंत साहेब बोला.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आज एक बरं आहे. महापौरांच्या डोळ्याला डोळा भिडवून कोणी बोलू शकणार नाही. यापूर्वी आपण एक सुचना केली होती की, एखादी लक्षवेधी असेल तर त्या लक्षवेधीची कॉपी सर्व सदस्यांना दिल्या पाहिजेत. तर आजच्या सभेमध्ये ती लक्षवेधीची कॉपी सदस्यांना दिल्या गेलेल्या नाहीत. मा. खतगावकर साहेब, मला एक खुलासा पाहिजे की, साडेतीन करोड रुपयाचा वृक्षप्राधिकरणाचा बजेट आहे. तर २००८-०९ मध्ये त्यामधील आजपर्यंत किती खर्च झाला? वृक्षप्राधिकारणाचा जो कर आहे तो आपण नागरीकांकडून वसुल करतो आणि त्याबदल्यात नागरीकांना सेवा द्याव्यात अशी अपेक्षा असते. आज जेष्ठ नगरसेवक मिलन पाटील यांनी केलेले आरोप हे अत्यंत गंभीर आहेत. या सभागृहामध्ये एखाद्या अधिकाऱ्यांवर आरोप होतात. आणि तो अधिकारी उपस्थित आहे तर माझी विनंती आहे. खतगावकर साहेब त्यांनी जे आरोप केलेले आहेत त्याचे स्पष्टीकरण किंवा आज इरकर काम करीत असतात, वृक्षप्राधिकरण अधिकारी म्हणून. तर कशाप्रकारे ते काम करतात, काय काम करतात? त्यांना काय डिफेकल्टी आहेत? कशाप्रकारे काम करु शकत नाही, कुठल्या कामामध्ये कमजोरी आहे? साडेतीन करोड रुपयाच्या बजेटमध्ये कुठच्या कमजोरी आहेत? तर त्या त्यांनी इरकर यांनी स्पष्टीकरण सभागृहामध्ये करावे अशी मी विनंती करतो.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, या ठिकाणी जी काही लक्षवेधी मांडण्यात आलेली आहे. सन्मा. जेष्ठ नगरसेवक मिलन पाटील यांनी जो काही आरोप केलेला आहे. विभागावरती माहिती देताना एखाद्या अधिकाऱ्यांवर वैयक्तिक आरोप करतात ही बाब चुकीची आहे. वैयक्तिक अधिकाऱ्यावर आरोप करतात तर अधिकाऱ्यांचे दोष सांगावेत. आरोप करतात डिपार्टमेन्टवरती आणि वैयक्तिक एखादा अधिकाऱ्यांची कुणाची तरी सुपारी घेउन वेगळ्या पध्दतीने बोलणे ही पध्दत ह्या सभागृहामध्ये चुकीची आहे. वैयक्तिक आरोप करायला वेळ असेल तर त्याचे वैयक्तिक सर्व दोष दाखवावेत. नाहीतर डिपार्टमेन्टचे दोष असतील तर डिपार्टमेन्टवरती बोलावे. आता या भाईंदरमध्ये झाडेच लावली नाहीत. अशा पध्दतीचे ॲलीगेशन केले डिवाइडर जे काशिमिरा रोड जो आहे त्याच्यावर पूर्ण झाडे लावलेली आहेत. पहिले आपण बी.ओ.टी. वर दिलेले होते. आता आपण एक-दिड वर्षापासून महापालिकेच्या ताब्यात घेतली तेव्हा ती झाडे जगली. आता आपण नर्सरी लावायला दिल्यात, बनवल्यात आणि जर लक्षवेधी विचारण्यापूर्वी त्या विभागामध्ये जाउन त्या सन्मा. जेष्ठ नगरसेवकांनी चौकशी केली का? त्या विभागामध्ये वरीष्ठांकडे पत्रव्यवहार वगैरे केला का? त्यामध्ये त्यांना उत्तर काय मिळाले? या सर्व गोष्टींची शहानिशा करुन जर दादच दिली नाही तरच लक्षवेधी आणायची. डायरेक्ट लक्षवेधी आणून सभागृहात कोणत्याही अधिकाऱ्याचे मनोर्धेर्य खचवणे ही पध्दत चुकीची आहे. आणि वैयक्तिक जर त्याने पैशाचा आरोप सन्मा. सदस्य जेष्ठ सदस्य आहेत. या मोठ्या सभागृहामध्ये पैशाचा आरोप करणे ही चुकीची बाब आहे. देत होता तर तेव्हा मा. कमिशनर साहेबांकडे तक्रार का केली नाही? ज्या दिवशी पैसे घेउन आले त्या दिवशी का तक्रार केली नाही. सभागृहामध्ये एखाद्या अधिकाऱ्याला बदनाम करण्यासाठी असा आरोप करणे चुकीचे आहे. या सर्व गोष्टींची शहानिशा करावी आणि त्यांचे म्हणणे आहे की, माती टाकली नाही. नर्सरी दिल्या नाही तर त्याचीही चौकशी करावी. कोण ठेकेदार होता त्याने माती टाकली नाही आणि मग त्याने बिले कशी काढली. जर त्याने माती टाकली नसेल तर ती बिले त्या ठेकेदाराकडून वसुल करावी. त्या ठेकेदाराने जर माती टाकली नसेल तर त्याबाबत चौकशी करावी. अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधी माझी आहे. सुपारी कोणी घेतली आणि कोंण आता सुपारी घेतल्यासारखे बोलत आहेत हे सर्व सभागृहाला माहित आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**मिलन पाटील :-**

सुपारी मिलन नाही. आपण अर्धी सुपारी आहोत. या सभागृहामध्ये आम्ही त्याचे आरोप खंडन करु शकतो. तो अधिकार आपल्याला नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, १५ ते २० दिवसापासून श्री. इरकर साहेबांना सांगत आहे की, जी झाडे आहेत त्यांना तरी पाणी टाका. तरी अजूनपर्यंत ते पाणी टाकत नाही. कारण जी काही जिवंत झाडे आहेत आणि जे सुध्दा झाडे मरत आहेत माझी आपल्याला व या सभागृहाला विनंती आहे की आपण इरकर साहेबांना तसे आदेश द्यावेत. इरकर साहेबांना मी वारंवार सांगत आहे की, त्या झाडांना पाणी टाका नाहीतर मी तुमच्या डोक्यावर पाणी टाकते.

**वर्षा भानुषाली :-**

मा. महापौर साहब, मै एक खुद वृक्षप्राधिकरण की सदस्या हूँ। जब हम मा. आयुक्त साहब के साथ एक बार गये थे फेरे पे जो अपना मिरा भाईंदर का इन्ट्री है, शिवाजी का पुतला है वहॉ पे हमने देखा तो झाड इतनी सुकी हुई हालतमे मिले थे और वहॉका जो प्लानिंग था वह सब टूटा हुआ था वहॉपे जो दो लॅम्प लगायो हुए थे वह भी टूटे हुए थे। अपना जो साडेतीन करोड रुपयोंका वृक्षप्राधिकारणका बजेट है तो उसमेसे अपना जो मिरा भाईंदरका इंट्री है जो भी पब्लिक आती है, मिरा भाईंदरसे इंट्री करती है तो आप उसको भी ठीकसे संभाल नही सकते। मा. आयुक्त साहब को हमने एक-एक चीज बताया हुआ था। इरकर साहब थे उनको भी हमने बताया था। उसको करीबन एक महिना होने को आ गया, उसके उपर आपने आजतक क्या किया? अभीतक कुछ किया क्या? हमने उसके बारेमे बोला हुआ था, जब पहिला मिटींग था, हमने बोला था की, पिछले साल का पुरा हिसाब हम लोगोंको भेजो। लेकिन अभीतक वह भी नही मिला।

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**उमा सपार :-**

मा. महापौर साहेब, माझ्या वॉर्डमध्ये जिथे जिथे झाडे लावा म्हणून लेटर दिलेले आहे. फक्त लेटर घेतात आणि ठेउन देतात. माझ्या वॉर्डमध्ये झाडे लावलेली नाहीत आणि आपण इरकर साहेबांना सांगा. माझ्या वॉर्डमध्ये झाडे लावा. आता कसे की उन्हाळा आला की मग काय फायदा? पावसाळ्याच्या आधी दिलेले लेटर आहे तरी अजुनपर्यंत माझ्या वॉर्डमध्ये झाडे लावलेली नाहीत.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. सन्मा. सदस्य प्रविण पाटीलजी बोला.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, मागच्या टर्ममध्ये मी वृक्षप्राधिकरणाचा सदस्य होतो. त्यावेळेला आपल्या अर्थसंकल्पामध्ये ट्री गार्डसाठी काही रक्कम आपण वर्ग केलेली होती. ट्री गार्डची डिझाईन वगैरे आम्ही डिसाईड केलेली होती. परंतु, आजपर्यंत माझ्या माहितीप्रमाणे ट्री गार्ड हे आलेले नाहीत. जे काही ट्री गार्ड लावले ते रिपेरिंग करुन लावले जातात. तरी आता खुलासा करताना मागचे ट्री गार्डसाठी जी रक्कम वर्ग केलेली होती त्याचे ट्री गार्ड तयार झाले किंवा नाही झाले त्याच्याबद्दल ती रक्कम नवीन ट्री गार्डसाठी आपण किती रक्कम वर्ग केलेली आहे ते खुलासा करताना आपण जरा सांगावे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, हा वृक्षप्राधिकारणाचा विषय ह्या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. मा. खतगावकर साहेब, हा जो विषय वृक्षप्राधिकरणाचा आहे यामध्ये मला वाटते उद्यान निरीक्षक दोन आहेत. एकाच जागेवर दोघांना नामनिर्देशित केलेले आहे. मला वाटते हा एरिया पण फार मोठा आहे. कामाकाज वाढलेले आहे. साडेतीन कोटीचा बजेट आपला वृक्षप्राधिकरणाचा आहे. मा. महापौर साहेबांना विनंती करतो की, आपण हे जर दोघांना विभागून जर दिले. श्री. मेश्राम आणि श्री. इरकर यामध्ये लोड कमी होईल आणि या शहराचे कामकाज चांगले होईल.

**स्नेहा पांडे :-**

अभी अभी सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहबने कहाँ की ट्री गार्ड के लिए हमने अर्थसंकल्प किया था। मै भी पिछली टर्म मे वृक्षप्राधिकारण की सदस्या थी। ३ जुन के वृक्षप्राधिकरण के मिटींगमे हम लोगोने ट्री गार्ड के लिए अर्थसंकल्प किया था। पुरा बारीश तक जब भी हम झाड लगाते है। ट्री गार्ड लगाने सिजन बारीश होता है। बारीश जाने के बाद ट्री गार्ड आनेका क्या मतलब है। और अगर नही आता है, अभी तो बजेट क्या होगा जो उन लोगोने ट्री गार्ड के लिए पास किए हुये थे।

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, संपूर्ण सभागृह सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्या लक्षवेधीवरती ही चर्चा सुरु असताना मिलन पाटील यांनी फार मोठे मन दाखविले आणि सगळ्यांना ह्या आजच्या चर्चेमध्ये सामील करुन घेतले. वास्तविक ज्यांची लक्षवेधी असते त्यांच्या मान्यतेनेच हे बोलू शकतात. परंतु, आजच्या ह्या एक वर्षाच्या कामकाजात वृक्षप्राधिकरणाकडून जे कामकाज चालले आहे त्या कामाबद्दल संपूर्ण सभागृह जे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे ७९ नगरसेवक आहेत अधिक जे स्विकृत नगरसेवक आहेत त्या सर्वाचा आक्षेप वृक्षप्राधिकरणाच्या कामाबद्दल दिसून आला. वाईटातून चांगली गोष्ट ही की सत्ताधाऱ्यांकडूनच आरोप होत आहे त्याच्याकडून चांगला प्रशासनाचा दावा केला जातो आहे. त्यांच्या माध्यमातून कळत आहे की, काशिमिरा इंट्री देखील आपली खराब आहे. प्रशासनाचे कामकाज किती उत्तम चांगले आहे त्याचे उत्तम उदाहरण सन्मा. जेष्ठ नगरसेवक फार अभ्यासु ओमप्रकाशजी, यांची नावे अजुन जर सापडलेली नाहीत. नारळाच्या झाडांबाबत महापालिकेने पोलिसांकडे तक्रार करावी कारण कित्येक महिन्यापासुन नारळाची झाडे शोधत आहेत ती आहेत किंवा नाहीत ते तरी सांगावे. आणि सभागृहामध्ये एखाद्या अधिकाऱ्यावरती अशा प्रकारचा आरोप होतो आहे. सन्मा. सभागृहाने सुद्धा काही गोष्टी ह्या मा. आयुक्त साहेबांच्या कानावर घातल्या पाहिजेत. त्या ह्या सभागृहात चर्चा न करता म्हणजेच पुढची कारवाई करणे योग्य होईल. आपल्याकडे घरचाच आहेर येतो आहे. एका बाजुने आरोप होतो आहे आणि दुसऱ्या बाजुने सुपारी घेतल्याची भाषा केली जाते. पुन्हा त्याचे खंडन केले जाते. महोदय, सचिव महोदय यांच्यात आपली मध्यस्थी व्हायला पाहिजे होती. लक्षवेधी आपण काही टाईम दिलेला असतो. त्यावेळेचा सुद्धा निर्बंध पाळला गेला पाहिजे. आणि प्रशासनाने यांच्यातुन काय शिकायचे आहे यांची जी वृक्षप्राधिकरणाची मिटींग लागते त्या सभेमध्ये सदस्यांनी केलेले जे आरोप आहेत तर आपल्याकडे जो काय कामचुकारपणा आहे त्याच्यात आपण कुठेतरी बदल केला पाहिजे. नसेल केला तर ह्या गोष्टीला संपुर्णतः सभागृहामध्ये नगरसेवक काम व्हावे या भावनेने बोलतात त्याचे आयुक्त हे अध्यक्ष आहेत. तर सर्वस्वी आयुक्त यांची चुक आहे. त्यांनी तो कारभार मा. खतगांवकर साहेबांकडे दिलेला आहे. खतगांवकर साहेब आपले नाकर्तेपण या गोष्टीतुन स्पष्ट होते. अशाप्रकारचे आरोप करण्यापर्यंत सभागृहाला कशाला संधी देतात?

**मा. महापौर :-**

मा. खतगांवकर साहेब आपण याबाबत खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश गाडोदिया यांनी सांगितले की, आम्ही स्थायी समितीमध्ये १३२ माणस केले. मा. आयुक्त ती माणस येत नाही तशी ही तक्रार आहे. १३२ माणस जर नेमली आहे तर शिवाजी पुतळ्याजवळ घास सुकलेले आहे तिथे सुद्धा ती माणसे काम करत नाही. माझे असे म्हणणे १३२ माणसे सँक्शन केले होते तर १३२ माणस आले. तर त्यांच्यापेक्षा आणखी काही जास्त आहेत का? तर ब्युटीफिकेशन होईल ना. ठेकेदार माणस पुरवत नाही.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी या ठिकाणी वृक्षप्राधिकरण कामकाजाच्या अनुषंगाने लक्षवेधी मांडलेली आहे. आणि सदरची लक्षवेधी आज सभा सुरू होण्यापुर्वी दोन तास ९.३० ते १०.०० वाजता आमच्याकडे आणून दिलेली आहे. त्यामुळे सन्मा. सर्व सदस्यांना ती लक्षवेधी सरक्युलर करता आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. मा. महापौर साहेबांनी सदरची लक्षवेधी स्विकारली असल्यामुळे सभागृहात चांगली चर्चा झाली मी सर्व मुद्यांची याठिकाणी उत्तर देउ इच्छितो परंतु प्रशासनाकडून माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, या शहराचे सार्वभौत्व लोकशाही प्रणालीचे एक अतिउच्च सभागृह आहे. आपण जे या ठिकाणी जे बोलतो त्याचे खुप गांभिर्य आहे. तर यापुढे व्यक्तीद्वेश, बिनबुडाचे आरोप जेष्ठ आणि सर्व सन्मा. सदस्यांनी एकमेकांवर करू नये. माझी प्रामाणिक कळकळीची विनंती आहे. कारण हा चेहरा आपण आपल्या नागरिकांसमोर घेउन जातो. आणि समाजाला एक वेगळे चित्र जे नको आहे ते बघायला भेटते. आणि आपल्या सर्वांचा विश्वास त्यामध्ये समाजात कमी होण्याची शक्यता असते. निश्चितच वृक्षप्राधिकरण कामकाजामध्ये दोन अधिक्षक आहेत आणि एक विभाग प्रमुख गणेश पाटील होते. सन्मा. आयुक्त शिंदे साहेबांनी श्री. गणेश पाटील यांची बदली केल्यानंतर एकाला वृक्ष प्राधिकरणाच्या अधिक्षकाला विभागप्रमुख म्हणून त्याठिकाणी नियुक्ती केलेली आहे आणि सन्मा. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये थोड्या प्रशासकिय अधिकाऱ्यांच्या नाकार्तेपणामुळे म्हणा किंवा एखाद्या ज्युनिअर अधिकाऱ्याला तात्काळ काम करण्याची संधी मिळाली याचाही यामध्ये क्रोष आहे. आणि मा. आयुक्त साहेबांनी आणि मा. महापौर साहेबांनी गेल्या वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या सुरूवातीलाच आपल्याकडे जे जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्युअल मिशनचे कामे येणार होते म्हणून उत्तन विभागाला जे अर्थसंकल्पीय कपात केली त्यामुळे जी निधीची तरतुद होती ती कमी प्रमाणात या विभागाला सुद्धा करण्यात आली होती आणि याठिकाणी चर्चेचे मुख्य कारण म्हणजे जो मॅनपॉवरचा आहे. आपल्याकडे गेल्यावर्षी या विभागामध्ये १४७ ते १६७ कर्मचाऱ्यांची मान्यता होती आपण कमीत कमी १४७ पर्यंतचे घेतलेले आहे आणि जास्तीत जास्त १६७ घेतलेले आहेत परंतु यावर्षी कपात करून १०७ पर्यंत तो मॅनपॉवरचा जो खाजगी करणातुन जी माणसे उपलब्ध करतो ते १०७ वर आणलेली आहे. साहाजिकच आपल्या सर्व विभागामध्ये गार्डन्स आहेत, स्मशानभुमी आहेत,

डिवाईडर्स आहेत आणि गेल्यावर्षी जो आपण मॅनपॉवर देत होतो तिन पाळीमध्ये आता महापौर मॅडम आहेत, पाटील साहेब आहेत त्या त्या ठिकाणी आम्ही तीन पाळीमध्ये माणसं देउ शकत नाही. ही आमची अडचण झालेली आहे. तोच मुद्दा रास्त या ठिकाणी मांडलेला आहे. मा. आयुक्त साहेबांकडे खान साहेबांनी यामध्ये माणस वाढवून द्यावी तोच मुद्दा मांडलेला आहे. १३२ पर्यंत अजुन १३२ संख्या मान्य केलेली नाही. १०७ वरच हे कामकाज करत आहोत त्यामुळे ही एक मॅनपॉवरची ओरड रहाणे अपेक्षित आहे. आणि यामध्ये वास्तविक इरकरकडे बी.एल.सी. अॅग्रीकल्चर ही डिग्री आहे. मा. आयुक्त महोदयांना अपेक्षा होती की ते तरुण आहेत त्याच्यावर कमान घेतील आणि वेगळे चित्र या विभागाचे ते निर्माण करतील पण हा विभाग मा. आयुक्त साहेबांनंतर माझ्या अधिपत्याखाली आहे मी सुद्धा यांच्या मध्ये खुप प्रयत्न केलेले आहे. पण सन्मा. विभाग प्रमुखांचे जे वर्तन आहे, बोलण्याची जी भाषा आहे त्याच्यामध्ये ती कामकाजात मोठी अडचण आहे. त्यामध्ये त्यांनी ती सुधारणा करावी. हा विभाग मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करून श्री. पानपट्टे साहेबांकडे दिलेला आहे. निश्चितच यांच्यामध्ये नारळाच्या झाडाची चर्चा होते, प्रदर्शनाची चर्चा होते ज्या विषयात जे गांर्भिय नाही त्याची चर्चा होते. मी सभागृहाला प्रामाणिकपणे सांगू इच्छितो नारळाची झाडे आपण या शहरामध्ये राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानच्या वेळेस आले होते. सन्मा. सोनी साहेब, सन्मा. धुमाळ साहेब त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले की हा खारपट्टीचा एरिया आहे हा समउष्ण आणि दमट वातावरणाचा भाग आहे. तुम्ही इंग्रजी आणि फॉरेनची झाडे या शहरात लावत असाल तर ह्या कोकणाचे वैभव तुम्ही नष्ट करत आहात. तुम्ही नारळाची झाडे लावा अशी त्यांची सुचना होती म्हणून गेल्या एक वर्षाच्या पुर्वी आम्ही तीन हजार नारळाची झाडे खरेदी केली होती. आणि एक धोरणात्मक आपण सर्व भागामध्ये मॅक्झीमम नारळाची झाडे लावावीत असे आमचे एक धोरण होते आणि दरवर्षी आपण तीन तीन हजार झाडे लावत गेलो तर आपले शहर जसे आपण मुंबई हायवेने जात असताना बोरीवलीच्या अल्हाद ब्रिजने जर आपण लेफ्ट साईडला गोरेगाव लागण्याच्या पहिले बघितले तर पुर्ण हिरवेगार वरून दिसते त्यापद्धतीने आपले शहर व्हावे अशी आमची छोटी कल्पना होती पण नारळाच्या झाडासाठी सन्मा. सदस्यांचे जितके अपेक्षित सहकार्य पाहिजे होते. झाडे लावण्यासाठी आम्ही खुप प्रयत्न केले परंतु, नारळाच्या झाडाला घुशी लागतात. हे एक कारण आहे आणि झाडांना फळ आल्यानंतर त्याचे जे वाद होतात हा मी कोकणातला नाही बाहेरचा आहे. हे एक मोठे कारण आहे. त्यामुळे आम्ही त्यात कमी पडतो. आजही आमच्याकडे जे वाद होतो नारळाच्या झाडांचा आम्ही ते अग्निशमन दलाचे तिथे होते. परंतु, तिथे अडचण होत असल्यामुळे आपल्या एम.आय.डी.सी. च्या नर्सरीमध्ये कोणीही जाउन बघू शकतात आताही तिथे ती झाडे आहेत. प्रश्न आहे की सदस्यांनी किंवा पदाधिकाऱ्यांनी समोर येउन ते लावून घ्यायचे. जागेच्या अभावी आपण ती झाडे लावू शकत नाही. आता ही तिथे झाडे आहेत. हे मी सभागृहाला प्रामाणिकपणाने सांगू इच्छितो आणि दुसरी बाब जी मातीच्या भरावाची आहे. आपण सॉल्ट डिपार्टमेंटशी सहकार्य करून गेल्यावर्षी माती भराव करून आपले स्टेडीयम निश्चित वाढवलेले आहे. त्यामध्ये ट्रीप, दोन ट्रीपचा इश्यु मी म्हणत नाही. परंतु ते काय आपण पुर्ण केलेले आहे आणि यावर्षी सुद्धा स्थायी समितीच्या मान्यतेने अजुन माती भरावाचे काम हाती घेतलेले आहे. आणि सुभाषचंद्र बोस मैदान हे आपल्या शहराचे भुषण आहे. परंतु, त्याला किती डेव्हलपमेंट करू ते कमी आहे. याठिकाणी जे ट्रीगार्ड बद्दल जी चर्चा झालेली आहे, मॅनपॉवरच्या मॅनेजमेंटबद्दल चर्चा झालेली आहे. तर आम्ही आपली स्मशानभुमी, आपली गार्डन्स आणि त्याठिकाणी पाळीत असलेले आपले कामगार याचा आम्ही चार्ट तयार केलेला आहे. निश्चित इरकर अधिक्षक यांनी तो तयार केलेला आहे. ५०० ट्री गार्डच्या निविदा आम्ही फायनल केलेल्या आहेत. वर्कऑर्डर दिलेली आहे. यावर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये जरी ३ कोटीची तरतुद असली तरी फक्त २८ लाखांचा खर्च आतापर्यंत झालेला आहे. का तर आपल्या वृक्षप्राधिकरणाच्यामध्ये आचारसंहिता ही लोकसभेच्या नंतर वृक्षप्राधिकरणाच्या निवडणूका आल्या सर्व सन्मा. सदस्यांना माहित आहे की ते कामकाज आपण करू शकलेलो नाही. आता उर्वरित काळामध्ये आपण ते सर्व काम करणार आहोत. या ठिकाणी ज्या इरकर बद्दल सन्मा. पाटील साहेबांनी जे आरोप केलेल आहेत वस्तुस्थितीबद्दल त्यांच्या भावना कोणत्या आहेत तरी त्यांच्याकडून वस्तुस्थितीबद्दल चौकशी करून त्या जर खऱ्या असल्या तर आम्ही निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई करू. परंतु, सन्मा. पाटील साहेबांनी सभागृहात ह्या भावना मांडण्याच्या पुर्वी शासनाच्या अँन्टी करप्शन ब्युरो डिपार्टमेंट आहे तिथे ते तक्रार करू शकले असते. पण आमच्याकडे आज मितीला जे विकासकाला एन.ओ.सी. दिल्या जातात. विकासकाला अंतिम जे ॲक्युपेशन सर्टीफिकेटच्या वेळेस वृक्षप्राधिकरण विभागाची जी एन.ओ.सी. अपेक्षित असते त्याला कोणती फी नाही. परंतु प्रत्येक सोसायटीमध्ये झाडे होणे हे अपेक्षित आहे. आपण जर असे गांर्भिय लक्षात न आणता त्याला जर आपण परवानगी दिली तर सार्वजनिक झाडे लावण्यामध्ये जो लोकांचा सहभाग आहे तो कमी होईल. म्हणून ते आपण आता कम्पलसरी केलेले आहे. आणि कुठलीही एन.ओ.सी. आमच्याकडे प्रलंबित नाही आणि त्याला एन.ओ.सी. ला कोणतीही फि नाही. फक्त स्कॉट फि च्या प्रमाणात त्यांनी झाडे लावलेली आहेत किंवा नाही याची खात्री करूनच ती एन.ओ.सी. दिली जाते. एखाद्या सोसायटीमध्ये जर झाडे नसतीलच तर ती एन.ओ.सी. दिली जात नाही.

**मिलन पाटील :-**

सोसायटीमध्ये नाही आर.जी. मध्ये....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सोसायटी आणि आर.जी. दोन्ही मिळून म्हणजेच टोटल बिल्डप एरियाला जे टाउन प्लानिंगचे मॉल्स आहेत त्यांची अंमलबजावणी केल्याशिवाय आम्ही एन.ओ.सी. देत नाही मा. आयुक्त आणि आम्ही ते कटाक्षाने पाळत आहोत. आणि निश्चितच अशा बाबत कुणाच्या ज्या काही वैयक्तिक तक्रारी असतील तर पानपट्टे साहेब किंवा आमच्याकडे केल्यास आम्ही निश्चित दखल घेउ. यामध्ये सन्मा. सदस्यांनी ज्या अमुलाग्र सुचना केलेल्या आहेत ह्या एक हफ्त्यामध्ये आम्ही त्याची अंमलबजावणी करून सभागृहाला अहवाल देउ.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अनिल सावंत साहेब, बसून घ्या.

**अनिल सावंत :-**

खतगांवकर साहेब, यांच्यामध्ये मेन अडचण होती की ही झाडे टोईंग केल्यानंतर टोईंग केलेली झाडे कुठे टाकायची हा एक प्रश्न फार मोठा वृक्षप्राधिकरण डिपार्टमेंटकडे जातो आहे. कारण ते कचऱ्याबरोबर टाकू शकत नाही. तर त्याच्यासाठी काम उपायायेजना आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सध्या तर ते आपण कचऱ्यामध्येच टाकतो.

**अनिल सावंत :-**

कचऱ्याच्या गाडीवाले ते घेत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मग तो जागेवरच आपण एक दोन दिवस ते सुकवतो आणि त्याची साईज छोटी झाली मग आम्ही त्याच्यात टाकतो ही एक अडचण आहे. त्याच्यासाठी नर्सरी ज्या आपण तयार करतो त्याठिकाणी कंपोस्ट खताचा निश्चित प्रयोग करून तो जो कचरा मिळतो लागू कचरा तो आम्ही त्याच्यात टाकतो.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, नगरभवनला परमनंट कर्मचारी आपले गार्डन्समध्ये काम करतात आणि ठेका पद्धतीचे कर्मचारी ऑफिसमध्ये अे.सी. ची हवा खातात मी याबाबत मा. आयुक्तांना कितीवेळा बोललो की जे ठेका पद्धतीचे कर्मचारी आहेत त्यांना बाहेर काढा आणि आपल्या परमनंट कर्मचाऱ्यांना आतमध्ये घ्या. त्याचा आपण का विचार करत नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जरा......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हात्रे मॅडमनी सुचना केलेली आहे ते लोक बाहेर काढून जे परमनंट आहेत त्यांना आत घ्यायला सांगितले आहे.

**नयना म्हात्रे :-**

ठिक आहे. धन्यवाद.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब यांनी आरोप केलेला आहे की इरकर काय फ्लॅट मागितला होता त्याबद्दल खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

त्यांनी खुलासा केलेला आहे.

**शरद पाटील :-**

आता उपायुक्त साहेबांनी चांगली सुचना आणि चांगले शिक्षण आम्हांला दिले. ह्या नगरसेवकांना आपण स्वतः आपआपल्या आरोप करु नका, चांगले बोलले पण त्यांनी जी लक्षवेधी मांडली आहे त्याच्यात त्यांनी जो आरोप केला आहे तर त्यावर कार्यवाही झाली पाहिजे व चौकशी झाली पाहिजे. परत माझ्या इकडे एक गार्डन्स आहे त्याबद्दल मला बोलायचे आहे खेळणेबद्दल आपण ज्या ठेकेदाराला ठेका देतो तो ठेकेदार ती खेळणी कमजोर दर्जाची असतात आणि परत ती रिपेअरीग होत नाही. इरकर साहेब जर त्या मुद्यावर आहेत तर त्या गार्डनमध्ये चक्कर मारली पाहिजे आणि तिथे विजीट दिली पाहिजे आणि व्हिजीट दिल्यानंतर त्या गार्डनमध्ये काय कमी आहे हे त्यांनी करायच असेल तर त्यांची गरज नाही.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, यांनी पुर्णपणे आपले मत मांडलेले आहे आणि गंभिर आहेत आपणांस मी थोडीशी माहिती देतो. एकूण आपला बजेट ३ करोडचा आहे. साधारण आपण जो पगारामध्ये खर्च करतो ठेकापद्धतीने तो साधारण ५० लाख रूपये. अडीच करोड रूपये आपण माती आणि नविन झाडांसाठी वापरत असतो. माझ्या माहितीप्रमाणे खतगांवकर साहेब आपण रोजची २० गाड्या माती आणली आणि २५ हजाराची झाडे आणली तरी रोज २५ हजार रूपयाची झाडे आणली तरीही चालत आलेले आपले वर्षे आणि नक्कीच मला माहित आहे.

आपण रोजची २५ हजार रूपयाची झाडे आणली तरी ही चालत आलेले आपले वर्षे आणि नक्कीच मला माहित आहे. आपण रोजची २० गाडी माती आणत नसतील आणि २५ हजार रूपयाची रोजची झाडे त्याकडे आपण विशेष लक्ष घालावे. आपली वृक्ष प्राधिकरण समिती आहे. परत एकदा त्याच्यामध्ये व्यवस्थित बैठक लावा. कुठल्याप्रकारची झाडे वाढविता येतील आणि झाडे लावण्यासाठी पण एक कालावधी असतो. त्याच कालावधीमध्ये ती झाडे लागली पाहिजेत. नाहीतर आपण आता झाडे लावायला जाणार नक्कीच जे जगणार नाहीत त्याची आपण काळजी घ्यावी दुसरे सर्वात मोठे जे हजेरीचे आहे. सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांनी प्रश्न उपस्थित केला की किती कर्मचारी कामावर जातात आता ११० कर्मचारी म्हटल्यानंतर ठेका पद्धतीने आपण घेतले प्रत्येकवेळेला गेल्यानंतर ते कधीच नसतात आणि १०० आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत ते आपले उद्याने आणि प्ले ग्राउंड बघतात. कर्मचारी सुद्धा माझ्या माहितीप्रमाणे एखाद्या वेळी पुर्ण येत नसतील आता आपण ते अटेंडन्स सिस्टम लावले होते की, पंचिग मशिनने हजेरी घ्यावी. आता आपण फायबर ऑप्टीकलची निविदा ऑलरेडी निविदा मागवलेली आहे. ज्याठिकाणी आपण ह्या अटेंडन्स घेतो ती मशिनपण त्याठिकाणी कलेक्ट करावी म्हणजेच तुम्हाला कोणीही फसवू शकत नाही. लपवू शकत नाही. कर्मचारी आला किंवा नाही त्याचीसुद्धा आपण काळजी घ्या. नगरभवनमध्ये जिथे आपण अटेंडन्स घेतो तिथे आपण मशिन लावावी आणि आपल्या महापालिकेला रोजच्या रोज अटेडन्स भेटतील कुठेतरी दिसले होते की इरकर हे असक्षम अधिकारी आहेत, कुठेतरी आपण त्यांच्यावर सक्षम अधिकारीच्या तपास करुन सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करावी. आणि बाकी जे आरोप झालेले आहेत त्याच्यावरही मा. आयुक्त साहेबांनी माहिती द्यावी व नियमाप्रमाणे कारवाई करावी आणि या विषयावर लक्ष वेधून दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, माझा एकच प्रश्न आहे. त्याच्यावर फक्त एवढेच विचारा की, या वर्षी संपूर्ण मिरा भाईदर शहरामध्ये वृक्षारोपण किती ठिकाणी झाले? किती लोकांची पत्रे होती आणि नगरसेवकांची पत्रे होती तर किती ठिकाणी वृक्षारोपण झाले?

**मा. महापौर :-**

काढावे लागेल. अजुनही आपण एक सुचना केली जसे आपण नगरसेवक निधीसाठी पत्र देतो तर सर्व सन्मा. सदस्य जे आहेत त्यांना एक पत्र द्यावे की, त्यांच्या वॉर्डात कुठ कुठली झाडे कुठे कुठे लावायची आणि त्याप्रमाणे ती झाडे लावण्यात यावीत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, याबाबत सांगु इच्छितो की, मी मा. कमिशनर साहेबांच्या समोर मा. कमिशनर साहेब स्वतः बोलले की, याचे पत्र आहे की नवघर शाळेमध्ये वृक्षारोपण करावे विचारावे आपण इरकर यांना त्याच्यासामोर मला हेच म्हणायचे होते. सरळ शिवाय मा. कमिशनर साहेब त्यांना ऑर्डर करतात त्यांच्या केबिनमध्ये बसून तर ते किती फॉलो करतात. कमिशनर साहेबांना, नगरसेवकांना करत नाही परंतु मा. कमिशनर किती फॉलो करतात. मला माझ्या प्रश्नाचे उत्तर हवे की, किती जणांच्या वॉर्डात वृक्षारोपण झाले ते जरा त्यांना विचारा.

**मा. महापौर :-**

सर्व सभागृहाने लक्ष वेधून दिले आहे की, वृक्षप्राधिकरणाचे कामकाज व्यवस्थित चाललेले नाही झाडे व्यवस्थित लागत नाही. त्यासाठी आपण निर्णय घेतलेला आहे आणि मा. आयुक्तांनी नक्कीच ही कारवाई करुन पूर्ण अहवाल आपल्याला सादर करावा.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब आपण यांचे पूर्ण असे रुलिंग दिलेले नाही आता मी जी लक्षवेधी मांडली सर्व पक्षांच्या लोकांनी त्याच्यावर आरोप केलेले आहेत सर्व पक्षांच्या लोकांनी पोटतिडकीने सर्व काही बोललेले आहेत. सर्व लोक बोलतात त्यांच्या सर्व नगरसेवकांचा आदर करुन आज आमची हीच मागणी आहे की, तो त्या पदाचा लायक माणूस नाही. इतर ठिकाणी बदली करावी.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी तसे नियमाप्रमाणे करावे असे सांगितले ना. ठिक आहे सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८४ दि. १९/०७/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब हे इतिवृत्तांत बघा, जुलैचे आज येत आहे. म्हणजेच सहा महिन्यानंतर मागे सुचना देउनसुध्दा ७-८ मिटींगचे अजून मिनिट्स बाकी आहे. काय अडचण आहे त्याच्यामध्ये प्रत्येक वेळेस तुम्ही आदेश देता त्याचे पालन होत नाही.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, यापुढे मा. महासभेमध्ये झाले होते की, प्रत्येक महिन्याचे जास्तीत जास्त एक महिना ॅप देउन प्रोसिडींग आली पाहिजे. याची जरा काळजी घ्यावी आणि पुढच्या मिटींगमध्ये सर्व प्रोसिडींग येतील ाची व्यवस्था करावी.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, पान क्र. १० मध्ये अर्जीच्या जागा असे म्हंटले आहे. प्रत्येक ठिकाणी त्यांनी अर्जो केलेले आहे. त्या ठिकाणी आर.जी. असे पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, पान क्र. ४५.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, यामध्ये ना फेरीवाला क्षेत्राबद्दल जी चर्चा चालु होती त्यावेळी शंकर नारायण कॉलेजकडे जाणारा जो रस्ता आहे. हनुमान मंदिर ते एस. एन. कॉलेज हा आपण ना फेरीवालामध्ये दाखविलेला आहे आणि नंतर पान क्र. ३५ वर सभागृह नेते ह्यांनी आपली अशी बाजु मांडली की, संध्याकाळी लोक बसतात, सकाळी लोक बसत नाही. तरी आपण ते फेरीवाला क्षेत्र करा आपण खाली रुलिंग दिलेले आहे की, हा फेरीवाला क्षेत्र करा. त्याचे काय झालेले आहे? तर त्या ठरावामध्ये काय झालेले आहे म्हणून.....

**मा. महापौर :-**

फेरीवाला क्षेत्र.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही. या ज्यावेळेला आपण ठराव दिलेला आहे. ठरावामध्ये क्लिअर लिहलेले आहे ना फेरीवाला क्षेत्र आणि ठराव वाचतानाही ते झालेले आहे. मग नंतरची रुलिंग कशी काय आली?

**मा. महापौर :-**

ती नंतर सुचना मांडण्यात आलेली आहे. ती स्विकारलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमच्या त्या सुचनेला विरोध होता अशी तुम्ही सुचना सांगितली नाही. असे तुम्ही सांगितलेसुध्दा नाही की कुणाचा त्याला विरोध आहे का? शंकर नारायण कॉलेजचे ७ हजार विद्यार्थी तिकडे शिकायला जातात. अगोदर सांगण्यात आले होते की, तिकडे फेरीवाला बसायला नको पाहिजेत आणि आता तुम्ही तिकडे फेरीवाला क्षेत्र घोषीत करतात. मग तिकडच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले तर त्याला कोण फेस करणार?

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, अशी कंडीशन आहे की, १०० मीटरच्या आतमध्ये एज्युकेशन असते किंवा मंदिर असते.......

**जयंत पाटील :-**

त्या प्रभागाचे प्रतिनिधीत्व आम्ही करत आहोत. मुळात तो ठराव झाल्यानंतर त्याची सुचना मांडली गेली. त्या ठिकाणी २ ते ३ हजार लोक दररोज परचेसिंगला येतात. भाईंदर पूर्व विभागाला कुठेही मार्केट नाही. लोकांना मार्केटची व्यवस्था करणे हे आमचे कर्तव्य आहे. आणि जेव्हा ती व्यवस्था होईल तेव्हा त्यांना हटवावे मलाही ते मान्य आहे आणि कॉलेज संध्याकाळी ५.०० ते ५.३० ला सुटते आणि मार्केट बहुतेक हे संध्याकाळीच असते. मलाही मान्य आहे कॉलेजचे प्रचंड विद्यार्थी कॉलेज सुटल्यानंतर बाहेर येतात. मी त्या मताशी सहमत आहे. परंतु ते व्यापारी आणि घेणारे लोक, जनता हे जाणार कुठे? याचाही बंदोबस्त व्हायला पाहिजे. मलाही कुठेतरी त्रास होतो परंतु इतरांनाही तो त्रास होत आहे ती व्यवस्था आपण करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे तर अनेक ठिकाणी आहे.

**जयंत पाटील :-**

अहो, रस्त्यावर बसणारे ना फेरीवाला क्षेत्रामधील प्रत्येकाला आपण उठवू शकत नाही.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा असा जर विचार केला तर सगळ्याच ठिकाणी हे फेरीवाले बसवावे लागतील.

**जयंत पाटील :-**

मंजूर आहे.

**शरद पाटील :-**

मंजूर असेल तरीसुध्दा असे चालणार नाही. असे नाही की जिथे अडचण आहे तिथून त्यांना उचलायला लागेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही संध्याकाळी येउन तिकडे प्रत्यक्षात येउन बघा.

**शरद पाटील :-**

तुम्ही ४.०० वाजताचे बोलतात. परंतु, ते ३.०० वाजता येउन ती लोक बसलेली असतील. ५.०० वाजल्यानंतर ती बसत नाही. तशी अट असेल तर तुम्ही सांगा ना. ५.०० वाजल्यानंतर किंवा ६.०० वाजल्यानंतर त्यांनी बसावे म्हणून आणि त्याची जबाबदारी कोण घेईल मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब हे ठरावानुसार होत असते कागदावर परंतु याची कारवाई काय? आज १२ वर्षे झाली मी नगरसेवक आहे आणि १२ वर्षापासून हे ठराव चाललेले आहेत याच्यावर कारवाई काय? ते मला सांगा ना. या ठरावांवर कारवाई काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही सुचना त्यावेळी मांडली गेली नाही हे कसे काय आले ही नोंद याच्यामध्ये कशी काय आली हे मला समजत नाही. आणि शंकर नारायण कॉलेजचे संस्थापक श्री. रोहिदास पाटील यांनी दहा पत्र लिहलेले आहेत की त्या फेरीवाल्यांना हटवा. तीन हजार मुले मुली त्या कॉलेजमध्ये जातात आणि आपण त्या ठिकाणीचे रुलिंग करतात.

**कल्पना म्हात्रे :-**

साहेब, तशी कंडीशनच आहे. शाळा व कॉलेज......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण आता कुठल्याही प्रकारचा बदल करत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आता बदल करत नाही. तुम्ही काय बोलले आता की, जयंत पाटील साहेब यांनी अशी सुचना मांडली.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब, पान क्र. १५ मिरारोड पूर्वेकडील जेवढे रस्ते आहेत तेथे रास्ता नको रस्ते पाहिजे. जेवढे आतमधले रस्ते आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाजली आपण फक्त प्रोसेडींग मंजूर करत आहोत. कुठलाही बदल त्याच्यात करत नाही आणि नक्की त्याचेमध्ये काय झाले होते त्याबाबत बसून आपण चर्चा करुन तातडीने मार्ग काढू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सुचना झालेली नाही. त्यांनी फक्त आपले मत मांडलेले आहे.

**मा. महापौर :-**

बघू या नियमाप्रमाणे. सचिंव साहेब पुढील विषयाचे वाचन करा.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, या ठरावावर मा. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, १ सप्टेंबरपासून आम्ही इम्प्लीमेन्टेशन करणार आहोत.

**मा. महापौर :-**

आता या विषयावर आपण नंतर बोलू या. त्यांचा तोच विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, पान क्र. ४५ वर बघा असे लिहलेले आहे की, शास्त्रीनगर रस्त्याची डावी बाजू ते डिलीट करा आणि रेल्वे फाटक समोर कमलापार्कचे आहे शास्त्रीनगरचे नाही. रेल्वेफाटक समोर जे कमलापार्क आहे ते फेरीवाला क्षेत्र आहे. ते शास्त्रीनगर नाही.

**प्र. नगरसचिव :-**

ते वगळायचे आहे का? शास्त्रीनगर डावी बाजू ते कमलापार्क ......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

शास्त्रीनगर डावी बाजू होय तेवढे फक्त वगळायचे आहे. हा जो फेरीवाला क्षेत्र आहे ना तो रेल्वे स्टेशनसमोर कमला पार्क आहे हे शास्त्रीनगर नाही. शास्त्रीनगर जे आहे ते फक्त डिलीट करायचे आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. पुढचे घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, पेज क्र. ४८ देखीए जो जो सुचना ठराव मे लिया हुआ है लेकीन ठरावमे श्री. जयंत पाटील की सुचना नही आयी हुई है आपने ठरावमें सुचना जो बादमे ली हुई है।

**मा. महापौर :-**

अभी निर्णय लिया नही हैं, निर्णय पेन्डीग है।

**भगवती शर्मा :-**

पान क्र. ४५ के अंदरमे उसमे तीन नंबर जो है उसमे रस्त्याच्या दोन्ही बाजूस है।

**मा. महापौर :-**

एक बाजू लिखनेका है क्या?

**भगवती शर्मा :-**

नही, खाली इसमे क्या लिखा हुआ है, बावन जिनालय जैन मंदिर ते बनी पॅलेस पर्यंतचा दोन्ही बाजुचा रस्ता.

**मा. महापौर :-**

ठिक आहे दोन्ही बाजु पर्यतचा रस्ता करा.

**भगवती शर्मा :-**

पेज नं. ४८ के अंदरमे सन लिखा हुआ है, लास्ट के पॅरेग्राफ सुचना के अंदर मे याशिवाय सर्व भाग ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावे यह सब ठराव के अंदर मुझे अब मिला उसके अंदर मे नही था उसकी सुचना ली जाए अगर नही है तो उसको मेंन्शन किया जाए।

**मा. महापौर :-**

ठिक है आणि एखाद्या कुणाला ठरावाची प्रत दिली असेल तर परत सुधारून देण्यात यावी.

**चंद्रकांत वैती :-**

बदल केलेला असेल.

**मा. महापौर :-**

बदल नही सुचना मांडली ती त्याच्यासमोर आलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब फेरीवाला झोनच्या बद्दल मी गेल्या या मिटींगमध्ये मी एक सुचना केलेली होती.

**मा. महापौर :-**

प्रोसिडींगमध्ये काही दुरूस्ती आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

प्रोसिडींगच्या बद्दलच बोलत आहे की त्याच्यामध्ये आपण आरक्षणे जी ताब्यात घ्यायची होती मार्केटची ती त्वरीत कारवाई चालू करा अशी आपण रूलिंग दिलेली आहे त्याबद्दल नगररचना विभागाने या महिना दिड महिन्यात काय केले?

**जयंत पाटील :-**

आमचे सन्मा. चंद्रकांत वैती साहेबांनी आता सांगितले की आपसात बसा तुम्ही आपसात भानगडी करू नका आमच्यात भानगडी होणार नाहीत. कुठे चालले आहेत ते त्यांना माहित आहे. आणि ते पेपरलाही आलेले आहे. धन्यवाद.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, पान क्र. ३६ माझ्या वॉर्डमध्ये पंजाब नॅशनल बॅंक ते विजय पार्क पर्यंत फेरीवाला क्षेत्र आहे. परंतु मी सिल्वर पार्कचा एरिया दिला होता आणि लॅबोरेटरी आर.एन.ए. मंदाकिनी कोयरे हे त्यांच्यात आलेले नाही. ते याच्यात ते समाविष्ट करून घ्यावे.

**मा. महापौर :-**

काय शब्दात मिस्टेक आहेत का?

**वंदना चक्रे :-**

शब्दात मिस्टेक नाही. परंतु ती लाईनच आलेली नाही. मी माझ्या पत्रात लिहून दिलेले होते.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. पत्रात लिहून दिले आहे. त्या पत्राची कॉपी काढा आणि त्याप्रमाणे करा.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, पुर्ण ऐकून घ्या. ते याच्यामध्ये आलेले नाही. पंजाब नॅशनल बॅंक ते विजय पार्क पर्यंत एवढे आलेले आहे तरी तो पण भाग याच्यामध्ये समाविष्ट करून घ्यायचा आहे.

**मा. महापौर :-**

आपण पत्र दिलेले आहे ना.

**वंदना चक्रे :-**

मी पत्र दिलेले आहे. आपल्या सचिवांना मी विचारले तर ते पत्र सचिवांकडे नाही. तीन वेळा पत्र दिले परंतु ते गहाळ झालेले आहे.

**मा. महापौर :-**

कुठे गहाळ झाले.

**वंदना चक्रे :-**

सचिवांनाच विचारा कारण सचिव हजर नाहीत. नसेल त्यांच्याकडे तरी ते मला समाविष्ट करून घ्यायचे आहे.

**मा. महापौर :-**

मी तपास करतो.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब हे असे चालणार नाही.

**मा. महापौर :-**

सचिवच हजर नाहीत.

**वंदना चक्रे :-**

त्यांच्याकडे ते पत्र नाही.

**मा. महापौर :-**

अहो मला सचिवांशी बोलू तरी द्या. पत्र कुठे आहे, कसे आहे, कुठे गेले ते प्रथम बोलू तरी द्या. सचिव आता नाहीत.

**वंदना चक्रे :-**

ठिक आहे, मी आपल्या येथे तोंडीसुद्धा बोलले होते.

**मा. महापौर :-**

मान्य करतो. सचिव आल्यानंतर बोलतो आणि मग तसे करतो बोला.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ३२ भाईंदर पश्चिम स्टेशनरोडला जो होलसेल मच्छी मार्केट आहे त्याचा ह्या फेरीवाला क्षेत्रामध्ये कुठेही उल्लेख नाही. आणि राममंदिर रोडला आम्ही सर्व गावकऱ्यांनी तुम्हाला राममंदिरच्या लोकांनी हरकती घेतल्या रामंदिरचा बाजार हटवून अन्य ठिकाणी तुम्ही त्यांना बसवा परंतू यासर्व हरकती व माझे स्वतःचे पत्र सुद्धा आपल्याकडे आहे परंतु त्याचा उल्लेख तुम्ही येथे फेरीवाला झोनमध्ये केलेला आहे. आमच्याइकडे प्रत्येक धार्मिक स्थळ त्या गावातील ज्या अंतिम यात्रा असतात प्रेतयात्रा वगैरे त्यावेळेला फार प्रॉब्लेम होतो. म्हणजे पत्र देउन हरकती घेउन प्रशासनाने काहीच केलेले नाही. आणि ह्या प्रोसिडींगमध्ये श्री. अजित पाटील साहेब डायसवर बसलेले आहेत. सुप्रिम कोर्टाच्या, हायकोर्टाच्या ह्याच्यासर्व काही रूल्स आहेत. नॉर्म्स आहेत. फेरीवाला नीती ही स्थायी समितीपुढे मी स्वतः मांडलेली आहे. फेरीवाले कुठे असावेत आणि कुठे नसावेत याच्यामध्ये सर्व रूलिंग होउन याचा इफेक्ट कुठेच नाही. माझे हे ऑब्जेक्शन ह्या संपुर्ण प्रोसिडींग मंजुरी देत असतांना नोंदवून घ्या. शहर वाढते आहे. आपण वारंवार बिल्डींगचे प्लान पास करतो वसाहती वाढताहेत. त्यासमोर आपले कुठेतरी रिझर्व्हेशन अद्यावत स्वरूपाचे नाही.

**मा. महापौर :-**

म्हात्रे साहेब, प्रोसिडींगबद्दल बोला ना.

**मिलन म्हात्रे :-**

प्रोसिडींगबद्दलच बोलतोय.

**मा. महापौर :-**

रिझर्व्हेशन वगैरे सर्व....

**मिलन म्हात्रे :-**

आहे रिझर्व्हेशन आहे.....

**मा. महापौर :-**

अहो काय त्या दुरूस्त्या सुचवा.

**मिलन म्हात्रे :-**

अहो दुरूस्तीबद्दलच बोलत आहे. स्थायी समितीपासून आम्ही दुरूस्ती सुचवत आहोत. त्याचा इफेक्ट तिकडे होत नाही. अजित पाटील साहेबांनी खुलासा करावा. स्टँडींगच्या रेकॉर्डला आलेले आहे किंवा नाही.

**मा. महापौर :-**

अहो. स्टँडींगचे राहू द्या. इकडे काय मा. महासभेच्या प्रोसिडींगमध्ये काय दुरूस्ती करायची आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

स्टँडींग नंतर मा. महासभेत येत असते स्टँडींगमध्ये आमच्या ज्या काही सुचना आहेत त्या आलेल्या नाहीत. त्या महासभेत सुद्धा घेउन आलेले नाहीत.

**मा. महापौर :-**

बघा स्टँडींगमध्ये काय झाले ते त्या ठिकाणी आहे. ह्या प्रोसिडींगमध्ये जे काय झालेले आहे त्यामध्ये...

**मिलन म्हात्रे :-**

अहो त्या प्रोसिडींगमध्ये सुप्रिम कोर्टाचे नॉर्म्स, फेरीवाला निती झाल्यानंतर उच्च न्यायालयाचे निकाल आहेत त्या संदर्भात डायरेक्शन दिलेली आहेत.

**मा. महापौर :-**

आपण वाचन केलेले होते का?

**मिलन म्हात्रे :-**

अहो वाचन म्हणजे रिफ्लेक्शन झाल्यानंतर त्याचे काय आहे ना ते रेकॉर्डवरती आणण्याचे असे कसे काय करतात ते आम्ही सांगायला पाहिजे का? पत्रव्यवहार झाल्यानंतर ते रेकॉर्डवरती यायला नको का?

**मा. महापौर :-**

ठिक आहे. विषय घ्या.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर साहेब, माझे सुद्धा झाले पाहिजे.

**प्रकरण क्र. ८४:-**

दि. १९/०७/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७९ :-**

दि. १९/०७/२००८ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.     अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५, अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेणे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, यांच्यामध्ये आयुक्तांकडील पत्रे व कामकाज सचिव साहेब हा काय प्रकार आहे. आयुक्तांकडील पत्रे व कामकाज त्यांच्या अंतर्गत हे दोन विषय आहेत का? बघा ना अजेंडा बघा.

**प्र. नगरसचिव :-**

आयुक्तांकडील पत्रे व कामकाज यामधील ८५ क्रमांकाचा विषय आहे.

**अनिल सावंत :-**

कुठचा प्रकरण क्र. ८५ आणि ८६ नंतर...

**प्र. नगरसचिव :-**

होय दोन्ही विषय आहेत ८५ आणि ८६

**अनिल सावंत :-**

मग आयुक्तांकडील हे कामकाज असेल तर प्रकरण क्र. ८५ ला गोषवारा शासनाने दिला आहे का? आयुक्तांकडील असेल तर शासनाने गोषवारा दिला पाहिजे ना.

**प्र. नगरसचिव :-**

कामकाजा बद्दल आढावा घेणेबाबतचा विषय आहे. अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेणे याबाबतचा विषय आहे.

**अनिल सावंत :-**

परंतु त्याचा गोषवारा दिला पाहिजे ना. आयुक्तांकडील विषय असेल तर गोषवारा पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, सभा लागल्यानंतर मी एक पत्र दिले होते प्रशासनाला की, मा. महासभा सुचना क्र. १२ दि. ०१/१२/२००८ सभा गुरूवार दि. ११/१२/२००८ प्रकरण क्र. ८५ अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेणे. उपरोक्त विषयानुसार आपणांस विनंती करतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक माहे. ऑगस्ट २००७ झाल्यापासुन आजमितीस अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाबाबत व त्या खात्याच्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत मा. महानगरपालिका सदस्यांच्या वृत्तपत्राच्या माध्यमातुन प्रसिद्धा लेखातुन व नागरिकांच्या अनेक लेखी व तोंडी तक्रारी आहेत. त्याबाबत मा. महासभेसमोर सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या माध्यमातुन, लक्षवेधीच्या माध्यमातुन मा. महासभेच्या ठरावाच्या माध्यमातुन झालेल्या चर्चेवरती झालेल्या ठरावाची कारवाई होत नाही. मा. महासभेसमोर दुसऱ्यांदा आलेला विषय क्र. ८५ अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेण्याविषयासाठी सभागृहात पुढील माहिती कामाकाजाच्या

दिवशी उपलब्ध करून द्यावी अशी माहिती दिली होती. आपल्याला मग हा मा. महासभेसमोर विषय आहे. आपल्याकडे एवढे दिवस सभा सुचना आल्यापासुन वेळ आहे. दहा दिवसांच्या वेळ होता. दहा दिवसांत प्रशासनाकडून ह्या कामासंदर्भात काय काय कारवाई झाली. आपल्याकडे बघा सगळे डॉक्युमेंटस उपलब्ध आहेत मागे माजी नगरसेवक रतन पाटील यांनी हायकोर्टमध्ये एक पी.आय.एल. फॉईल केले होते. त्यावेळी हायकोर्टात संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रातील इललिगल कामकाजाची यास आपण हायकोर्टात दिली होती. मागे आपण अग्रवाल समितीकडून शासनाकडे अपॉईमेंट झाली त्याचा कार्यक्रम आपल्याकडे झाला अनेक सन्मा. नगरसेवकांनी आपली तिथे हजेरी लावली त्या दिवशी आपण या शहरातील अनधिकृत कामाजाबाबत आढावा घेणेसाठी बसलो असताना त्यांना आपण ही माहिती दिली मग सभागृहासमोर ही माहिती का आणली नाही. महानगरपालिकेचे किती वकील काम करत आहेत. त्यांना किती पैसे दिले महानगरपालिकेचे विधी सल्लागार आतापर्यंत किती यशस्वी झाल्या. आपण काहीच माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की आधी फेरीवाल्यांना हटविण्यासाठी ठराव करा मा. महासभेने ठराव केला. स्थायी समितीने ठराव केला परंतु अंमलबजावणीचे काय? रस्त्यावरचे गॅरेजवाले, मुख्य रस्त्यावर केलेले फेरीवाल्यांचे अतिक्रमण, नाल्यांवरती झालेली बांधकामे आर.जी. प्लॉटमध्ये झालेली बांधकामे, नुसत्या झोपड्या नाहीत सात सात माळ्यांची इमारत या शहरामध्ये झालेली आहेत. बहुमजली इमारती झालेली आहेत. त्या कधी तोडणार आहात आपण आणि हे सगळ्यांच्या आधी विषय आला होता. त्यावेळी आपण स्वतः सांगितले होते की विस्ताराने आणू. मग हा दहा दिवसापासुन विषय आहे. मग प्रशासनामधील अधिकाऱ्यांना वाटते की, हा विषय घेउ नये अशी भावना आहे. की आपण कुणावरती इललिगल कंस्ट्रक्शन केले आहे त्याच्यावर महापालिकेमार्फत दबाव आणतो आहे की आम्ही हा विषय आणलेला आहे. उर्वरित रक्कम येउ द्या. आपली स्वतःची व्यक्तीगत कार्यवाही करण्याची पद्धत किंवा शहरामधले इललिगल कंन्स्ट्रक्शन करणाऱ्या लोकांना दबाव आणण्याचे महत्व आपण याच्यातुन आणतो आहे की, स्वतः हा विषय चर्चा करण्याचा आहे. चर्चा कराची असेल तर सभागृहासमोर करायची अजुनपर्यंत कुठची कॉपी का ठेवली गेली नाही. कॉपी ठेवायला पाहिजे होती. शहरात इललिगल कंन्स्ट्रक्शन नाही आहेत का? आपण आपल्या महापालिकेने धोरण निश्चित केले आहे २०० फुटावरती स्ट्रॉल्सना परवाना द्यायचा, त्या स्टॉलचे भाडे घ्यायचे, त्याची साईज नक्की केली त्याचे डिपॉझीट नक्की केले आणि मधल्या काळामध्ये कोणाला भाड्याने देता येणार नाही. ज्या इसमाला दिले असेल त्यांनीचे ते चालवायचे पण आज शहरामध्ये २०-२० फुटावर टपऱ्यांना मंजुरी देतो आपण प्रशासन २०-२० फुटांवर मंजुऱ्या देतो. त्या सुद्धा भाड्याने आहेत. त्याचे आपण भाडे वसुल करत नाही. डिपॉझीट घेत नाही. दिलेल्या नॉर्म्सप्रमाणे नाहीत. ही अशाप्रकारे अतिक्रमणे होत आहेत. गॅरेजवाले मुख्य रस्त्यावरती काम करत आहेत. मुख्य रस्त्यावरची रॅलीज तोडून टाकल्या. त्यानाल्यावरती इमारतीची बांधकामे चालू आहेत स्टे मिळतात? कसे मिळतात? मग आजपर्यंत जी कामे काही एका रात्रीपर्यंत होत नाहीत. मग त्या विभागातला अधिकारी काय करत होता. महापालिकेला ह्या कामाची माहिती नाही का? याबाबत खुलासा का दिलेला नाही हा खुलासा दिलेला नसेल तर मा. महापौर साहेब आपण अर्धा तास सभा तहकूब करावी प्रशासनाकडून सर्व खुलासा मागवावा आणि मग सभेला सुरूवात करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेत्यांनी मागच्या मा. महासभेमध्ये प्रश्न उपस्थित केलेला होता त्यावर बरीचशी चर्चा झाली त्यावेळी असा निर्णय झाला होता की, मा. आयुक्त साहेबांनी संबंधित दोषी अधिकारी, संबंधित बांधकामावर, संबंधित फेरीवाल्यांवर आणि सर्व नगरसेवकांना पत्र पाठवून त्यांच्या वार्डात कुठकुठली बांधकामे सुरू आहेत याची माहिती होउन कार्यवाही करण्याबाबत अहवाल सादर करायचा होता. परंतु, त्यानंतर विषय साधारणतः मा. महासभेचा अजेंडा मी १ तारखेला सही केल्याचे माझ्या माहितीप्रमाणे आणि त्यानंतर मा. आयुक्त रजेवर गेले आणि हा जो चार्ज होता अतिक्रमणाचा आपले उपायुक्त श्री. दिवटे साहेब होते आता दोन दिवसानंतर तो चार्ज श्री. खतगांवकर साहेबांकडे दिला आहे. म्हणून ती पुर्ण माहिती आणता आली नाही. म्हणून हा विषय अजुन पेंडींग.....

**भगवती शर्मा :-**

यह जो विषय है बहुत गंभिर विषय है, सदन मे कही बार चर्चा हुई है, हर बार सदन नगरसेवकोने तक्रार की हुई है अन्यायोने तक्रार की हुई है, आजतक कितनी एम.आर.टी.पी. केस हुई है उस केसका क्या हुआ है, कितनी जजमेंट हुई है, कितनी पेंडींग है। एम.आर.टी.पी. किसके उपर दाखल किया जाता है यहापर ऐसे देखे गये हुए है। की, भाडोत्री है उनके उपर ही एम.आर.टी.पी. दाखिल हुआ है तो यहाँ पे आज. मा. आयुक्त भी नही है विधी विभाग के अधिकारी यहा मुझे नजर नही आ रहे है, तो संपुर्ण अहवाल के साथ जैसे अभी आपने उपकर के बारेमे अहवाल प्रस्तुत किया है। इस टाईप का अवैध बांधकाम कितने हुए है, उनके उपर कितने केस डिफेट हुए है। कितने के उपर कारवाई हुई है और कितने बांधकाम के उपर महानगरपालिकेने कारवाई हुई है कितने के उपर स्टे यह संपुर्ण अहवाल के साथमे यह विषय वापस लाया जाए।

**चंद्रकांत वैती :-**

मी या विषयात प्रकरण क्र. ८५ अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाबाबत आढावा घेणे यांच्यात माझी एक सुचना नमुद करतो आहे की, माहे ऑगस्ट २००७ च्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीपासुन महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात फेरीवाल्यांची संख्या वाढली असुन जवळ जवळ शहरातील प्रत्येक रस्त्यावर फेरीवाल, गॅरेजवाले व अनधिकृत स्टॉल मुख्य रस्त्यावरील चिकन, मटन विक्रीची दुकाने तसेच दुकानदार आणि व्यावसायीकांनी फुटपाथवर केलेली अतिक्रमणे या प्रकरणामध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते. याबाबत मा. महासभेत व मा. स्थायी समितीत वेळोवेळी निर्णय झालेली असताना त्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाकडून यथोचितरित्या होत नाही तसेच शहरातील मोक्याच्या जागी विशेषतः विकसित इमारतीच्या आर.जी. प्लॉटमध्ये विकास आराखड्याच्या आरक्षणामध्ये नैसर्गिक नाल्यावरती व महापालिकेच्या रस्त्यावरती डी.पी. रोडमध्ये अनेक बांधकामे अनधिकृत झाली असुन त्या गाळ्यापासून ते बहुमजली इमारतीचा समावेश आहे. तसेच मंजुर रेखांकन पेक्षा जास्तीचे काम करणे चटई क्षेत्राचे चोरी व उल्लंघन करणे इ. कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. या शहरातील अनधिकृत बांधकामाबाबत माजी नगरसेवकांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहीत याचिकेच्या सुनावणीच्या वेळी प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामाची यादी सादर केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडून नेमलेल्या अग्रवाल समितीस प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामाची यादी दिलेली आहे. तसेच याबाबत संपुर्ण माहिती महापालिकेच्या प्रशासन व विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध आहे. प्रशासनाकडून विधी सल्लागार व मान्यवर वकीलाचे पॅनल याविषयी कार्यरत आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल व माहिती मा. महासभेसमोर सन्मा. सदस्यांच्या माहितीकरिता देणे अभिप्रेत होते. अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणे याविषयी या कारवाई साठी मा. सदस्य, पत्रकार, नागरीक यांच्याकडून वारंवार तक्रारी महापालिकेस प्राप्त झालेल्या आहेत. मा. महासभेसमोर प्रश्नोत्तर व लक्षवेधी यांच्या माध्यमातुन देखील याबाबत चर्चा झालेली आहे. महानगरपालिकेकडून याबाबत अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे थांबविण्यासाठी किंवा बंद करण्याची किंवा तोडण्याची कार्यवाही होत नाही. ती अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे एका दिवसात किंवा अदृष्य स्वरूपात केलेली नाहीत सदर अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे ज्या अधिकाऱ्यांच्या अखत्यारित येतात त्यास जबाबदार धरून ती हटविण्यात यावीत व त्याकामी लागणारा खर्च व त्या संबंधित अधिकाऱ्यांकडून वसुल करण्यात यावा अशी मी सुचना मांडीत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये महाराष्ट्र शासनाकडे आपण एक जे गटई कामगार सरिता दुध अशांना जे आपण स्टॉल देतो, टपरी देतो त्यासाठी आपण महाराष्ट्र शासनाकडे एक उपविधी पाठविली ती उपविधी मंजुर होउन आलेली आहे. ती उपविधी मंजुर होउन सुद्धा त्यांच्या उपविधीच्या प्रमाणे काम न करता बेकायदेशिर पणे काम चालू आहे त्याचा पण अहवाल जे आपण अतिक्रमणाबद्दल चर्चा करणार आहेत त्यावेळी त्या उपविधीचा आधार न घेता जे जे टपरी सरिता दुधसाठी दिलेले आहे त्याची पण पुर्ण माहिती या सभागृहापुढे आली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल म्हणाले की, उपविधी मंजुर होउन आलेली आहे ते खरे आहे का? उपविधी मंजुर होउन आलेली आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्याकडे आहे. कुणाकडे नसेल तर मी देतो.

**अनिल सावंत :-**

अजुनपर्यंत आम्हांस अशी उत्तरे मिळत होती की उपविधी शासनाकडे पेंडींग आहे. उपविधी मंजुर झालेली नाही आहे.

**मा. महापौर :-**

कुठली उपविधी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

गटई कामगार सरिता दुध डेअरी याची म्हणतो मी.

**मा. महापौर :-**

फक्त त्यासाठी ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जे स्टॉल देतो त्याची...

**दिप्ती भट :-**

गटई कामगार जे मोर्चे घेउन आले होते मी त्यांना प्रश्न विचारले की जे तुम्ही शासनाकडून मंजुरी आणतात तर ते टपरी लावतात ते डायरेक्ट महानगरपालिकेकडून परमिशन घेउन नंतर लावू शकतो की ते बोलले की नाही आम्ही परमिशनसाठी दिलेले आहे तर मा. कमिशनर साहेब त्यावेळी बोललेले की जर आम्ही

परमिशन दिली नसेल तर ते व्हॅलीड नाही. तर असे खुप लावलेले आहेत एकूण मिरा रोडमध्ये ५३ टपरी आहेत ५३ मधील ३८ ना परवाना आहेत आणि १८ जे आहेत ते बंद आहेत. म्हणजे तुम्ही याच्यावरती कारवाई करा आणि त्यांनी ज्या टपऱ्या दिल्या आहेत ते आपण भाड्याने देउ शकत नाही. ते समोरच सांगितलेले आहे म्हणजेच त्याच्याबरोबर समजुन काढून आणि त्या टपऱ्या उचला म्हणजे ते पण आंदोलन नाही छेडणार आणि आपले काम पण इझी होणार.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेब, आता विरोधी पक्षांनी सुद्धा प्रश्न उपस्थित केला की २०-२० फुटावर आपण जर टपरी दिली आणि ही भविष्यातली गंभीर बाब आहे. आणि त्या लोकांनी अर्ज केला आणि अर्जाच्या नावावर त्यानी टपऱ्या लावलेल्या आहेत. तशी आणि त्यांची रिन्युअल झाली नसेल किंवा त्याने भाड्याने दुसऱ्याला दिली असेल अशा प्रत्येक टपरीवर आपण कारवाई करावी. आणि जिथपर्यंत आपण पुर्ण टपऱ्यांचे अहवाल सादर करत नाही तिथपर्यंत कुठलेही नविन परवानगी आपण सध्या देउ नये. मा. आयुक्त साहेब, जिथपर्यंत आपण पुर्ण अहवाल सादर करत नाही किती फुटावर दिली, किती टपऱ्या दिल्या, किती लिगल आहेत. किती इनलिगल आहेत. तरी यापुढे नवीन परवानगी सभागृहाची मंजुरी घेउनच देण्यात यावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब माझ्या वॉर्डामध्ये गेल्या वेळेला अतिक्रमणाचा विषय निघालेला होता माझ्या वॉर्डामध्ये मोबाईलचा टॉवर बांधलेला आहे तरी मी मिटींगमध्ये सुद्धा सांगितले होते तेव्हा तुम्ही सांगितले होते की त्याची चौकशी करून काढला जाईल तर त्याची चौकशी केली का?

**मा. महापौर :-**

तुम्ही सांगितलेल्या विषयाची चौकशी करावयाची झाल्यास ज्याने चौकशी करावयाची आहे तो अधिकारी आज उपस्थित नाही.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, अतिक्रमण का विषय बार बार मा. महासभामे आ रहा है उसके उपर क्या रूलिंग हो रही है, हम लोगोको अबतक कुछ भी जवाब नही मिला है।

**मा. महापौर :-**

*कोई रूलिंग नही हुई है, जिसने उसका जवाब देनेका है। वह जगह पे नही है इसलिये विषय आगे* लिया जा रहा है।

**स्नेहा पांडे :-**

ऐसा विषय था तो आयुक्त साहब क्यु.....

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त नही है तो क्या करू

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, या विषयासंदर्भात १४ जुन २००८ ला मी लक्षवेधी मांडली होती त्यावेळेला सुद्धा मा. आयुक्त सभागृहात उत्तर देउ शकले नव्हते. ते म्हणाले होते की मी पुढच्या मिटींगमध्ये देउ. तरी अजुनपर्यंत त्याचा खुलासा झालेला नाही. १४/०६ ची लक्षवेधीची तुम्ही नोंद करून ठेवा आणि ज्यावेळेला आढावा घ्याल त्याचे सुद्धा उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

(सभागृहामध्ये सदर विषयाचा आढावा घेण्यात आला.)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६ उपकर वसुलीबाबत आढावा घेणे. सविस्तर टिप्पणी सभागृहाला सादर करण्यात आलेली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

या विषयात प्रशासनाने उपकराची सध्याची स्थिती काय आहे याचा पहिल्यांदा खुलासा केला पाहिजे. आम्हाला टिप्पणी दिलेली आहे परंतु मा. आयुक्त साहेब आपण हे आकडे दोन महिन्यापासुन एक महिन्यापासुन जे सांगत आहे तेच आहेत अनेक प्रकरणे आज उपकराच्या नोंदणीसाठी फाईल्स पडलेल्या आहेत. आपण जेवढे डिपार्टमेंट केले २१ वर्ग केले त्या सगळ्यांकडे २०-२० ते ५०-५०, १००-१०० फाईल्स पेंडींग आहेत. त्याच्यावरती अजुन आपल्या लोकांनी रजिस्ट्रेशन केलेले नाही. त्या अजुन प्रलंबित आहेत. त्या फाईल्स धरून आपण आकडेवारी द्या आणि आज उपकर वसुलीला तीन महिने पुर्ण झालेली आहेत म्हणजेच १०० दिवस पुर्ण होतात ह्या १०० दिवसामध्ये आजची वसुली काय ती सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण आम्हाला हा जो गोषवारा दिलेला आहे त्याच्यामध्ये टोटल बॅलेन्स ६ करोड ६० लाख दिलेली आहे. याच्यामध्ये ९० लाखाची तफावत आहे. मग याच्यामध्ये आपण कलेक्शन किती केलेले आहे. एका ठिकाणी आपण सांगता की, साडेसात करोड रूपये आपण वसुल केलेले आहे आणि दुसरीकडे आम्हाला ६ करोड ६० लाख रूपयाची फिगर देतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी माझा खुलासा करतो आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, काल आमच्या महापालिकेवर मोर्चा आणला होता असे ऐकले होते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवाल उभे आहेत. त्यांचे अगोदर बोलणे होउ द्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, काल आपल्या महापालिकेवर मोर्चा आलेला होता तो कशासाठी आलेला होता. याची आमच्या सन्मा. सदस्यांना माहिती दिली तर बरे होईल.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, बाहेर एवढे व्यापारी जमलेले आहेत याचाही जरा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

भाईंदर स्टील असोसिएशनने आपल्याला आज दिवसा अगोदर महापालिकेला पत्र दिले होते तसेच मलासुद्धा व्यक्तीगत पत्र दिलेले आहे. काल पण दिलेले आहे आणि अगोदरसुद्धा दिलेले आहे. आम्हाला ऑक्ट्रॉय जो आहे तोच पाहिजे आम्हाला सेस हा कठीण होत आहे आणि भरता येत नाही कारण आम्ही ज्यांच्याकडून माल घेतो तो लोकल व्यापारी भरत नाही आणि म्हणून आम्हाला डबल भरायला लागतो आणि आम्हाला ते परवडत नाही. आणि त्यांचे मुळ पाटे सप्लाय करणारे आहेत ते भरत नाही आणि लोकल परचेस करुन परत ते आम्हाला भरायला लागते आमची फॅक्टरी गेल्या दिवाळी पासुन बंद सारख्या चालतात त्यावर आपण हा निर्णय घ्यावा की आम्हाला सेसच्या जागेवर ऑक्ट्रॉय लावावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे. दुसरी अशी त्यांनी विनंती केलेली आहे की जो कोणी भाईंदरमधील आम्ही व्यापारी आहोत त्यांच्याकडून आता कोणीही माल घेत नाही. ते दहिसर किंवा मुंबई वसईने माल मागवतात कारण त्यांना सेस लागू होत नाही. म्हणून ते बाहेरूनच माल सप्लाय करतात आणि लोकल बिझनेस आमचा संपलेला आहे साधारणतः मोठ्या प्रमाणात आणि स्टील असोसिएशनकडून आपल्याला आरक्षण अंदाजित ३० टक्के जे आपण जकात घेतो त्यामुळे ३० टक्के रक्कम आपल्याला त्यांच्याकडून अपेक्षित आहे. तरी रक्कम सुद्धा आपल्याला अजुन आलेली नाही. तरी महत्वाचे असे त्यांचे निवेदन आलेले आहे की ऑक्ट्रॉय लावावा सेस वगळून....

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, बघा या लोकांनी ऑक्ट्रॉय बंद करावा म्हणून या व्यापाऱ्यांनीच मस्ती केली. म्हणजे हे व्यापारी काय आपल्याला खेळणे समजतात काय? यांनी जसे सांगावे तसे आपण वागावे का? हे बरोबर आहे का? हे व्यापारी स्वःताला काय समजतात? त्यांच्यासाठी आपण मिटींग लावायच्या, यांच्यासाठी आपण नगरसेवकांनी भांडायचे हे काय चालले आहे? आणि प्रत्येक नगरसेवकांचे म्हणणे आहे की ऑक्ट्रॉय चालू करा म्हणून उद्या जर आपण ऑक्ट्रॉय चालू केला तर हेच म्हणतील की बंद करा म्हणून अहो प्रत्येक व्यापारी हा आपल्या स्वतःसाठी धंदा करतो लोकांसाठी धंदा करत नाही व्यापाऱ्यांना म्हणा तुम्ही जास्त शहाणपणा करू नका आम्हाला सुद्धा कामधंदे पडलेले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, या शहरात जकात ठेकेदारांकडून ज्या प्रकारचा अन्याय चाललेला होता आणि अगदीच कोणी गावाहून आले तरी त्यांच्या बॅगा तपासल्या जायच्या. कामावरुन जरी कोणी आले तरी त्यांच्या बॅगा तपासल्या जायच्या. ह्या रस्त्यावरील कोणालाही पकडून त्यांच्याकडून हा माल कूठून आणला आणि याची जकात भरलेली आहे असे विचारले जायचे. दहशतीचे वातावरण शहरात होते आणि मग या शहरात व्यापाऱ्यांचे आंदोलन झाले आणि त्यानंतर महाराष्ट्र शासनाने ऑर्डीनन्स दिला आणि आपल्याकडे आपण गणेशचतुर्थीची खास भेट उपकर लावून दिली. या शहराला असे होर्डीग्ज सगळ्यांचे फोटो लावून ठेवले होते. आणि तो उपकर सुरु झाला आणि आमचे प्रामाणिक प्रयत्न होते. श्रेय घेत नव्हतो परंतु प्रयत्न होते आणि लोकांच्या हितामध्ये दहा लाख लोकांना त्या जकात नाक्याने वेठीस धरले होते. आज फक्त व्यापारी गटात, व्यापारी आस्थापनेलाच त्यांना फक्त उपकर भरावा लागतो. सामान्य नागरिकांना भरावा लागत नाही. नाहीतर आमच्याकडे आम्हाला टी.व्ही. आणायचा, मिक्सर आणायचा तरी देखील चोरी होत होती. हा प्रकार होता आज मा. महापौर महोदयांनी स्टील असोसिएशनचे एक पत्र वाचून दाखविले पण आम्हाला जकात नको म्हणून अशी सांगणारी १२ पत्रे आलेली वाचून दाखविली असती तर बरे झाले असते. जकात पाहिजे असे एक पत्र वाचून दाखविले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या यांनी विचारले की स्टील असोसिएशनवाले आले आहेत ते का आले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

पत्र महापालिकेकडे आलेली आहेत ते पत्र वाचून दाखवावे जे स्टील असोसिएशनने दिलेले आहे. आम्ही उपकर प्रामाणिकपणे भरतो आणि कसे. उपकर भरावा म्हणून शहरामध्ये तसे होर्डींग्ज लावलेले आहेत. स्पेअरपार्ट वाल्यांनी सुद्धा आम्हाला ऑक्ट्रॉय नको आम्हाला उपकरच पाहिजे आणि आम्ही नियमित व प्रामाणिकपणाने भरत आहोत असे सांगितलेले आहे. गोल्ड स्मिथ वाल्यांनी दिलेले आहे, हिरे व्यापाऱ्यांनी दिलेले अनेक लोकांनी दिलेले आहे. १२ लोकांची निवेदने आलेली आहेत आणि शहरातले सगळे व्यापारी या संदर्भात निवेदन दिलेली आहेत. या सभागृहात जो निर्णय होईल व्यापाऱ्यांचा जो निर्णय होईल त्या निर्णयाला आपण स्टीकअप रहावे. तशी त्या पद्धतीने जकात वसुली होईल. त्याला प्रॉब्लेम नाही परंतु, आपण सभागृहात एक पत्र वाचून दाखविले म्हणून मला वाटले की, नको सांगणाऱ्याची सुद्धा पत्रे आहेत आणि जर वसुली व्यवस्थित केली तर मला वाटत नाही की ही अवघड बाब आहे. मी खतगांवकर साहेबांकडे प्रशासनाकडून खुलासा मागितला की, जकातीसाठी आपण ९६५० फार्म गेल्याचे सांगत आहेत. आस्थापना रजिस्टरवरून गेल्याचे सांगितले परंतु शेकडो आस्थापना रजिस्ट्रेशनसाठी पडलेले आहेत. परंतु या शहरामध्ये असे वातावरण तयार झाले की आता सेस बंद होत आहे. म्हणून फाईल्स जमा करून ठेवल्या अशा प्रलंबित फाईल्स किती आहेत त्याची खतगांवकर साहेब आपल्याकडे माहिती नसेल तर आपण जे गट तयार केलेले आहेत त्या गटप्रमुखांना ताबडतोब फोन करा आणि त्यांची डिटेल माहिती मागवा. शेकडोच्या वर प्रत्येक गटामध्ये शंभराच्यावर फाईल्स आहेत ज्यांना रजिस्ट्रेशन केलेले नाही आणि ह्या महिन्यात फक्त तिसरा महिना केवळ तिसरा महिना शंभर दिवसात ८ करोडच्यावर आपली वसुली होते ही फार मोठी गोष्ट आहे. आपण उपकराच्या माध्यमातुन नेटाने जर काम केले तर आपण ह्या जनतेला खुप काही देउ शकू. नाहीतर प्रत्येक घरामध्ये चोरीचे वातावरण शहरामध्ये फिरायचे कुठच्या दुकानामध्ये जायचे, कारखान्यात जायचे आणि पेपर मागायचे ही पद्धत होती. आपण प्रशासनाने खुलासा करावा अशी मी विनंती करतो साहेब.

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, मागे जेव्हा जकात चालू होती त्यावेळी व्यापाऱ्यांनी उत्सफुर्त आंदोलन करून बंद पाडला. त्याच्यामध्ये जनतेचाही मोठा सहभाग होता म्हणून ते आंदोलन यशस्वी झाले आणि शासनाने एक महिना अगोदर पुर्ण राज्यामध्ये एक महिना अगोदर आपल्याकडे उपकर ही संकल्पना राबवण्याची परवानगी दिली त्यानंतर तिन महिन्यामध्ये जो साडेसात कोटी रूपये जमा दाखवलेली आहे माझ्यामते तो एक चांगली राशी जमा आहे. महापालिकेकडे आणि व्यापाऱ्यांपर्यंत पोहचण्यासाठी काही अवधी लागेल आणि त्याच्यामध्ये ५० टक्के फॉर्म अजुन जमा झालेले नाहीत. तर त्याच्यामध्ये राहीलेली रक्कम आपल्याकडे जमा होण्याची शक्यता आहे. आणि असे असताना काही ठराविक लोक जर जकातीसाठी मागणी करत असतील तर त्याच्या विरोधात अजुन ८० टक्के लोक त्यांना सेस हवा आहे अशी मागणी करताहेत आणि त्याच्या व्यतिरिक्त जवळजवळ संपुर्ण जनता जी जकात ठेकेदाराकडून वेठीस धरली गेली होती तर त्याच्यातुन ज्या जकात ठेकेदाराकडून मुक्तता झालेली आहे. ती परत ह्या जनतेवर लादू नका अशी माझी पक्षातर्फे मागणी आहे.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, कमीत कमी सात आठ वर्षापासुन जकात बंद करावी अशी जनतेची मागणी होती आणि सात आठ वर्षे प्रयत्न करून गेल्या १ सप्टेंबर पासुन जकात ठेकेदाराकडून वसुली बंद केली गेली आणि त्यानंतर सेसच्या माध्यमातुन ते पैसे वसुल करण्याचे काम सुरू झालेले आहे आणि आपण पण दिवाळीच्या वेळी, गणेशचतुर्थीच्या वेळी मोठे मोठे बोर्ड लावले की मी हा तोफा दिला आणि जकात बंद झालेली आहे आणि आता कशामध्ये चालू करायचे हे करतात. ८० टक्के व्यापाऱ्यांनी सांगितले की आम्हाला जकात नको आम्हाला सेस पाहीजे आणि सर्वसाधारण जनतेला याचा फायदा मिळालेला आहे. सर्व जनता याच्यामध्ये खुश आहे. पहिले बायकांच्या पर्ससुद्धा चेकींग करायचे, घरांचे जुने सामान आणले तरी चेकींग करायचे जुना फ्रीज आणला तरी चेकींग करायचे तरी एवढा त्रास ठेकेदार द्यायचा. जकात वसुल करताना म्हणून ही जकात गेलेली आहे. पहिलीच महाराष्ट्र राज्यामध्ये ही महापालिका आहे की एक महिना अगोदर म्हणजे सेसची पद्धत ही लागू झालेली आहे. आणि सर्वसाधारण जनता ही याच्यामध्ये खुश झालेली आहे. तरी माझी आपल्याला विनंती आहे तसेच सभागृहाला विनंती आहे की सेसच पुढे चालू ठेवावा. आणि कमिशनर साहेबांनी सांगितले की वसुलीपण चांगली झालेली आहे की अल्लाउद्दीनचा चिराग नाही की दोन दिवसांत चार दिवसांत पुर्ण होईल आणि शासनाने आपल्याला आश्वासन दिलेले आहे की, वसुली कमी झाली की पैसे १५ टक्के पण शासन आपल्याला देणार आहे. माझी सभागृहाला विनंती आहे याच्यापुढे सेसच चालू ठेवायला पाहिजे आणि जे जकात आहे ते मिरा भाईंदर शहरामध्ये आणू नये.

**प्रशांत पालांडे :-**

आपल्या या शहरामधून खाजगी ठेकेदाराकडून जी जकात वसुली केली जायची त्याच्या विरोधात मागे व्यापाऱ्यांनी आंदोलन केले होते आणि सर्व सभागृहाने, सभागृहातील सर्व पक्षीय नगरसेवकांनी व्यापाऱ्यांच्या भावना तसेच नागरिकांच्या भावना लक्षात घेउन आपण सेस चालू केलेला होता आता पुन्हा काही व्यापारी

पुन्हा जकात चालू करा असे म्हणतात तर मला वाटते हा धोरणात्मक निर्णय आहे. म्हणजेच ज्याप्रमाणे व्यापारी आंदोलने करतात उद्या पुन्हा आपण ऑक्ट्रॉय लावला तर पुन्हा काही व्यापारी आंदोलन करतील त्याप्रमाणे आपली सतत धोरण बदलणे योग्य ठरणार नाही. असे वाटते परंतु त्यातुनही जर आपण व्यापारी काही दुकानदार आहेत किंवा छोटे छोटे व्यापारी आहेत तर काही मोठे व्यापारी आहेत. व्यवस्थित आपण जर कानोसा घेतला तर सेसचा या सर्वांना त्रास होतो आहे. असे म्हणायला हरकत नाही. जाणवते आहे सगळीकडे व्यापाऱ्यांचे म्हणणे सेसच्या विरोधतच वातावरण तयार होत आहे. आणि मुळात व्यापारी जेव्हा आंदोलन या शहरामध्ये झाले तर जकातीविरोधी पुर्णतः होते असे म्हणणे थोडेसे चुकीचे ठरेल. खाजगी ठेकेदाराकडे जी जकात वसुली होती किंवा खाजगी ठेकेदाराकडून जी हॅरेजमेंट होती व्यापाऱ्यांना किंवा नागरिकांना त्याच्या विरोधात वातावरण तापले होते. तर मला वाटते जर आपल्या भविष्यात महानगरपालिका चालवायची व विविध विकास कामे करावयाची असतील तर त्यासाठी निधी पाहिजे आणि सेसमधून जर व्यवस्थित निधी उपलब्ध होणार नसेल तर सर्वांच्या भावना लक्षात घेउन आणि इतर महानगरपालिकेने सुद्धा त्याचप्रमाणे पाउले उचललेली आहेत त्यांना जेव्हा महाराष्ट्र शासनाने पर्याय दिला जकात किंवा सेस तर बऱ्याच जणांनी जकात ह्या पर्यायाची निवड केलेली आहे. आणि भविष्यातील विकास कामे, या शहराचा विकास चालू आहे डेव्हलपिंग सिटी आहे ती विचारात घेउन जर जकात वसुली करावयाचे ठरवले तर महानगरपालिकेकडून ती वसुली करावी. खाजगी ठेकेदाराला ती देउ नये. असे मी सभागृहास सांगेन. अध्यक्ष महोदय मी आपणांस विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आज मा. महासभेमध्ये आपण हा विषय आणलेला आहे. उपकराचा आढावा घेणेबाबत. ऑक्ट्रॉय लावायचा, जकात लावायचा किंवा नाही लावायचा हा विषयच कुठे आहे. आम्हाला फक्त आढावाच घ्यायचा आहे. जकातमध्ये आणि सेसमध्ये किती अंतर आहे. आधी जकात होते आता सेस लावतो आहे. कुठेतरी एक टॅक्सेशनचा पार्ट साहेब इतिहासामध्ये आहे कुठलाही टॅक्स, कुठलाही कर प्रेमाने कधीच भरत नाही. ते कुणाच्या खिशातुन काढावे लागते तो शासनाचा अधिकार आहे. कुठलेही शहर चालवायचे असेल किंवा कुठलेही राज्य चालवायचे असेल कुठलाही देश चालवायचा असेल तर कर हा लावावा लागतो त्या कराच्या माध्यमातुन शहराचा विकास होतो, देशाचा विकास होतो, राज्याचा विकास होतो. काही ठराविक मंडळी सेस आणा काही ठराविक मंडळी म्हणतात ऑक्ट्रॉय आणा. जकात आणा. धोरणात्मक निर्णय प्रशासनाला ज्याच्यातुन शहराचा विकास करता येईल ज्याच्यातुन आम्हाला जास्त पैसे उपलब्ध करता येईल तो निर्णय घेणे आम्हाला भाग आहे. जकात चालवणारा ठेकेदार ८० कोटी रूपये द्यायची त्याची तयारी होती. आम्हाला याचा अर्थ कुठेतरी पाच, पंचवीस कोटी रूपये अजुन तो त्याच्यातुन कमवणार होता. तरच तो देईल नाहीतर तो कधीच देउ शकत नाही. एक थोड्या फार आकड्यांनी तुमच्या खतगांवकर साहेबांचे मी अभिनंदन करीन. बऱ्याच अडीअडचणींमध्ये आणि नविन एक वस्तु या शहरामध्ये आणल्यानंतर सुद्धा एक चांगल्या पद्धतीने त्यांनी हा सेसचा कारभार सांभाळलेला आहे. आणि दिलेल्या गोषवाऱ्याच्या आकड्याप्रमाणे तर मी सांगेन की सेस फायदेशीरच आहे. आणि जकातीचे आम्हाला ८० कोटी ६४ लाख रूपये येणार होते. वर्षभरात ३६५ दिवस होतात सभागृहाला माझे निवेदन आहे. रोज आम्ही २२ लाख रूपये जकातीच्या माध्यमातुन येणार होते. आज सेस किमान एवढे व्यवसाय या शहरामध्ये चालतात २५ हजार व्यवसाय सरासरी अंदाजाने सरसाहेबांनी आम्हाला माहिती दिलेली आहे. अर्ज ज्यांनी नेले ते १७००० लोकांनी अर्ज घेउन गेलेत. नोंदणी केली ते फक्त ९००० लोकांनी याचा अर्थ निम्मे त्या निम्म्यामधून बिन निम्म्या लोकांनी सेस भरलेला आहे. आम्हाला दिलेल्या आकड्याप्रमाणे ७ कोटी ५० लाख ८६ हजार चेकपोटी रूपये ६१ दिवसांमध्ये सेस उत्पन्न आपल्याला आलेले आहे याचा अर्थ हा झाला की १२ लाख रोज हे फक्त २५ टक्के याचा अर्थ हा झाला. आम्ही १०० टक्के नाही केले फक्त ७५ टक्के सुद्धा सेस वसुल केले तर ३६५ दिवसामध्ये १३४ कोटी रूपये जमवू शकतो याचा अर्थ आम्हाला सेस ठेवायलाच पाहिजे. याला कारणे बरीच आहेत सामान्य नागरिक तर खुषच आहेत. अहो कुणाच्या दारावर गेलात आणि विचारले तुम्ही टॅक्स भरा तर तो कधीच नाही म्हणणार नाही. आम्हाला टॅक्सेशन नको फुकट रस्त्यावर चालणरी वीज, फुकट शहरीकरण झाले पाहिजे. रस्ते फुकट पाहिजे तर हे योग्य नाही. माझी या सभागृहाला विनंती आहे की, आलेला जो विषय त्या विषयावरतीच बोलावे. ऑक्ट्रॉय लावायचा किंवा नाही लावायचा तो नंतरचा विषय आहे. या शहरामध्ये जकात बंद करण्यासाठी सुद्धा आंदोलन झाले. जकात सुरू केले तरीसुद्धा आंदोलन झाले. जकात सुरू केले तरीसुद्धा आंदोलने होउ शकतात. कुणाचा व्यक्तीगत इंटरेस्ट असेल तर त्याला साथ देउ नये ही माझी या सभागृहाला विनंती आहे. शहरामध्ये सेस असला तर शहराला फायदा हा होणार आहे. आणि हे खरे आहे. धन्यवाद.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर साहेब, उपायुक्त साहेब बोलतात की तीन महिन्यात किती सेस जमा झालेला आहे. आणि ऑक्ट्रॉय किती मिळाला आणि त्याच्यात किती लॉस आहे हे जरा सभागृहाला सांगावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, आजचा जो विषय उपकर वसुलीच्या आढाव्याबाबत मला वाटते जनतेमध्ये एक अशी शंका निर्माण झालेली की ऑक्ट्रॉय पुन्हा येतो आहे आणि सेस जातो आहे आणि मग त्याच्यामुळे आपला उपकर हा कमी होतो आहे. आणि आपण जी उपकराची टक्केवारी काढलेली होती. त्याच्यामध्ये बराच घोळ आहे. मागे आपण ठराव पास केलेला होता सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी जे ग्रेन मर्चन्ट असोसिएशन त्यांनी पत्र दिले होते की, त्यांना जो टॅक्स हा कमीत कमी दोनशे ते चारशे टक्के लावलेला होता आणि असे बरेच काही याच्यामध्ये टॅक्स कमी केला आता पेट्रोल आणि डिझेल त्यांनी उपकर कमी केलेला आहे. आणि हा जो विषय आहे त्याच्यामुळे आपला उपकर कमी होतो. आणि परत आपले जे अधिकारी आहेत ना हे कडक अशी वसुली करत नाही. याच्यामुळे आपली ही वसुली कमी झालेली आहे. तरी माझी आपणांस अशी विनंती आहे की, आपण थोडेसे स्ट्रीक्ट राहिलात तर ही उपकराची वसुली जास्त प्रमाणात होईल आणि पुन्हा जो आपला परसेंटेज आहे तो जर रिवाईज केला तर आणखी उपकर येण्याची शक्यता आहे. कृपया आपण याची नोंद घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर आपल्या परवानगीने बोलत आहे शहरामध्ये महत्वाच्या विषयावरती गेल्या पाच सहा महिन्यापासुन राजकारणी आणि व्यापारी संगनमताने म्हणा, आपसांत कुरघोडी करण्याचे म्हणा किंवा शहर आम्ही चालवतो या एक ईर्ष्येने म्हणा. पण आज वास्तव असे आहे की पुर्वी मागणी केली गेली की खाजगी ठेकेदार नको, महापालिकेने करावी मग जवळ जवळ महापालिकेने एक महिना ऑक्ट्रॉय वसुली केली त्यामध्ये खाजगी ठेकेदारांपेक्षा आपण सरस ठरलो माझ्या माहितीनुसार सात आठ लाखाचा दिवसाला आपल्याला बेनिफिट मिळत होता. आज परिस्थिती अशी झाली की, या साठबारीमध्ये म्हणजे तु-तु, मै-मै के अंदर परिस्थिती ऐसा हो गया की अपना जेब हो गया एकदम रिकामा म्हणजेच खाली हो गया। तिजोरी मे पैसा नही है। इसके उपर जो ऑफिसर बैठे हुए है, एक डेड दो महिनेके अंदर इनका भी पगार होगा की नही इसकी कोई गॅरेंटी नही है। सगळ चांगल आहे. लंकेमध्ये सोन्याच्या विटा आहे. लंका सोनेरी दिसते. सगळ चांगल आहे. परंतु प्रॅक्टीकल काय? आज हजार रूपयाची नोट मा. आयुक्त साहेब किंवा मा. महापौर साहेब तुम्ही सुद्धा व मी सुद्धा तसेच या कॅरेडियरमध्ये बसलेले व्यापारी किंवा पत्रकार कोणीही हजार रूपयाची नोट बनवू शकत नाही. आज खर्च आपल्याकडे आजच्या तारखेपासुन लागलेला आहे. आज परिस्थिती अशी आहे की, एका सेस किंवा ऑक्ट्रॉय या एका प्रश्नामुळे पाणी खात्याची वसुली आपली पुर्ण थांबलेली आहे. हाउस टॅक्स टोटल स्टॉप आहे. म्हणजेच गेल्या तीन चार महिन्यामध्ये किंवा पाच सहा महिन्यामध्ये एक तो निकाल झाल्यानंतर ज्या रोख रकमा आपल्याला मिळायच्या, पाण्याचे बिल तर आपल्याला द्यायला लागणारच आहे नवीन नवीन कामे आपण मागच्या मिटींगमध्ये ५५ करोड रूपयांची कामे आपण काढली. बजेटमध्ये फक्त १० करोडची प्रोव्हीजन आहे. हा जो ४५ करोड रूपयाचा जो डिफरन्स आहे तो आपण कुठून आणणार. एकीकडे सगळे उत्पन्नाचे स्त्रोत बंद झालेत. अहो सावकार तेच बोलतात पैसा भरपूर आहे. खिशात नाही आणा आणि बाबुराव म्हणा तशातली आपली गत आहे कळल का? तर सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, कीतीही काहीही बोलले तरी काही खर नाही सभागृहामध्ये नगरसेवक आहेत. तक्रारी येतात व्यापाऱ्यांचे तुम्हाला एक स्पष्ट सांगतो साहेब, या सभागृहात बसलेला प्रत्येक माणूस, प्रत्येक नगरसेवक, सदस्य हा राजकारणी आहे. मी सुद्धा राजकारणी आहे. बरेचसे राजकारण करतो आम्ही टोकाचे राजकारण होईल तेवढे आम्ही करत नाही. पण तुमच्याकडे जो कोणी आले आहेत व्यापारी, या व्यापाऱ्यांच्या संघटनेचे एक घोषणा वाक्य असते की, राजनीतीसे हमको कोई लेना देना नही पण एक लक्षात ठेवा. सकाळी जेव्हा धुवायला वांदे होतात आणि प्यायला पाणी माणसाला नसते तेव्हा म्हणतात की आपल्या वॉर्डचा नगरसेवक शोधायला लागतात व नाव आठवावे लागते पाणी सकाळी नाही ना. त्यामुळें प्रत्येक आपल्याकडे मोर्चे आणतात. पहिलेच त्यांचे असते की आमचे राजनीतीसे कोई लेना देना नही. अहो हे ऑक्ट्रॉयचे दर हे आम्ही नक्की करतो, ऑक्ट्रॉय लावायचा की नाही ते आम्ही नक्की करतो म्हणजे आम्हाला जनतेने अधिकार दिलेले आहेत. प्रत्येक मोर्चामध्ये ह्या संपुर्ण सगळ्या राजकारणाचा पहिले हे लोक समाचार घेतात ज्यावेळेला तुम्हाला हरकती नोंदवायच्या होत्या. सगळ्यात जेव्हा पहिला लागला त्यावेळेला हे असोसिएशनवाले वीस वीस वर्षापासुन आहेत. मी जरा थोडे मुद्याचे बोलतो कारण ह्या ऑक्ट्रॉय नको म्हणून एकमेव म्हणून मी या सभागृहातील मिलन म्हात्रे कोर्टात गेले आणि पिटीशन फाईल केले. माझ्या मागे उभे राहिलेले एकही व्यापारी माझ्याबरोबर नव्हते हे सुद्धा व्यापाऱ्यांचे दुर्देव आहे जनतेचे पण आहे आणि माझेही आहे. त्या हायकोर्टाच्या केसमध्ये आम्हाला कुणीही साथ दिली नाही एकलकोंडा मी दिड वर्षे लढाई लढत राहिलो परिणामी ती अवधी संपल्यानंतर निर्णय झाल्यास काही मजा नाही पण मला आठवते आर.डी. शिंदे साहेब असताना सगळ्यात पहिल्यात सर्वात जेव्हा ऑक्ट्रॉय लागला त्यावेळेस सेस हवा की ऑक्ट्रॉय लावा त्याच्या त्या नोटीस प्रसिद्ध झालेल्या होत्या तेव्हा तुमच्या असोसिएशन वाल्यांनी काय केले? तो पण मुद्दा तुम्ही घ्या. त्यावेळेला कोणी कोणी हरकती घेतल्या. ज्यांनी हरकती घेतल्या असतील त्यांची आजची भुमिका काय आहे. सभागृह म्हणजे काय खेळखंडोबा वाटला काय? एकदा एक लावायचे आता इलेक्शन आलीत असेंब्लीची म्हणून प्रत्येक शहरामध्ये या ना त्या वातावरणामध्ये काहीतरी वातावरण गढूळ होतच राहणार. काल संपुर्ण रिक्षावाल्यांनी भाईंदरचा रिक्षाचा अख्खा रस्ता बंद

करून टाकला. कारण शुल्लक पन्नास लोकांचा मोर्चा इकडे थेट तुमच्या मिना बिल्डींगच्या इथपर्यंत रस्ता बंद. दिड तास वाहतुक बंद होती. उद्या शहर दुसरीकडून सुद्धा वेठीस पकडले जाते. भाईंदरचे ३ मार्च १९९९ चे आंदोलन आम्ही बघीतले आहे. लोकांशी खेळ खेळू नका रस्त्यावरती जनता येईल त्या दिवशी व्यापारी घरामध्ये किंवा गावी पळतील ते ही आम्ही बघीतले आहे. माझी या संपुर्ण सभागृहाला आजच्या या विषयांतर्गत अशी सुचना आहे की साहेब आपले जे पुढचे अंदाजित खर्च आहेत ते कोणीही आणू शकत नाही. आणि सेसची काय आपल्याला सवय नाही आहे. मला माहिती आहे सेसच्या ऑफिसमध्ये मी काही माणस पाठवली आणि त्यानंतर मी पण स्वतः गेलो आपल्या अधिकाऱ्यांना अजुन त्या फॉर्मचे नंबर माहित नाही. फॉर्मचे इम्प्लीमेंटेशन काय ते माहित नाही. अहो चार अधिकारी ट्रेन होउन चालत नाही. नवी मुंबईचे ही उदाहरण देतो. नवी मुंबईला मोठ मोठे कारखाने आहेत त्यांना बाकीची चिल्लर भिक मागण्याची गरज नाही पण आपली परिस्थिती नाही साहेब आपल्याकडे कारखाने जे आहेत ते बाहेर चालले आहेत. त्याच्यापासुन स्त्रोत, उत्पन्न हे कमी होत चालले आहे आणि आहे त्या इंडस्ट्रीजमध्ये आपल्याकडे लक्ष नाही. त्यामुळे इंडस्ट्रीज कमी व्हायला लागली आहेत या संपुर्ण विषयाअंतर्गत प्रशासनाने जरा अभ्यास करावा मी म्हणालो तसे जवळ जवळ प्रतिमहा ६०-७० करोडचा रूपयाचा तुम्हाला डेफिशिएट आहे आतापर्यंत इतर खात्याची वसुली काय झाली ती बघा. प्रत्येक अधिकाऱ्याने एक महिना यायचे मनपण करत नाही प्रत्येक डायसवर कोणीही अधिकारी भेटत नाही. काम सर्व ठप्प. सेसचे काम चालले आहे दहा दिवस इलेक्शनचे काम चालू आहे. यासर्व गोष्टीमध्ये आपली सर्व वसुली बंद झालेली आहे या व्यापाऱ्यांकडे एकदा बसुन काहीतरी खुलासा करा. एक फायनल करा काहीतरी आणि जर महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असेल त्याच्याबद्दल विचार करून आर्थिक उत्पन्नाचे स्तोत्र कसे वाढतील ते जरा बघा आणि खुलासा करा की सभागृहामध्ये काय काय झाले.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलत आहे की ऑक्ट्रॉय चालू करावा म्हणून या व्यापाऱ्यांनी आपल्याला पत्र दिले आणि मला तरी असे वाटते की, ऑक्ट्रॉय परत चालू होईल. पण ते दिले आहे ते फक्त ५-६ लोकांनीच पत्र दिले असेल आणि जेवढे व्यापारी आहेत ना. तेवढ्याच्या सह्या आणा. नाहीतर परत ते नाटक करतील. त्यांच्यावर विश्वास नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी रिक्षा बंद करतात. बसेस बंद करतात. या लोकांवरती कसला विश्वास यांच्या सगळ्यांच्या पहिल्यांदा सह्या वगैरे घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आज सभागृहामध्ये सेस करिता आढावा घेणे और जो प्रशासनने टीपणी दि हुई है मा. उपायुक्त उपकर विभागके उन्होने अपनी टीपणी किधर भी उल्लेख नही किया है। की खास सेसकर यह जटील समस्या है या इसके लिए ऑक्ट्रॉय लाना चाहिए या सेस इस विषय की चर्चा यहॉ पे करना भी औचीत नही होगा। अभी जो प्रशासनने टीपणी दि हुई है, एक व्यापारी बिझनेस करता है, ऐसा ही सोच समझकर ही बिझनेस करता है लेकीन बादमे लगता है की यह बिझनेस मे उसका नुकसान हो गया इसलिए वह बिझनेस को सुधारता है। या वह इस विषय उस बिझनेस को चेंज करता है। महापालिका यह स्वायत्त संस्था है, लोगोको न्याय देना, लोगोंकी सेवा करना, पाणी, झाड, स्कुल यह सब देना व्यापार नही है। लेकीन आखिर महापालिकाको कहॉसे न कहॉसे उत्पन्न लाकर इस शहर का विकास करनेका होता है, आज उपकर नही ऑक्ट्रॉय चाहिए मै आपको इस सभागृह का उदाहरण देता हू जब मिरा भाईंदर महानगरपालिका मे बिल्डर लॉबी है मा. महापौर साहब, मा. खतगांवकर साहब सुनिए जरा महापौर साहब जब इस शहर के बिल्डर लोगोने अपनी इसी महासभा मे बंदिस्त बाल्कनी. जो बाल्कनी बनाते है बिल्डर बाल्कनी बनाते समय उसपर जो महापालिकामे टॅक्स लगाया था. वह टॅक्स जादा है वह बोल करके वह उनको भरने को जटील जाता है और महापालिका के उत्पन्न नही होता है। और ऐसा प्रस्ताव लाया गया की उस बंदिस्त बाल्कनी का पैसा कम किया जाए और महापालिका के उत्पन्न मे बढोतरी कीया जाए ऐसा प्रस्ताव हमारी इस महासभा मे आया और हमने उसको कम किया। जब बिल्डर भी कोई कम भाव मे फ्लॅट नही देता है। बाल्कनीका भी पैसा लेता है लेकीन महापालिका के उत्पन्न बढनी चाहिए यह हमारा उद्देश था। आज सेस और उपकर अगर हम इस आढावा पोस्ट मार्टम करते है इस आढावा को हम देखते ही तो यहॉपर एक सिक्के के दो पैलू नही होते है। तो सिक्का बेकार होता है। इसमे हम जबाबदार किसको धरेंगे, यह समस्या है। इस विषय मे अगर हमने बोला की प्रशासनने काम नही किया बोल करके सेस लिया तो कलसे प्रशासन जो भुमिका नही ले रहा वह भुमिका लेगा और यहाँ से व्यापारी पलायन करेंगे इसलिए सहाय्यक प्रशासन उस विषय को गंभिरता से नही ले रहे है। जो व्यापारी ऑक्ट्रॉय, सेस भरना चाहता है, लेकीन कुछ ऐसी समस्या है जिसमे शायद उसको समस्या का निदान प्रशासन को नही मिल रहा है इसलिए इसमे बढोत्तरी नही आ रही है। आज इसके पहिले जो आंदोलन हुआ, उस आंदोलन का नेतृत्व भी कोई ना कोई राजकिय पक्षने किया। आज वापस आंदोलन हो रहा है साहब व्यापारीयोको अपनी भुल समझ मे आयी, आयी की नही वह मुझे मालुम नही है। आज भी नवभारत पेपर मे ऐसी न्युज है की स्टील व्यापारीयोंको मा. मुख्यमंत्रीजीसे मिलायेंगे यहा के आमदार मुझफ्फर हुसैन यह न्युज कितनी सच्ची और कितनी झुटी है यह मुझे मालुम नही है, यही विषय जब उपकर के समय जब आंदोलन हुआ हमने व्यापारीको बोला यह महासभा है अगर मा. मुख्यमंत्री आदेश भी देता है

अगर कोई प्रशासन भी आदेश देता है तो इस मा. महासभा मे इसका निर्णय होगा इस मा. महासभा के माध्यमसे ही प्रस्ताव पास होगा मा. मुख्यमंत्री के पास जानेसे मा. मुख्यमंत्री यहॉ के प्रशासन को बोलेगा की इस समस्या का समाधान निकालो यह नही बोलेगा की कलसे ऑक्ट्रॉय लगा दो आज व्यापारीयो को ऐसा लगा की तीन दिनमे ऑक्ट्रॉय आ जायेंगी इसका भी खुलासा प्रशासनको करना पडेगा की ऑक्ट्रॉय तीन दिनमे नही शायद तीन महिना भी लग सकता है। उसका प्रोसीजर है। आज हम निर्णय लेते है यहॉंपर उसके बादमे टेंडर आता है, टेंडर के बादमे मा. महासभा आती है मा. महापौर साहेब आज जो आढावा दिया हुआ है, आज यह विषय नही है, ऑक्ट्रॉय लाना है या नही लाना है।

**चंद्रकांत मोदी :-**

पेपरका बोलीए ना. पेपर मे क्या है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फिर आप बोलिए ना आपको स्टील व्यापारीयों को मा. मुख्यमंत्री यहा लेके जानेका क्या जरूरत है आपका उद्देश क्या है? तो आप कितने पानी मे है इसके पहिले भी आपने व्यापरीयों को गुमराह किया आज भी शहर को गुमराह कर रहे हो।

**जुबेर इनामदार :-**

क्या आप चाहते है की व्यापारीयों की आवाज मा. मुख्यमंत्री तक नही पहुचे, आप नही लेके जा सकते थे इसलिए हम लेकर ज़ा रहे है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ये कडवा सत्य जरा अच्छा नही लगता है। कडवा सत्य पहले सुनीए ना।

**जुबेर इनामदार :-**

पहले सच तो बोलो।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कंधे पर आप बैठे थे। तब आपको मजा आया। और आज कडवा सत्य आपको अच्छा नही लगता। जब कंधेपर व्यापारीयोने बिठाया तो आपको अच्छा लगा। आज जब इस शहर का नागरीक विकास काम से दूर जा रहा है। यहॉ का व्यापारी अपने बिजनेस के लिए जा रहा है। तो इसपर किसी तरहका राजनितीक मे होते हुए यहॉपर इस एकमत होना चाहिए। पर यहॉपर राजकीय द्वेश कोई न करके इस शहरका हमको न विकास करना है। यहॉ के नागरीकोको सुविधा देनी है। उसपर विचार होना चाहिए। आप एक मुख्यमंत्री के पास जा रहा है। एक उपमुख्यमंत्री के पास जा रहा है। मेरी व्यापारीयोंसे विनंती है हमारे व्यापारी भाई यहॉ पर बाहर बैठे है, विनंती है आप आपको प्रतिनिधीत्व मंडळ एक शिष्टाचार के हिसाब से आप सभी लोग जगह बैठीए। इस महासभा मे एकमत से निर्णय होगा। क्योंकी पहले कोर्ट मे कोई नही जाता था। आज हर चीज इस महापालिका की हर चीज कोर्ट मे जाती है।

**जुबेर इनामदार :-**

पहले श्रीगणेशा आपने किया।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कल हमने जकात के उपर निर्णय ले लीया। विषय कोर्ट मे जाएगा तो मा. महापौर मुझे इतना बोलना है जो आढावा दिया है, इस आढावा के उपर किसी तरह का विश्लेषण इसमे प्रशासनने अपनी भुमिका देनी चाहिए के प्रशासनके पास कर्मचारी नही है। प्रशासन के पास यह वसुली करने की ताकद नही है। ऐसा सभी आढावा लेना चाहिए और अपनी आढावा मे आपनी बात रहनी चाहिए। इन्होने किसी बात का उसको दिया नही है। वो पैसा वसुली क्यो नही हुआ। एक साधा उदाहरण देता हू आपको टोटल आपने १५ हजार नोटीस निकाली और उसमेसे ९ हजार नोटीस आपके पास आयी।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आप चाहते क्या हो ये बाताईए ना?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्री. चंद्रकांत बोरसे गट क्र. नंबर ७ उसको टोटल जो फॉर्म दिए थे उसमे ३४५ फॉर्म व्यापारीयोमे बॉटे। उसमेसे ७५४ फॉर्म उसके वापस आए। ५९३ पेन्डीग है और अभी २०० लोगो पर नोटीस निकाली है। उभी भी ३९० पर नोटीस निकालना बाकी है। वह अधिकारी जवाब देगा आपके २०० निकाली ३९९ पर क्यो नही निकाली? इस का उत्तर प्रशासन के पास नही है। इसलीए हमारा ऐसा मत है प्रशासन ऐसा टिप्पणी देने से पहले अपने अधिकारीयोंसे भी जानकारी ले और सही जानकारी सभागृह को दे, के हम असक्षम है। यहॉ पर सेस वसुली करनेमे या हमे ये चाहिए के महापौर साहब आप इस विषय को गांभीर्यसे लिजीए। इसका जल्दीसे निर्णय करना उचित नही होगा। जनता के लिए भी और व्यापारीयोंके लिए भी इसलीए इस सभा के माध्यम से उपको इतना बोलना चाहता हू के प्रशासन की भुमिका पुरी सेस के बारेमे इस सभागृहमे आनी चाहिए। और प्रशासन जब तक अपनी भुमिका स्पष्ट नही करता लोकप्रतिनिधी कोई भी इस विषय पर गंभीर नही हो सकते। इसलीए प्रशासन को पुरी भुमिका रखने दिजीए। बाद मे जो निर्णय ले लीजीए।

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी आप तो गंभीर हो रहे के नही?

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, महाराष्ट्र शासनाला सेसबद्दलचा अहवाल प्रशासनाने आपल्याला पाठवला आहे. आणि माझ्या मते आपली "ड" वर्गातल्या महानगरपालिकेमध्ये एकमेव महानगरपालिका अशी असेल की तो सकारात्मक अहवाल आहे. म्हणजे आम्ही सेसमधून आवश्यक ते उत्पन्न मिळवू शकू अशाप्रकारचा अहवाल तो आपण महाराष्ट्र शासनाला पाठवला असावा असे वाटते. कारण बकीच्या सगळ्या महानगरपालिकांनी सेस की ऑक्ट्रॉय याच्यामध्ये ऑक्ट्रॉय हा पर्याय निवडलेला आहे. आज ते खतगावकर साहेब आम्हाला ते काही फिगर्स दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये ऑक्ट्रॉयशी तुलना केली तर महिन्याला आपण जवळ जवळ ३ कोटीने डेफीशीट आहोत. आणि आता सन्मा. सदस्य जुबेर इनामदार म्हणाले की, फक्त आतापर्यंत शहरात जेवढे व्यापारी आहेत त्याच्यामधले २५ टक्के फक्त सेस भरत आहेत. साधारणपणे ते पण बरोबर आहे ना. २५ टक्केच व्यापारी भरतात का सेस? त्याच्यापेक्षा जास्त भरतात. मग आता आम्हाला प्रशासनाकडून ही माहिती हवी आहे की साधारणपणे एक वर्षभरामध्ये ऑक्ट्रॉयशी तुलना केली तर सेसचे तेवढे साधारणपणे उत्पन्न आपण गाठू शकतो का? आणि आपण या ठिकाणी खतगावकर साहेब इथे लिहलेले आहे की महाराष्ट्र शासनाला जो अहवाल दिलेला आहे त्याचे वाचन आपण सभागृहात.....

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागच्या सभेत त्याचे वाचन झालेले होते. मा. आयुक्त साहेबांनी तो अहवाल स्वतः वाचलेला होता.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला संपूर्ण माहिती पाहिजे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याबद्दलची माहिती आणि अहवालसुध्दा दिला जाईल.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहब, आज से १५-२० साल पिछे लेना चाहूगा। जब अखबारोंकी सुर्खिया हुआ करती थी इन्स्पेक्टर राज और देश के आर्थिक विकास के लिए इन्स्पेक्टर राजको खतम करो। एस्कॉर्ट बिठाने के लिए जो विंडो सिस्टम था उसको खतम करो। और इंदिरा गांधीजी के जमाने मे ये किया गया था की, एक विंडो मे सारा काम करो। जो औद्योगिक घराने है, जो औद्योगिक कारखानेवाले है इनको सरकारी कानुनोके तंत्रसे मुक्त कराके इनको एक्सपोर्ट करने मे बिझनेस करने मे उनको अधिकारी जिसको लाल फिताशाई वर्ड उस समय उसको खतम करो। और अभी उपकर के माध्यम से हमने विकास के गती को रोकने का काम किया है की इसपे इन्स्पेक्टर राज चालू हो गया है। हम बिस साल पिछे जा रहे है। इन्स्पेक्टर राज खतम होना चाहिए। सेस खतम करना चाहिए। ऑक्ट्रॉय लाते है या नही लाते है उसका उत्पन्न कैसे करते है उसकी जिम्मेदारी प्रशासन की है। पर सेस के थ्रु औद्योगिक विकास को रोक रहे है और मिरा भाईंदर महानगरपालिका के उत्पन्न की बात करते है। अगर सेस रहेगा तो मिरा भाईंदर नगरपालिका नही मिरा भाईंदर शहर खुष हो जाएगा। सारे कारखाने बाहर चले जाऐंगे। सेस अहिताकारी रहेगा क्योंकी ये इन्स्पेक्टर राज ला रहा है। ये बात को समझना बहुत जरुरी है।

**प्रशांत पालांडे :-**

खतगावकर साहेब एका प्रश्नाचे उत्तर हवे आहे. या सेसच्या प्रणालीमध्ये आपण ऑक्ट्रायचा जसा माल शहरात यायच्या अगोदर ते ऑक्ट्रॉय वसुल करायचो. याच्यामध्ये आपण व्यापाऱ्यांवर विश्वास ठेवून त्यांच्याकडून जे खरेदीचे कागदपत्र मागवून त्यांच्यावरती आपण तो सेस लावतो. काही पोरिशेबल ॲटम्स असतात म्हणजे उदा. दिवाळीमध्ये फटाके आणतो. ते आणल्या आणल्या आठवड्याभरात कंज्युम होतात. दिवाळीसाठी फॉर इक्झाम्पल मिठाई शहरामध्ये आली ती पण पूर्ण कंज्युम अशा ज्या ॲटम आहेत ज्याचा आपल्याला स्टॉक मिळणार नाही. त्याच्यासाठी आपण कोणती पध्दत लावली. ती थोडी एक माहिती द्यावी.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी साहेब, आजच्या या महासभेत प्रकरण क्र. ८६ उपकर वसुलीबाबत आढावा घेणे या संदर्भातील विषय आज सभेच्या विषयपटलावर आहे. तर सन्मा. सर्व सदस्यांनी, बहुतांश सदस्यांनी या ठिकाणी ऑक्ट्रॉय आणि सेस या विषयाबाबत आपआपली मनोगत या ठिकाणी व्यक्त केली आहे. आणि आपल्या या सभागृहाच्या बाहेर अनेक व्यापारी, नागरीक मोठ्या अपेक्षेने, आतुरतेने या ठिकाणी आजच्या सभागृहात ऑक्ट्रॉय लागणार का? किंवा सेस राहणार याची अत्यंत उत्कंठेने वाट बघत आहेत. राज्य शासनाने "ड" वर्ग महापालिकांना ऑक्ट्रॉय किंवा सेस लावावा हा निर्णय घेण्यास महापालिका सक्षम आहे. असे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेत मिरा भाईंदर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्याला ऑक्ट्रॉय हवा आहे की सेस हवा आहे. या संदर्भातील भुमिका महासभेने घ्यायची आहे. आपण आपल्याला आता दोन्ही अनुभव आलेले आहेत. यापूर्वी आपल्याकडे ऑक्ट्रॉय आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत तत्कालीन नगरपरिषद असताना कर्मचाऱ्यांमार्फत आपण वसुली केली. त्यानंतर आपण

आपल्या खाजगी ठेकेदारामार्फत ऑक्ट्रॉयचे वसुली करण्यासाठी टेंडर दिले. आणि ऑक्ट्रॉय वसुली करत असताना सर्व व्यापाऱ्याचे ठेकेदाराविषयी अत्यंत फार तीव्र रोष होता. आणि त्यामुळे या शहरात व्यापाऱ्यांनी आंदोलने वगैरे केली. आणि त्यानंतर आपण सेस लावला. सेस लावत असताना आपल्याला अनुभव आलेला आहे की आपल्या महापालिकेच्या आस्थापनेवरील जवळ जवळ ५० टक्क्यांपेक्षा जास्त स्टाफ या सेसच्या कामामध्ये गुंतला आहे. त्यामुळे आपल्या महापालिकेतील सर्व कामगार आहेत. त्यांच्यावर विपरीत परिणाम झालेला आहे. सर्व अधिकारी कर्मचारी हे सेस वसुलीमध्ये लागलेले आहेत. असे असूनसुध्दा आपल्याला समाधानकारक सेसची वसुली झालेली दिसत नाही. ते आपण या ठिकाणच्या फिगर्स जाहिर केल्या त्यावरुन असे दिसते की व्यापारी जे आहेत ते ३०-४० टक्के व्यापारी सेस भरत आहेत बाकीचे व्यापारी सेस भरत नाहीत. एकतर आपण सेसची प्रक्रिया सुरु ठेवली. तर आपले जे अधिकारी कर्मचारी आहेत ते त्याच कामात गुंततात त्यामुळे आपल्या या शहराच्या सर्वांगीण विकासावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. कामे काही होत नाही. सर्व नगरसेवकांची ओढ आहे. महापालिकेत नगरसेवक येतात आपले कामकाज करण्यासाठी अधिकारी जागेवर नसतात, कर्मचारी जागेवर नसतात. कुठे गेले तर म्हणे सेसवर गेले. त्यामुळे कामावर विपरित परिणाम होत आहे. तर या संदर्भात शासनाने जे आपणास निर्देश दिलेले आहेत की महापालिका सक्षम आहे निर्णय घेण्यासाठी की आपल्याला ऑक्ट्रॉय लावायचा आहे की सेस पुढे कन्टीन्यु करायचा आहे. तर या संदर्भात सर्व सन्मा. सदस्यांनी अत्यंत गांभीर्याने शेवटी प्रश्न आहे तो आपल्या शहराच्या सर्वांगीण विकासाचा. विकास कसा होईल पैसे आले तर विकास होईल. आणि डायरेक्ट सोर्स ऑफ इन्कम जे आहे ते ऑक्ट्रॉयचेच एक माध्यम आहे असे मला वाटते. माझे वैयक्तीक असे मत आहे की, डायरेक्ट सोर्स ऑफ इन्कम हे ऑक्ट्रॉयच आहे. सेस काय डायरेक्ट सोर्स ऑफ इन्कम नाही. सेसच्या माध्यमातून सन्मा. सदस्य डॉ. राजेंद्र जैन यांनी सांगितले की, इन्स्पेक्टर राज म्हणजे ब्रिटीश काळामध्ये इन्स्पेक्टर राज म्हणजे जे वसुलीचे अधिकार आहेत ते आपण इन्स्पेक्टरला देणार किंवा आपल्या अधिकाऱ्यांना देणार तो अधिकारी जर एखाद्या व्यापाऱ्याच्या घरी गेला किंवा दुकानात गेला तर ती फाईल दाखव जसं म्हणजे रेड पडते इन्कम टॅक्सची किंवा सेस टॅक्सची रेड पडते. तशी रेड आपण टाकु शकतो. त्या नियमाप्रमाणे या सर्व अप्रिय बाबी आहेत. त्यामुळे काय होणार आहे अशा प्रकरणामुळे की आपापसातील संबंध आहेत, जे प्रेमाचे संबंध व्यापाऱ्यां बरोबर आहेत, नागरीकां बरोबर आहेत ते कायम स्वरुपी तुटणार आहेत. त्या संबंधामध्ये त्या ऋणाणुबंधामध्ये निश्चितपणे फार मोठा फरक होणार आहे. आणि एकदा जर संबंध बिघडले तर शहरातील वातावरण देखील बिघडू शकते. माझी आपणांस अशी कळकळीची विनंती आहे की सर्व सन्मा. सदस्य, काँग्रेसवाले काय आपले दुश्मन नाहीत ते आपले सहकारी आहेत. आम्ही सहकारीच म्हणतो त्यांना. तर त्यांनी या संदर्भात निश्चितपणे विचार केला पाहिजे. सर्वांनी शहराच्या विकासासाठी दृष्टीने निश्चीतपणे आपल्याला नागरीकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून व्यापाऱ्यांच्या हिताचा निर्णय घेत असताना पालिकेचं उत्पन्न कसे वाढेल याचा आपण गांभीर्याने सर्वांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. सन्मा. पिठासीन अधिकारी, मा. महापौर यांना मी विनंती करतो की आपण या संदर्भात योग्य तो निर्णय सभागृहाच्या सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून निर्णय घ्यावा. आणि नागरीकांना, व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा ही नम्र विनंती. धन्यवाद.

**जुबेर इनामदार :-**

सेस म्हणजे इन्स्पेक्टर राज आणि ऑक्ट्रॉय म्हणजे गुंडाराज.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, प्रकरण क्र. ८६ बाबत एक सुचना करत आहे. विषय उपकर वसुलीबाबत आढावा घेणे. मिरा भाईंदर महापालिकेत महानगरपालिकेमार्फत जकात वसुली काम केले जात असताना वसुलीचा इष्टांक गाठणेसाठी महापालिकेमार्फत जकात वसुलीसाठी ठेकेदार नेमण्यात आला. जकात ठेकेदारामार्फत जकात वसुल करताना सुरुवातीची काही वर्षे व्यवस्थित चालली असताना ठेकेदराच्या विरोधात व्यापाऱ्यांकडून कमी प्रमाणात तक्रारी येत होत्या. परंतु त्यानंतर जकात आकारणी करताना लादलेले अन्यायकारक जकात दरवाढ व जकात एजंटची दादागीरी व मनमानीमुळे शहरातील नागरीकांनी खरेदी केलेल्या वस्तुंवरती मनमानी जकात आकारणे. शहरात येणाऱ्या बिऱ्हाडाच्या किंवा जुन्या सामानावर झालेली जकात आकारणी बाहेरुन येणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या बॅगांची झडती घेवून आकारलेली जकात नागरीकांची व व्यापाऱ्यांची जकात आकारणीवरुन झालेले वाद मिटविण्यात महापालिकेने केलेली दिरंगाई कारखाने व व्यवसाय व्यापाऱ्याच्या ठिकाणी जकात ठेकेदाराकडून संबंधितांची दप्तर तपासणी करणे. दंडात्मक रक्कमेच्या नावाखाली दहा पटीने जकात लावण्याची शास्ती तसेच त्याच्या कर्मचाऱ्याने रस्तोरस्ती फिरुन जकातीची बिले मागणे यामुळे शहरभर पसरलेला असंतोष व तीव्र नाराजगी होती. जकात ठेकेदाराच्या वागण्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून पुकारण्यात आलेला जकात बंद आंदोलनाला नागरीकांनी मोठी साथ दिली होती. साधारणतः १७ हजार पेक्षा जास्त व्यावसायिक घटक महानगरपालिका क्षेत्रात आहेत. व्यापाऱ्यांच्या बंदमुळे व महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे मिरा भाईंदर महापालिकेत दि. ०१/०९/२००८ पासून जकाती ऐवजी उपकर लागू करण्यात आलेला आहे. उपकर अंमलबजावणी मात्र तीन महिने किंवा शंभर दिवसच पूर्ण झालेले आहेत. या शंभर दिवसात उपकरास मिळालेला प्रतिसाद उत्तम असून मिरा भाईंदर

महापालिका प्रशासनाने केलेले परिश्रम स्वागतार्य आहे. उपकर अंमलबजावणी करण्या संदर्भात अनेक व्यापाऱ्यांच्या संघटनांमार्फत मागणी करण्यात आली होती. उपकर अंमलबजावणी करताना अनेक व्यापाऱ्यांनी व्यवसायकांनी महानगरपालिका प्रशासनाकडून या संदर्भात असलेल्या त्रुटी समजून घेतल्या. वेळोवेळी महानगरपालिकेचे मार्गदर्शन घेतले. मागील तीन महिन्यातील उपकर वसुली पाहता सप्टेंबर महिन्यातील वसुली ३ करोड २८ लाख ४ हजार २३५ रुपये, ऑक्टोंबर महिन्यातील वसुली ३ करोड २७ लाख ९ हजार १३१ रुपये, नोव्हेंबर महिन्यातील वसुली ३ करोड ८३ लाख ४५५ रुपये अशी असून आजमितीस साधारणतः दहा हजार व्यवसायीकांनी उपकराचे नंबर घेतले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उपकर वसुल करण्याच्या धोरणाला महानगरपालिका क्षेत्रात चांगला प्रतिसाद असल्याचे दिसत आहे. आगामी कालावधीमध्ये महानगरपालिका प्रशासनाकडून अजून अधिक परिश्रम केल्यास आपण निश्चत उपकराची वसुली मोठ्या प्रमाणात करु शकू. आवश्यक वाटल्यास मा. प्रशासनाकडून सरसकट उपकर आकारणीस दिलेले अर्जातील अटीशर्तीमध्ये व आवश्यक ते फेरफार करुन छोट्या स्वरुपात किंवा कारागीर म्हणून काम करणाऱ्या मजूर वर्ग व छोट्या व्यवसायीकांना सोईस्कर होईल अशाप्रकारे उपकर आकारणीचे फॉर्म वितरीत करण्यात यावे अशी सुचना या सभेच्या माध्यमातून मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

सबसे पहले तो वैती साहबने जो सुचना मांडी उसका हम विरोध करते है। अहवाल दिया है, उसके अंदरमे सप्टेंबर से नव्हेंबर तक प्रती महिना एव्हरेज ३ करोड के आसपास का तुट बताया है। और उसके उपर उन्होने अहवाल करने मे लिखा है की जवळपास वरील दोन महिने, ही सत्य परिस्थिती, वस्तुस्थिती वाटत नाही. उन्होने स्वयम इस अहवाल मे कहीना कही इस चीज को एक्सेप्ट किया है की ये तुट हो रही है सेस से और जकात के बिच का डिफरन्स आगे भी इसकी भरपाई होना बडा मुश्कील सा लग रहा है। आज शहर के अंदरमे पिछले देड साल से सव्वा साल से विकास के काम हो नही रहे। और अगर यही तुट बरकरार रही तो आगे इस महानगरपालिकामे कर्मचारीयोंका वेतन देना भी मुश्कील हो जाएगा। इस विषय के अंदरमे आगे देखा जाए तो हमारे पास जे.एन.यु.आर.एम. की स्कीम भी है। जिनके अंदरमे हमको अपनी हिस्सेदार बढणी है। अगर यही हालचाल रहा तो आगे हम एक भी स्कीम इस शहरके अंदरमे नही ला पायेंगे। इसी महासभा मे हमने उनके जे.एन.यु.आर.एम. के कही ऐसे ठराव किये है उनके भरपाई के लीए पैसे कहॉ से पैसे लाऐंगे। इसके लिए कही भी इस गोषवारा के अंदर मे उन्होने उल्लेख नही किया है। विकास काम के लिए ये जो तुट हो रही है इसके अंदर विकास काम कैसे किए जाऐंगे। ऐसा कही भी इसके अंदरमे उल्लेख नही है। मेरा इस सदन के अंदरमे महापौर साहब आपसे निवेदन है की, आयुक्त साहब का अहवाल के अंदरमे एकूण अहवाल होना चाहीए की जिसके अंदरमे ये तुट हो रही है इसकी भरपाई हो पाएगी या नही हो पाएगी। सेस और ऑक्ट्रॉय मे जो डिफरन्स आ रहा है उसके उपरके अंदरमे उनके खुदके विचार भी होने चाहिए। क्योंकी शहरको चलाने के लिए एक फंड की आवश्यकता होती है। आज अभी कही लेटर आ रहे है जिनके अंदर वैती साहबने कहॉ की दुसरे असोसिएशन के पत्र आपने नही पढे। निश्चित रुपसे सभी असोसिएशन के पत्र पढने चाहिए की किसने ऑक्ट्रॉय की मॉंग की है, किसने सेस लागु करनेकी मॉंग भी की है। उस सिलसिलेमे मै नवभारत के अंदर मे आयी हुई कल की खबर का उल्लेख करना चाहुंगा की कॉंग्रेस सेवादल के जिल्हाध्यक्ष श्री. हंसुकुमार पांडेजीने स्वयमने एक स्टेटमेन्ट दिया है। मिरा भाईंदर कॉंग्रेस के जिल्हाध्यक्ष और पूर्व नगरसेवक हंसुकुमार पांडेने महानगरपालिका क्षेत्र मे ऑक्ट्रॉय रद्द होने के बाद अब उपकर को भी रद्द करने की मॉंग की है। उन्होने उपकर रद्द होने के बाद शहर के उपर उपकर थोपे जानेपर अन्यायपूर्ण बताया। निश्चीत रुपसे उनको कही ना कही उनको ऐसा महसुस हो गया होगा। जबकी पिछले आंदोलन मे वो भी स्वयम आगे के अंदरमे एक नेता के रुप मे आए थे, डेलीगेशन लाए थे। मेरे को लगता है कही ना कही उनसे समजने के अंदरमे चुक हुई आज उन्होने आज अपनी भूल को सुधारा और मै इनका इस स्टेटमेंट का स्वागत करता हू अगर शहर के हित के अंदरमे स्टेटमेंट दिया है और इन्होने इस उपकर को दुर्भाग्यपूर्ण बताया है तो उनकी भावना का आदर किया जाना चाहिए। सदन इसके अंदरमे सोच समझके निर्णय ले क्योंकी शहरका विकास भी अत्यावश्यक है।

**मा. महापौर :-**

खतगावकर साहेब, आपण खुलासा करावा.

**अनिल सावंत :-**

*सेसवर आजपर्यत या तीन महिन्यामध्ये तुमचे कॅपीटल आणि रिव्हेन्यु एक्सपेसीव्ह किती झाले त्याचा* जरा खुलासा करावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, उपकर वसुलीबाबतचा आढावा या विषयाखाली आज सभागृहामध्ये सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. चंद्रकांत वैतीसाहेब, सन्मा. पाटील साहेब, श्री. कदम साहेब, श्री. सावंत, श्रीम. नयना म्हात्रे श्री. खान साहेब, श्री. पालांडे साहेब, श्री. इनामदार साहेब, स्थायी समिती सभापती, सन्मा. श्री. पाटील साहेब, श्री. मिलन म्हात्रे, सन्मा. श्री. अग्रवाल साहेब, श्री. डॉ. जैन, श्री. शेख साहेब श्री. भगवती शर्माजी अशा २०-२१ सदस्यांनी याठिकाणी विचार मांडलेले आहे. मी जकाती पासून उपकर कसा लागलेला आहे या खोलात जात नाही. पण १ सप्टेंबर २००८ पासून मिरा भाईंदर महापालिकेमध्ये मा. महासभेच्या व मा. शासनाच्या मंजूरीने उपकराची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. वस्तुस्थितीमध्ये राज्यशासनाचा धोरणात्मक निर्णय असा होता आणि कित्येक वर्षापासून व्यापाऱ्यांची मागणी होती की जकात कर रद्द करुन त्याला पर्याय कराची अंमलबजावणी करावी. आणि या मागणीचा विचार करुन राज्यशासनाने पूर्ण राज्यातील "ड" वर्ग महापालिकेमध्ये जकात करा ऐवजी उपकराची अंमलबजावणी करण्याच धोरणात्मक निर्णय मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घेतला होता आणि त्या अनुशंगाने त्याची कारवाई महापालिका स्तरावरती करण्याच्या अनुषंगाने विचार केला असता काही महापालिकेमध्ये जकातीचे ठेके देण्यात आले होते आणि ठेकेदाराची मुदत वेगवेगळया कालावधीमध्ये संपूष्टात येत होती. ही बाब विचारात घेवून त्या त्या महापालिकेच्या डेट निश्चित करण्यात आली होती. परंतु, आपल्या महापालिकेमध्ये व्यापाऱ्यांनी आंदोलन केले आणि व्यापाऱ्यांची बाब विचारात घेवून या सभागृहाने उपकराबाबत धोरण निश्चित केल्यानंतर राज्यशासनाने त्याला आपल्या मागणीप्रमाणे एक महिना पूर्व उपकर लावण्याबद्दल मान्यता दिलेली आहे आणि कायद्यामध्ये १५७, १२७ कलमखाली आपल्याला तसे अधिकार होते आणि व्यापाऱ्यांच्या मागणीचा विचार करता या सभागृहाने तसा निर्णय घेतलेला आहे. वास्तविक १ सप्टेंबर पासून जो उपकर सुरु झालेला आहे. त्यामध्ये प्रशासनाकडून निश्चितच आपल्या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही निश्चित प्रयत्न केलेला आहे. उपकराची ही प्रणाली महाराष्ट्रामध्ये नव्याने आहे. नवी मुंबई महापालिका वगळता अमरावती महापालिकेमध्ये उपकराच्याबाबत प्रयत्न करण्यात आला होता. पण त्या महापालिकेमध्ये अपेक्षीत उत्पन्न न आल्यामुळे उपकराची अंमलबजावणी होउ शकली नाही. म्हणजे ह्या आर्थिक वर्षाच्याही २-४ वर्षापूर्वी परंतु नवी मुंबई महापालिकामध्ये जकातीचा प्रयोगच करण्यात आला नाही. सरुवातीपासून म्हणजे १९९६ पासून त्या ठिकाणी उपकराची अंमलबजावणी करण्यात येत आहे. माझ्या माहितीप्रमाणे नवी मुंबई महापालिकेमध्ये पहिल्या आर्थिक वर्षामध्ये त्यांचे उत्पन्न ३०-३५ कोटी पर्यंत होते. आज तो २०० कोटीच्या वर आहे. म्हणजे उपकराची प्रणाली आणि जकातीची प्रणाली ह्या जर कराच्या बाबतीत आपण विचार केला. दोन्ही करांचा बेस हा सारखाच आहे. ज्या शहरामध्ये मालाची आयात होते, त्या मालाचा वापर केला जातो, उपयोग केला जातो किंवा विक्री केली जाते किंवा खप होतो त्याच्यावर महापालिकेने आणि राज्यशासनाने ठरवून दिलेल्या दरसुचीप्रमाणे आकारणी केली जाते. जकातीमध्ये हे महापालिकेच्या टेरोटेअर म्हणजे बाहेरुन माल आयात होणाऱ्या पॉईंटला नाके स्थापन करुन मालाची तपासणी करुन मालाच्या बाजारी मुल्यावर महापालिकेने आणि राज्यशासनाने जे दर निश्चित केलेले आहेत अनुज्ञेय दराप्रमाणे त्याच्या मुल्यांकनाच्या परसेन्टेजमध्ये जकात वसुल करुन माल शहरात सोडला जातो. फक्त उपकरामध्ये मालाची कोणतीही अडवणूक न करता त्याठिकाणी त्याची विल्हेवाट लावून उपकराची वसुली न करता उपकराचा भरणा व्यापाऱ्याकडून होणे अपेक्षीत आहे. जकात हे प्रशासनाकडून वसुल केले जात होत, महापालिकेकडून वसुल केलं जात होतं. परंतु उपकर हे थोडी सुधारीत प्रणाली आहे. सुरुवातीला जे व्यापारी शहरात माल आणत होते ते उपकर देवूनच शहरात माल आणला जात होता. पण उपकरामध्ये थोडी उलटी परिस्थिती आहे. त्याने शहरात माल सरस आणायचा जो माल शहरात मी जकातीसाठी व्याख्या सांगितली तीच व्याख्या यांना लागू आहे. दरसुध्दा समानच आहे फक्त महापालिका सरळ वसुल न करता व्यापाऱ्यांनी त्याची लेखी ठेवणे अपेक्षित आहे. ही लेखा आधारीत पध्दत आहे. आणि त्यांनी त्यांच्या होणाऱ्या लेखांच्या मुल्यांकनावर महापालिकेच्या दरानुसार महापालिकेकडे तो होणारा उपकर देणे अपेक्षित आहे. त्यासाठीसुध्दा कायद्यामध्ये दहा दिवसाची मुदत दिलेली आहे. चालू महिन्यामध्ये जितका माल आयात करायचा आणि जे उपकराचे देय मुल्य आहे पुढच्या महिन्याच्या दहा तारखेपर्यंत महापालिकेकडे जमा करणे अपेक्षित आहे. आणि यामध्ये महापालिकेने गोषवाऱ्यात दिल्याप्रमाणे व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी शहरामध्ये दहा बँकेमध्ये अकाउंट्स काढले आहेत. आणि सुलभतेने त्याची वसुली व्हावी म्हणून आपण तसा धोरण त्यामध्ये ठेवलेले आहे. यामध्ये जकातीमध्ये व्यापाऱ्यांचा मालाचा जो काही आवक शहरात होतो तर त्या वसुलीमध्ये जी तुट आहे. व्यापारी महापालिकेला भूल देवून किंवा परस्पर माल आणतील अशी परिस्थिती फार कमी प्रमाणात आहे. मी म्हणत नाही की तिथे १०० टक्के जकात वसुल केली जात होती. पण त्याचे प्रमाण फार नगण्य आहे. परंतु, या उलट व्यापाऱ्यांनी त्यांच्या गोदामात किंवा त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी माल आणल्यानंतर व्यापाऱ्यांनी जे लेखे ठेवून त्यांनी जे डिक्लेरेशन करणार आहेत त्याच्यावर त्यांनी त्या कराचा भरणा करणार आहे. आणि त्यांनी तो कराचा भरणा व्यवस्थित करावा अनुज्ञेय कर त्यांनी भरणा करावा यासाठी जकातीपेक्षा जास्तीचे अधिकार प्रशासनाला या अधिनियमाखाली दिलेले आहेत. कदाचित व्यापाऱ्यांना या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा डॉ. जैन साहेबांनी सांगितल्या प्रमाणे जाचकपणा वाटत असेल किंवा भिती वाटत असेल. मी आपणाला सांगु इच्छितो आपण या अधिनियमातील जे जाचक शक्ती आहेत किवा तरतुदी

आहेत त्या अंमलबजावणीचा रिस्टेज अजून पुढेच आहे. आणि तत्वतः ज्या नोटीसा दिल्या आहेत त्यांचे लेखे अपेक्षित करतो. तर व्यापारी ऐवढे घाबरायला लागलेत. तर यामध्ये दुसरी एक बाब अशी झाली आहे. इतर महापालिकेमध्ये हा प्रयोग यशस्वी न होता तिथे जकातच सुरु झाली आहे. त्याचाही परिणाम इथल्या व्यापाऱ्यांवर झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. तर यामध्ये जे उत्तर अपेक्षित होते साधारणत सदस्यांनी जे प्रश्न इथे मांडलेले आहेत. माझ्या या चर्चेतून मी सर्वांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो. यामध्ये ०१ सप्टेंबर २००८ पूर्वी जी जकात प्रणाली याठिकाणी होती त्यामध्ये महा महापालिकेला ६ कोटी ७१ लाखांचे उत्पन्न अपेक्षित होते. म्हणजे वार्षिक आपल्याला प्रतिमाह ८० कोटी ८३ लाखाचे उत्पन्न अपेक्षित होते. तर त्याप्रमाणे विचार केल्यास उपकराचे उत्पन्न साडेसहा कोटीच्या जवळपास होणे अपेक्षित होते. किंवा ६ कोटी तरी होणे अपेक्षित होते. का तर यामध्ये पहिल्या वर्षासाठी शासन १५ टक्के सुट देणार आहे. परंतु, आपल्या शहराची जर बाब विचारात घेतली तर यामध्ये आजच्या तीन महिन्याचा कालावधी होउन गेलेला आहे. तीन महिन्याच्या कालावधीच्या देयक कालावधीमध्ये जो मी तुम्हाला गोषवारा दिलेला साडेसात कोटी रुपयाच्याही उपर जावून ९ कोटी उपकर वसुल केलेला आहे. म्हणजे साधारणतः जर महिनेवारी विचार केल्यास ३ कोटीचा तो ॲवरेज आपल्याला सहज पडेल. म्हणजे मी माझ्या गोषवाऱ्यामध्ये दोन महिन्यासाठी ५.९२ कोटीची तुट दिलेली आहे. म्हणजे या तीन महिन्यामध्ये साधारणतः २० कोटी १३ लक्ष रुपयांचे उत्पन्न होणे अपेक्षित होते. पण आपल्याकडे ९ कोटी उत्पन्न झालेले आहे. १० कोटी ८० लाखाच्या जवळपास त्याच्यामध्ये आपल्याकडे ही वस्तुस्थिती तुट झालेली आहे. पण ही तुट भविष्यातसुध्दा भरुन निघणार आहे. पण ती किती प्रमाणात भरुन निघेल ते आज मी जसे गोषवाऱ्यात म्हटलेले आहे आज कोणीही त्याचे भाकीत करणे शक्य नाही. पण वस्तुस्थिती ही आहे देय तारखेनंतरसुध्दा सप्टेंबर महिन्याचासुध्दा व्यापाऱ्यांचा भरणा अजून चालू आहे. आमच्या ज्या कारवाई सुरु आहेत त्याचा तो एक भाग आहे. भविष्यात मार्चच्या नंतर म्हणा किंवा पुढच्या आर्थिक त्याचा फेर एसीसमेंट होणार आहे. ह्या टॅक्सची प्रणाली हे विक्री कर टॅक्सची जी प्रणाली आहे त्याच्याही साम्य आहे. म्हणून व्यापाऱ्यांना हे माहित आहे. म्हणून सप्टेंबर महिन्याचा भरणा अजून बंद झालेला नाही तो चालू आहे. तरीपण तो भरण्याचा जे प्रमाण आहे ज्याप्रमाणात भरायला पाहिजे तो नाही आहे. म्हणून आपली तुट पूर्ण भरुन निघेल का हे आज तरी सांगता येत नाही. तर या प्रणालीमध्ये मा. वैती साहेबांनी सांगितलेले आहे की अजून व्यापाऱ्यांची नोंदणी अपेक्षीत आहे. आम्ही उपकराची अंमलबजावणी करण्याच्या पूर्वी पूर्ण शहराचा सर्व्हे दोन वेळेस केला होता. मालमत्ता कराच्या विभागाची व्यवसायीकांची माहिती घेतली, नगररचना विभागाची आपण माहिती घेतली. जे व्यापारी संवर्गाचे गाळे आहेत राज्यशासनाच्या विक्री कर विभागाकडून जे ५ लाखाच्या वर अनुज्ञेय लायसन्सधारक आहेत त्यांची यादी घेतली. शॉप ॲन्ड एस्टीब्लीशमेंटचे जे ऑफीस आहेत, गुमास्ते लायसन्स त्यांची यादी घेतली आणि या सर्वांच्या आधारे आपल्या शहरातील व्यवसाय धारकांची यादी साधारणतः ३० ते ३८ हजारापर्यंतची आहे. पण ॲक्चुअली कार्यन्वीत व्यवसाय पूर्ण नाहीत. अजून गाळे खुप पडून आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून ते ॲग्रीकेट केलेली यादी होती. परंतु, उपकराच्या अंमलबजावणीसाठी फॉर्मचे वाटप केले ते साधारणतः १७ हजाराच्या वर आमचे फॉर्म गेलेले आहेत. पण नोंदणी हा गोषवारा देत असताना ९२०० च्या आसपास गेलेले होते पण आज ती ११ हजाराच्या जवळपास नोंदणीची संख्या पूर्ण झालेली आहे. भविष्यात अजून एक दिड दोन हजारच्या जवळपास नोंदणी होईल पण टॅक्सच्या प्रणालीमध्ये आपल्याला सांगु इच्छितो. शहरात जरी १७ हजार व्यापाऱ्यांची नोंदणी झाली पण या १७ हजार व्यापाऱ्यांकडून ८० कोटी उत्पन्न करणे अपेक्षित आहे. ते २० टक्के व्यापाऱ्यांकडून ९० टक्के उपकर किंवा जकात वसुल केला जातो. का तर त्याचे जे प्रमाण आहे, म्हणजे एकूण व्यापाराच्या २० टक्के व्यापारातून ९० टक्के टॅक्स येणे अपेक्षीत आहे आणि २० टक्के टॅक्स हे उरलेल्या ८० ते ९० टक्के टॅक्स व्यापाऱ्याकडून येणे आहे. म्हणजे ती संख्या ही फार महत्वाची नाही. म्हणजे एक जर इंडस्ट्री असेल तर ती वर्षाला जर दहा पाच लाख आपल्याला जर महिन्याला उत्पन्न देत असेल तर त्याचे रिटेलर व्यापारी हजारो होतील तेवढ्या एका व्यापाराच्या संबंधात ह्या संख्येबद्दल आपण फार कन्फूज होण्याची गरज नाही. मी आपल्याला सांगु इच्छितो नवी मुंबई महापालिकेची दहा वर्षाच्या नंतर आजची संख्या १७-१८ हजार आहे. त्या मानाने आम्ही जे १०-११ हजारची संख्या केली आहे. निश्चितच मेहनतीने केली आहे आणि त्याला व्यापाऱ्यांचे देखील सहकार्य मिळाले आहे. पण प्रयत्न यामध्ये मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे जकातीमध्ये लेखा आधारे काही नाही आहे. जकातची पावती पक्की आहे की कच्ची आहे हेसुध्दा आपण बघत नव्हतो. मार्केट मुल्यांकनप्रमाणे आपण जकात वसुल करत होतो. पण ह्या कायद्यामध्ये व्यापाऱ्यांनी लेखे ठेवणे हा कंम्पलसरी बाब आहे. लेखे ठेवणे म्हणजे काय करणे जो माल त्यांनी आपल्या शहरात आयात केला जातो. आयात रजिस्टर ठेवणे अपेक्षित आहे. सन्मा. पालांडे साहेबांनी सागितले आहे की दुध असेल किंवा फटाके असतील किंवा जे पेरीसेबल गुड्स आहेत ते त्यांनी नोंद नाही केले तर कसे होईल. निश्चितच त्यांनी जर पक्के बिल नाही आणले आणि आपल्या ॲथोराईज चेकने तो माल खरेदी नाही केला आणि त्यांनी रेकॉर्डला जर नोंद नाही ठेवली तर काय करणार? तशा परिस्थितीत आपण जे चेकनाके केलेले आहेत आपल्याला सुचना मिळते त्यावेळेस तसे माल आम्ही पकडणार आणि त्याला १० पट वसुल करण्याचे आम्हाला अधिकार आहेत. तसे आम्ही १४ प्रकरणे आम्ही या ठिकाणी केलेली आहेत. २२ लाख रुपये आम्ही दंडात्मक या कमी

कालावधीतसुध्दा वसुल केलेले आहेत. पण अपेक्षा अशी आहे व्यापाऱ्याने स्वतःच्या विश्वासाने ती रक्कम भरणे अपेक्षीत आहे. आणि म्हणून त्यांनी व्यवसाय हे ॲथोराईज व्यवसाय करणे अपेक्षित आहे. म्हणजे एकादा व्यापाऱ्यांनी चेक देऊन जर माल घेतला असेल आणि तो पेरीसेबल असेल त्याची बँक स्टेटमेंट ज्यावेळी आम्ही कन्फर्मेशन करुन अमुक चेक कशाला दिला होता म्हणजे घेणाऱ्यांची यादी माल घेतल्यानंतर विकणाऱ्यांची यादी हे एक रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. बँक स्टेटमेंट ठेवणे अपेक्षित आहे, आयात मालाचे रजिस्टर ठेवणे अपेक्षित आहे. विक्री मालाचं रजिस्टर ठेवणे अपेक्षित आहे. हा बर्डन इथल्या व्यापाऱ्यांना वाटत आहे. आणि साधारणतः मार्केटमध्ये की मी ह्या स्टेजवर बोलणं वस्तुस्थिती नाही. पण जो अलिखीत व्यवसाय केला जातो ती रक्कम जकातमध्ये १०० टक्के वसुली केली जात होती. नेट वसुली केली जात होती. पण याच्यामध्ये आम्हाला या कारवाया करुन वसुल करावी लागणार आहे. म्हणून ज्यावेळेस आमच्या कारवायाच्या अनुषंगाने पंचनामे, नोटीसा ह्या ज्यावेळेस आम्ही व्यापाऱ्यांना द्यायला जातो त्यावेळेस त्यांना ते जाचक वाटतं डॉ. साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे. नाहीतर आपण तसे नाही केले तर आपली अपेक्षीत रक्कम वसुल होणं अवघड आहे. कारण की लेखे त्यांनी सुधारीत नाही केले. लेखे अद्यावत नाही ठेवले, केलेला व्यवसाय प्रामाणिकपणाने त्याच्यात नोंद नाही केला तर परसेन्टेज वसुली करणं, आपल्याला मिळणं दुरापात आहे. आणि या सर्व कामकाजासाठी एक आपण अद्यावत कार्यालय सुरु केलेले आहे. त्यासाठी १०० कर्मचाऱ्यांचे आपण नियोजन केलेले आहे. आणि या कामकाजामुळे महापालिकेच्या इतर कामकाजावर सुरुवातीला दोन-तीन महिने निश्चितच परिणाम झालेला आहे. यामध्ये योगायोग इलेक्शनचेही कामकाज निघाले होते. त्यामध्येसुध्दा १०० अधिकारी आमचे इलेक्शनच्या कामकाजात गेलेले होते. त्यामुळे विभागामध्ये साहजिकच अधिकारी नसतील ही वस्तुस्थिती होती आणि जे अधिकारी काम करतात ते अधिकारीसुध्दा या प्रणालीमध्ये नव्याने आहेत. तर यामध्ये आम्ही जो प्रयत्न केलेला आहे आणि त्या प्रयत्नाच्या नंतर पुढे जे त्याचे रिअसेसमेंट करुन जे उत्पन्न करणे अपेक्षित आहे त्याचा आज उत्पन्नात भर किती निघेल हे ह्या ठिकाणी आज तरी मला सांगणे शक्य नाही आहे? पण जर व्यापाऱ्यांनी याला साथ दिली, त्यांचा बिझनेस ॲथोराईज केला तर निश्चित आपले उत्पन्न होउ शकते. पण व्यापाऱ्यांनी याला साथ नाही दिली तर मग आपल्याला कारवाई करुन उत्पन्न गाठण्याचा पर्याय नाही आहे. ही या मागची प्रशासनाची भूमिका आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जो आता आमच्याकडे गोषवारा दिलेला आहे. याच्यामध्ये मी अगोदरही आपल्याला सांगितले की, साडे सात करोडचे उत्पन्न दाखवल्याने निश्चितपणे आणि दुसरीकडे आपण ६ करोड ६० लाखाचे दाखवलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यामध्ये अजून एक मुद्दा राहिलेला आहे. यामध्ये दहा बँकेतून ती रक्कम गोळा केली जाते. दररोजच्या दररोज जी बँकेत चलन येतात दुसऱ्या दिवशी ते महापालिकेत जमा केले जातात. आणि त्या चलनची आम्ही आपल्या कंम्प्युटरला पोस्टींग करुन त्या संबंधीत फाईल ते चलन लावले जातात. ज्यावेळेस गोषवारा आपल्याकडे दोन महिन्याचा देण्यात आला होता. त्यावेळेस बँकेचे जे अंतिम फिगर्स आहेत ते साडे सात कोटीचे आहेत. आणि जे चलन आमच्याकडे प्राप्त होउन ती जी विगतवारी पोस्टीग झाली होती, गटनिहाय ती ६ कोटी ६० लाखाची पोस्टींग झाली होती. वस्तुस्थिती वसुली साडे सात कोटीच झाली होती. पण पोस्टींगचे काम त्यावेळेस.....

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण पूर्ण सप्टेंबर महिना ऑक्टोंबर नोव्हेंबर ३० पर्यंत याच्यामध्ये डिटेल दिलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बरोबर आहे. त्यामध्ये दोन महिन्यामध्ये एकूण वसुली साडेसात कोटी होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, याच्यामध्ये तीन महिन्याचे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, याच्यामध्ये काय आहे एक महिन्याचे कामकाज पूर्ण संपल्यानंतर पुढच्या महिन्यात पैसे भरले जातात.

**प्रेमनाथ पाटील :-**

बरोबर आहे ना. सप्टेंबर ऑक्टोंबर, नोव्हेंबर ना. आकराव्या महिन्यापर्यंत आपण दिलेले आहे. ३१/११ आपण दिलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नोव्हेंबरचे पैसे आता आलेले आहेत. ते गोषवारा दिले वेळेस आलेले नव्हते. नोव्हेंबरचा पूर्ण महिना होईपर्यंत नोव्हेंबरचे पैसे कोणी भरणार नाहीत. ज्यावेळेस गोषवारा दिला होता त्यावेळेस नोव्हेंबरचा महिना पूर्ण झाला नव्हता. १८ तारीख होती त्यादिवशी. म्हणून तो नोव्हेंबरचा महिना त्याच्यात आलेला नाही. आज

तारखेला नोव्हेंबर महिन्यापर्यंत विचार केला तर मी विरोधी पक्षनेत्यांना आकडा दिलेला आहे ९ कोटी रुपये आपल्याकडे वसुल झालेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्वांनाच द्या ना आकडा, एकाच व्यक्तीला का देता?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्वांनाच सांगतोय.

**प्रशांत पालांडे :-**

खतगावकर साहेब, आता तुम्ही सेस आणि जकात ह्याच्यामध्ये तुलना करुन काही गोष्टी समजावून सांगितल्या. त्याच्यामध्ये हे सगळे सांगताना एक गोष्ट तुम्ही खुबीने सांगायचे टाळले की, भविष्यात तुम्ही कितीही प्रयत्न केले, तुमच्या कर्मचाऱ्यांनी कितीही प्रयत्न केले तरी जकात ऐवढं उत्पन्न सेसला मिळणं अशक्य आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

निश्चीत तेवढं तरी कधी मिळणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

माझा अंदाज आहे म्हणजे कॅल्क्युलेशन केलं तर मला वाटत जकात आणि सेस यांच्यामध्ये जर कॅम्पेरिजन केल तर जकातीच्या मानाने ६० ते ७० टक्के आपण सेसची वसुली करु शकतो. कारण व्यापारी कितीही म्हणत असले तरी ओपन सिकरेट आहे की संपूर्ण बिझनेस व्हाईट दाखवत नाही. शंभर रुपयाची खरेदी असतील, २५ टक्के मार्जीन पकडून १२५ रुपये त्याची विक्री झाले पण जर व्यापारी १०० रुपये त्याची विक्री दाखवत असेल तर खरेदी समजा ७५ रुपये असेल तर तिथेच आपण २५ टक्के मागे पडतो. आणि ओपन सिक्रेट आहे. साधारणपण असेच अकाउंट, व्हाईट अकाउंट मेन्टेन केले जाते. माझा अंदाज आहे भविष्यात आपण कितीही जोर लावला तरी जकात आणि सेस याच्यामध्ये ३० ते ४० टक्क्यांच अंतर कायम राहील. त्यामुळे आपण पण प्रशासनाने याच्याबद्दल योग्य तो विचार करावा.

**अरुण कदम :-**

महत्वाचा मुद्दा असा आहे की, जकात असं आहे की आता जे व्यापारी आले आहेत ते जास्त करुन स्टील व्यापारी आले आहेत. आणि स्टीलचे जे जकात आहे ते फक्त पाटा जो आणतात ते लोक तेव्हा ऑक्ट्रॉय भरायचे आणि आजही ते सेस भरतात. आणि त्यावेळेला ह्या व्यापाऱ्यांना ऑक्ट्रॉय लागत नव्हती. कारण त्यांचे जे स्मॉल स्केल आहे ते इंटरनलीच त्यांचा बिझनेस चालायचा त्यामुळे त्यांना ऑक्ट्रॉय हा विषय कन्सेप्टच नव्हता. आणि सेस आल्यामुळे त्यांना त्रास होत आहे. पुन्हा जेव्हा ऑक्ट्रॉय तुम्ही लावाल तेव्हा फक्त पाटेवालेच ऑक्ट्रॉय भरणार आहेत. ह्यांच्याकडून तुम्हाला काही उत्पन्नच होणार नाही. ऑक्ट्रॉय लावल्या नंतरही तुम्हाला त्यांच्याकडून काही उत्पन्न होणार नाही. कारण ते ऑक्ट्रॉयच्या लिमिटमध्ये येतच नाही. कारण ते तिथेच माल घेतात तिथेच त्यांना परत देतात ते लेबर जॉब करतात. त्यामुळे हा ही विचार करा. कारण पाटेवाले आहेत ते आजही सेस भरतात, तेव्हा ऑक्ट्रॉय भरत होते. त्यांच्यापासून उत्पन्न तेव्हाही होत होते आणि आजही होत आहे. तर ह्याच्या परीने आपण विचार करावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा भाईंदर शहरामध्ये मागच्या सभेमध्ये जी चर्चा झाली होती. सन्मा. प्रफुल्लजी पाटील ह्यांना फार चांगल्या पध्दतीने हा मुद्दा मांडलेला होता. त्यांनी एक प्रश्नावली आपल्याला दिली होती. आणि त्या प्रश्नावलीचे उत्तर देण्याचा प्रयत्न आम्ही या ठिकाणी केलेला आहे आणि ते दिलेले आहे. आपल्या शहरातील जो जकात वसुली किंवा उपकर वसुली आहे. कदम साहेब, तुमचा मुद्दा मी ......

**तुळशीदास म्हात्रे :-**

खतगावकर साहेब, हजारो नागरीक हैराण होत होती. मी वाचलेले आहे. नगरसेवकांना वारंवार जकात नाक्यावर जायला लागत होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही. साहेब जकात किंव्हा उपकर हा वेगळा विषय आहे. त्यांनी जो पाटयावाल्यांचा मुद्दा मांडलेला आहे की, पाट्यांचा टोटल उत्पनाशी २५ ते ३० टक्के संबंध आहे. एकूण आपले जे उत्पन्न होते. ३० टक्के उत्पनाचा भाग आहे. आणि जकातीच्या वेळेस जे पाटा आयात करणारे होते. जे ७०-८०-१०० आहेत त्यांनी ते ती जकात भरत होते आणि प्रोसेसिंगला देत होते. आत्ता सुद्धा आमच्याकडे जे पाटा आयात करतात. त्या शंभर दिडशे व्यापाऱ्यांनी आमच्याकडे नोंदणी केलेली आहे. पहिल्या महिन्यात केलेली नव्हती. आता जवळपास सर्वांनी केलेली आहे. आणि तेच उपकर भरतात पण त्यांचा प्रश्न योग वस्तुस्थितीने सांगायला काही हरकत नाही. त्यांचा जो व्यवसाय आहे. त्यांचे जे चलन्स आहेत त्यांची परचेसिंग मुंबईची असते. माल इथे खाली होतो पण आम्हाला भिती काय आहे की, तो माल डे बुकला घेतील की नाही? म्हणून आम्ही सॅम्पल म्हणून चेकनाके लावलेले आहेत. म्हणजे आपले जे ३० टक्के अपेक्षित उत्पन्न येणे आहे. आजच्या पाट्याचा व्यवसायप्रणाली मुळे आपल्याला त्याच्यामध्ये थोडे नुकसान होते.

**अरूण कदम :-**

शंभर दिडशे जण आहेत. तर त्यांच्यावर तुम्ही कंट्रोल करू शकता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आमची कामे चालू आहेत ना.

**अरूण कदम :-**

कारण जे इतर व्यापारी आहेत. ते भरपूर आहेत त्यांची संख्या जास्त आहे. आणि त्यांना तो ऑक्ट्रॉय किंवा सेसचा त्रास आहे. कारण त्यावेळेला ऑक्ट्रॉय लागतच नव्हती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, मी प्रामाणिकपणाने सांगतो शहरामध्ये जे कंपनी ओरिएन्टेड ऑथोराईज्ड बिझनेस आहेत. बँक चलन किंवा चेकने बिझनेस होतात. त्यांना उपकर ही सर्वात चांगली प्रणाली आहे. जे बँक प्रणालीने व्यवसाय होतात त्यांना उपकराचा काहीच त्रास नाही. आणि जे लोकल परचेसर आहेत आणि उपकराबद्दल त्यांचे ज्ञान अजुन कमी आहे. त्यांना यांचे डे बुक मेन्टेन करायला लेखी लिहायला त्रास वाटतो.

**अरूण कदम :-**

साहेब, आता जे व्यापारी आहेत त्यातले ९० टक्के व्यापारी फक्त लेबर जॉब करतात. ते कोणतेही परचेस करत नाहीत किंवा सेलही करत नाहीत. फक्त लेबर जॉब करून त्या मालकाला परत देतात. त्यांनी तेव्हाही ऑक्ट्रॉय लागत नाव्हती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते जे लेबर जॉब करतात, त्यांनी जितके लेबर प्रोसेस करतात. त्याचे डे बुक ते लिहित नाहीत. ती अडचण आहे. त्यांनी लिहायला पाहिजे ते लिहू शकत नाहीत.

**अरूण कदम :-**

त्यांनी जर डे बुक लिहिले तर त्यांच्याकडून तुम्ही सेस घेणार नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांनी काही तरी त्यांना ज्यांनी माल दिला असेल त्यांच्याकडून घेणार. पण आम्ही त्यांना कसे काय सोडू शकणार?

**अरूण कदम :-**

तो पाटेवाला सेस भरतोच ना? कारण माल एकदाच येतो. पाटा येतो. आणि त्याचा फिनिश गुड होउन बाहेर जातो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आमने सामने चर्चेमध्ये जे पाटेवाले आहेत, त्यांचे सर्वांचे शंभर दिडशे लोकांचे ऑयोराईज दुकान नाही. आयडेन्टीफाय शोरूम नाही. त्यांची बिले मुंबईची असतात आणि आपल्या या प्रोसेसरला माल देतात. काही इथले स्थानिकही आहेत. पण श्री. पालांडे साहेबांनी चर्चा केल्याप्रमाणे त्यांनी डे बुक लिहिला नाही तर महिन्याच्या नंतर आपण ती वसुली कशी करणार?

**अरूण कदम :-**

साहेब मग असे होते की, शंभर जणांमुळे हजारो व्यापाऱ्यांना त्रास होतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी जकात किंवा उपकर म्हणत नाही. जे बारकावे आहेत. आपली ती चर्चा होते.

**अरूण कदम :-**

मी बारकाव्यांबद्दलच बोलतो. जकात किंवा उपकर सांगत नाही की, त्यावेळेला जेव्हा जकात होती तेव्हा या व्यापाऱ्यांना जकातीशी काही संबंधच नव्हता. त्यांच्याकडे कोणीही जात नव्हते, प्रश्न येत नव्हता. आज सेस लावल्यामुळे एकतर पाट्यावाल्यांकडून तुम्ही सेस घेता. आणि त्याच्यानंतर या व्यापाऱ्यांकडून तुम्ही सेस घेता. म्हणजे तो डबल त्रास आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्या पाट्याच्या प्रोसेस करणाचा व्यापाऱ्यांनी, जॉब वर्क करणाऱ्यांनी पाट्यावाल्यांकडून माल घेउन ज्याच्यावर सेस नंबर आहे. त्या पावत्यांची नोंद त्यांनी जर ठेवली असेल तर त्याच्यावर डबल भरायची गरज नाही.

**अरूण कदम :-**

साहेब, म्हणून हा गैरसमज झालेला आहे. त्याच्यामुळे ते व्यापारी त्रस्त आहेत. तर त्यांना तुम्ही एकदा समजावून द्या. म्हणजे आंदोलन होणार नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, पुर्वी जेव्हा ऑक्ट्रॉय बाबत, सर्व व्यापाऱ्यांनी आंदोलन केले होते. परंतु, जे मोठे व्यापारी आहेत त्यांनी उपकर लावण्यासाठी आग्रह धरला होता. जे छोटे व्यापारी आहेत, त्यांना काही कळतच नाही. आज जे पान बिडी विकणारे लोक आहेत. त्याचे प्रत्येकाचे कमीत कमी दहा हजाराचे

उत्पन्न असतेच. त्यांनी उपकर भरायलाच पाहिजे. असा आपला नियम आहे.. परंतु, तो नियम त्यांना समजतच नाही. त्यांना ऑक्ट्रॉय काय आणि उपकर काय काहीच नाही. परंतु जे मोठे व्यापारी आहेत, ह्या लोकांनीच उपकराचे केले होते. कारण त्यांना ऑक्ट्रॉय ठेकेदाराचा जाच होता. क्ष्याला जर आपण उपाय सुचवले की, आत्ता जो ऑक्ट्रॉय ठेकेदार होता. तो व्यापाऱ्यांना कशामध्ये हैराण करायचा तर त्यांनी जी बिले आहे तर तो बोलायचा की, हे २००/- रूपयांचे बिल आहे. हे पाच हजाराचे आहे. तर तो बोलायचा की, हे दहा हजाराचे बिल आहे. तर ते हे करत होते त्या कारणास्तव हे जाचक होते. आपण जर आपला अधिकारी नेमला जे व्हॅल्युएशन आहे, व्हॅल्युएशन करण्यावरूनच मेन भानगड होत होती. आणि त्याकरिता व्यापारी त्रस्त होते. जर आपण ऑक्ट्रॉय चालू केला तर व्हॅल्युएशन करण्याचे काम हे मुख्य आहे. हे मुख्य काम जर आपल्या अटीशर्ती मध्ये आपल्या महानगरपालिकेकडे ठेवले आणि आपला एक चांगला अधिकारी तिकडे नेमला. तो व्हॅल्युएशन करून देणार. तो अधिकार त्या ठेकेदाराला असणार नाही. आणि आपण जर चालू केला तर आम्हाला त्याचे काही नाही. पण व्हॅल्युएशन जे आहे ते फक्त आपल्या महानगरपालिकेनेच करावे. त्याच्यावर नगरसेवकांची एक कमिटी स्थापन करावी ते नगरसेवक त्याच्यावर निर्णय घेतील की, हा पाच रूपयांचा माल आहे. शंभर रूपयांचा माल आहे की, पाच हजाराचा माल आहे आणि हे जर त्या ठेकेदाराकडे दिले नाही. तर खरोखर जो ऑक्ट्रॉय आहे हा चांगला आहे आणि याबाबतीत कोणत्याही व्यापाऱ्याला तकलिफ होणार नाही. अशी महानगरपालिकेने ग्वाही द्यावी. तर उपकरापेक्षा जे लोक त्रस्त आहेत. अजुनही आपल्या मा. आयुक्तांनी कडक कारवाई केलेली नाही. त्यांच्यावर जर केसेस ठोकायला चालू केले, त्यांचे सील ठोकायला चालू केले. नंतर कायद्यामध्ये आम्हीच सांगतो की, आत्ता दोन चार महिने शांततेने घ्या. व्यापारी येतील. परंतु, जर कडक कारवाई करायची झाली. आपले अर्धे सेस होत नाही. जिकडे आपल्याला सहा साडेसहा करोड यायला पाहिजे. तीन करोड रूपये येतात. असे तुमचे म्हणणे आहे. तर आपण जर ५० टक्के पण होत नसतील तर असे आपण किती दिवस चालवायचे? ऑक्ट्रॉय जातो, किती दिवस चालवायचे? आपण जर ही ग्वाही दिली की, हे व्हॅल्युएशन आहे. हे महानगरपालिका करेल किंवा आमचे अधिकारी करतील. तर मला वाटत नाही की, व्यापारी नाराज होतील. व्यापारी बोलतील की, ऑक्ट्रॉय आहे तोच बरा आहे. त्यांचे पैसे भरले निघून गेले. चोपडी वगैरे ठेवायचे काही नाही किंवा दोन नंबरचा धंदा करणाऱ्याला सुद्धा काही त्रास नाही. महापौर साहेब, माझी एक सुचना आहे की, तुम्ही व्यापाऱ्यांना असे आश्वासन जर दिले तर खरोखर व्यापारी बोलतील की, तुम्ही या शर्तीवर ऑक्ट्रॉय चालू केला तर आम्हाला चालेल, अशी माझी धारणा आहे. अशी माझी सुचना आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, गेल्याच्या गेल्या मा. महासभेमध्ये सन्मा. श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांचे अतिशय अभ्यासपुर्ण भाषण या विषयावर झाले होते. माझ्या मते वर्ष - सव्वा वर्षामध्ये या सभागृहात झालेले सर्वात उत्कृष्ट भाषण असेल. पण आज मात्र ते शांत बसलेले आहेत. त्यांना मी विनंती करतो की, त्यांनीही चर्चेमध्ये सहभागी व्हावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. श्री. खतगांवकर साहेब, आपण जी प्रश्नावली दिलेली आहे. त्या प्रश्नावलीमध्ये जो शेवटचा, तेवीस नंबरचा, विषय आहे. त्याच्यामध्ये आपण लिहिले आहे की, उपकराच्या अंमलबजावणीबाबत किंवा वसुलीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल प्रशासनाने महाराष्ट्र शासनाकडे सादर केले आहेत का? केले असल्यास प्रशासन मा. महासभेत वाचन करणार काय? आपण उत्तर दिले, होय. मी माझ्या भाषणामध्ये पण तुम्हाला तेच बोललो की, प्रशासनाने चांगली कामगिरी केली आहे. म्हणजे जे अन्य महापालिका करू शकत नाही. ते तुम्ही अहवालामध्ये सरळ बोलले. तुमचे हे म्हणणे पण त्याच्यामध्ये आले पाहिजे. जसे सन्मा. श्री. पालांडे साहेबांनी विचारले होते. आपण ऑक्ट्रॉय वसुलीचा जो इष्टांक आहे तिथपर्यंत सेसमध्ये आपण पोहोचणार की नाही? आपण बोललात की, पोहोचणार नाही. ही बाब तुम्ही शासनाला कळविली की नाही? आपने बोला की, आपने महाराष्ट्र शासन को अहवाल भेजा है। अहवाल भेजा बरोबर है। आपने अहवाल भेजा है की, हमने बहोत अच्छा काम किया है। अन्य महापालिकाओ की, तुलना मे हमारी महापालिकाने बहोत अच्छा काम किया है। लेकीन जो ३० टक्के का डेफिसिट आएगा उसके बारे मे आपने अभिप्राय भेजा है क्या की, इस महापालिकामे जो ३० टक्के का नुकसान होगा। तो प्रशासन की यह भी जबाबदारी बनती है की, महाराष्ट्र शासन १५ टक्के पहले साल, १० टक्का दुसरे साल, ५ टक्के तिसरे साल देनेवाली है। तो प्रशासन की यह भी जबाबदारी बनती है कीं, महाराष्ट्र शासन को इस महापालिका मे सेस से ७० टक्के ऑक्ट्रॉय के सामने इससे ज्यादा वसुली होनेवाली नही है। आपने यह अहवाल मे लिखा है की नही? ते वाचून दाखवा.

***बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-***

मा. आयुक्त साहेबांनी, दि. ०६/११/२००८ ला उपकराच्या बाबतीत शासनाला जो अहवाल पाठवलेला आहे त्याचे थोडक्यात वाचन मी या ठिकाणी करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. श्री. खतगांवकर साहेब, आपने उस समय प्रशासन को जो बताया की, ३० टक्के चे नुकसान हे शेवटपर्यंत राहील असे अहवालामध्ये कुठेही आलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग वाचा.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर साहेब, आपने जो महिने का छह करोड का आकडा दिया है, उसमे आपने सौ कर्मचारीयोका भत्ता, तनखा, पेट्रोल, डिझेल गिना है की नही? मा. आयुक्त साहब, मै आपसे पुछ रहा हु क्योंकी यह खर्च आपका बढने वाला है। यह खर्च भी गिनना पडेगा क्योंकी अब जब मैने मा. आयुक्त साहब से चर्चा की, इस शहर के अंदर नौ हजार लायसन्स लेने चाहिए। लेकीन सिर्फ ढाई हजार लायसन्स दिये गए। क्योंकी सौ कर्मचारी यहा पर गए हूए है। इसलिए कम से कम तिन से चार करोड की जो वसुली करनी है। वो रूकी हुई है। यह सौ आदमी भविष्य मे लगने वाले है तो छह करोड गिना है उसकी जगह आठ करोड पकडीए।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

डॉ. जैन साहेबानी या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे की, उपकरासाठी जे महानगरपालिकेमध्ये कार्यरत कर्मचारी आहेत. त्यांनाच हे अतिरिक्त कामकाज दिलेले आहे. नव्याने कोणतेही अधिकारी, कर्मचारी उपकरासाठी रिक्रुट केलेले नाहीत. आणि जे कार्यरत कर्मचारी, अधिकारी आहेत त्याच अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून हे कामकाज घेतले जाते. त्यामुळे साहजिकच इतर कामकाजावर या दोन तीन महिन्यात थोडाफार परिणाम झालेला आहे. ते कार्यरत कर्मचारी असल्यामुळे वेगळा जास्तीचा आस्थापना खर्च याच्यात केलेला नाही. मा. आयुक्तांनी जो अहवाल शासनाला दिलेला आहे.....

**एस. ए. खान :-**

विषयपत्रिकेवर जो विषय घेतलेला आहे. प्रकरण क्र. ८६ उपकर वसुलीबाबत आढावा घेणे. आत्ता सगळा आढावा आपण घेतला. सगळे झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते अहवाल वाचा असे म्हणतात.

**एस. ए. खान :-**

आजच्या मिटींगमध्ये आपल्याला आढावाच घ्यायचा होता ना? आढावा झाला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आढावाच चालू आहे.

**एस. ए. खान :-**

आढावा चालू आहे. मग ठराव करता येत नाही.

**भगवती शर्मा :-**

माझी सुचना आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अहवाल वाचण्याची गरज नाही का?

**भगवती शर्मा :-**

नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शासन को ३० टक्के का नुकसान कायम होगा ऐसा प्रशासन ने बोला तो मालूम पडना चाहिए।

**स्नेहा पांडे :-**

मा. आयुक्त साहब, अब तक के डिस्कशन ने ऐसा लग रहा है की, सेस लगाने से ३० टक्के की डेफिसिएट है। लेकीन पुरा ध्यान महानगरपालिका के वसुली पर न रखकर व्यापरीयों के हित को ध्यान मे रखकर डिसीजन लिया जाय ऐसी मेरी सुचना है।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि. ०१/०९/२००८ पासुन जकाती ऐवजी उपकर लागू करण्यात आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची उपकर नोंदणीसाठी एकूण २० गटात विभागणी करण्यात आली असुन या गटासाठी महानगरपालिकेतील वर्ग - २ संवर्गातील अधिकाऱ्यांना गट प्रमुख, म्हणजेच उपकर अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. त्यांना सहाय्यक म्हणून प्रत्येक गटात एक अव्वल कारकून, दोन लिपिक, एक संगणक चालक व एक शिपाई देण्यात आला आहे. उपकर वसुलीसाठी स्वतंत्र असे ४००० स्क्वे. फुट क्षेत्रफळाचे कार्यालय उघडण्यात आले असून प्रत्येक गटासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व गटासाठी संगणक देखील देण्यात येत आहेत. नवी मुंबई महापालिकेची उपकरासाठी संगणकीय आज्ञाप्रणाली घेण्यात येत आहे. सुरूवातीपासुनच सदर आज्ञाप्रणालीचा वापर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शहरातील व्यापाऱ्यांना उपकराची रक्कम भरणे शक्य व्हावे म्हणून एकूण दहा राष्ट्रीयकृत बँकामध्ये

उपकर भरण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. माहे सप्टेंबर २००८ मध्ये एकूण १६,९९५ व्यापारी आस्थापनांना उपकर नोंदणीसाठी फॉर्म वाटण्यात आले होते. त्यापैकी त्यावेळेस ७,५१८ व्यापाऱ्यांची नोंदणी पुर्ण करण्यात आली असून उर्वरित व्यापाऱ्यांची नोंदणी करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पुढील काही महिन्यात हे काम पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मिरा भाईंदर शहरात दि. ०१/०९/२००८ पुवी प्रतिमाह रूपये सहा कोटी एकाहत्तर लक्ष जकातीपोटी वसुल करण्यात येत होते. माहे सप्टेंबर २००८ मधील शहरात आवक झालेल्या मालाचा उपकर दि. १०/१०/२००८ पर्यंत सर्व व्यापाऱ्यांनी भरणे अपेक्षित होते. तथापी, उपकर लागू झाल्यानंतर पहिलाच महिना असल्यामुळे व्यापाऱ्यांनी माहे सप्टेंबर २००८ चा उपकर शहरातील ठरविलेल्या दहा बँकामध्ये भरण्याची प्रक्रीया दि. १०/१०/२००८ नंतरदेखील चालू ठेवलेली आहे. दि. ३१/१०/२००८ पर्यंत रूपये ३ कोटी १ लक्ष एवढी रक्कम उपकरापोटी वसुल झालेली आहे. माहे सप्टेंबर २००८ महिन्याचा उपकर ०१/११/२००८ नंतर देखील व्यापाऱ्यांकडून भरण्याची कार्यवाही चालू आहे. म्हणजे एक महिन्याचा कालावधी झाला होता. त्यावेळेस तीन कोटी उत्पन्न झालेले आहे हे लेखी कळवलेले आहे. आणि जकातीपासुन प्रतिमाह ६ कोटी ७१ लक्ष येणे अपेक्षित आहे. म्हणजे ५० टक्के उत्पन्न झालेले आहे. हे लेखी कळवलेले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा प्रश्न काय आहे. आत्ता श्री. पालांडे साहेबांनी विचारले २० टक्के नुकसान श्युअर पडेल असे तुम्ही सांगितले म्हणजे ऑक्ट्रॉयचा जो इष्टांक आहे. तिथे आपण पोहचू शकत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते कीती पोहचू शकत नाही. हे आज भाकीत करणे कोणालाही शक्य नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा श्री. पालांडे साहेबांनी विचारले तेव्हा तुम्ही बोललात की, आपण शेवटपर्यंत ऑक्ट्रॉयच्या इष्टांकापर्यंत जाउ शकत नाही. आणि आत्ता तुम्ही अहवालामध्ये फक्त आत्ता वसुलीमध्ये एवढा तोटा आहे असे पाठवलेले आहे. तुमची ही भुमिका म्हणजे महापालिका कर्मचारी कमी आहेत. स्टाफ नाही किंवा असे म्हणून ही जी सेस उपकराची समस्या आहे ती बहूतेक महापालिकेला लाभदायक नाही असा उल्लेख तुम्ही कुठेही केलेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

६ कोटी ७१ लाख वसुल होण्याच्या ठिकाणी तीन कोटी वसुल झाले हा उल्लेख आहे म्हणजे काय आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मग पुढच्या महिन्यात किती वसुली झालेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तेच सांगतो आज तारखेला तीन महिन्यापोटी ९ कोटी ०५ लाख वसुली झालेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे एव्हरेज काय झाला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एव्हरेज तीन कोटी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि सहा कोटी सत्तर लाख. तीन कोटी सत्तर लाखाचा डेफिसीट आहे. ५० टक्के डेफिसीट आहे. आपण शासनाला पण.....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. श्री. ओमप्रकाश अग्रवाल साहेब, तुम्ही शासनाला जो अहवाल पाठवलेला आहे. त्याच्यात वस्तुस्थिती आहे की, नाही हा मुद्दा जो मांडला होता. त्या अनुषंगाने मी आपल्याला हे वाचून दाखवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका महिन्यामध्ये आत्ता ही ३० टक्के ते ४० टक्के डेफिसीट आहे. ही डेफिसीट आत्ताच्या अंदाजाने कायम राहणार काय की, प्रशासन कार्यक्षम आहे. तो इष्टांक पुर्ण करेल?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मुद्दा समजुन घ्या. उपकराची वसुली ही त्या महिन्यापुरतीच मर्यादीत नाही. उपकराची वसुली त्या महिन्यामध्ये पुढच्या दहा तारखेपर्यंत व्यापाऱ्यांनी भरणे अपेक्षित आहे. व्यापाऱ्यांनी जर भरलेच नाहीत तर त्याला पर्याय आहेत आणि त्या पर्यायाचे कामकाज पुढची असेसमेंट होईपर्यंत चालू राहणार. एकदा आम्ही त्यांना असेसमेंटला बोलवू त्यावेळेस मागच्या सर्व महिन्यांचे त्यांचे डिक्लेरेशन आम्ही घेणार, त्यांचे बँक स्टेटमेंट तपासणार, त्यांचे डेबिटर, क्रेडीटर तपासणार, त्यांचे स्टॉक बुक तपासणार. मग समजा त्यांनी एक्स रक्कम भरली आणि त्यांचे व्हॅल्युएशन जर जास्तीचे होत असेल तर त्यांना जास्तीची मागणी करणार. म्हणजे ही एक प्रोसेस आहे. त्यामुळे आज किती उत्पन्न होईल किंवा किती घट होईल ते आज सांगता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आत्ता महाराष्ट्र शासनाने प्रत्येक महापालिकेला स्वतःच्या निर्णयात जायला सांगितलेले आहे. उद्या या महापालिकेने निर्णय घेतला की, आम्हाला ऑक्ट्रॉयला जायचे आहे आणि ऑक्ट्रॉयवर जाताना टेंडरमार्फत ऑक्ट्रॉय अपेक्षित आहे. उद्या आपण सेसवर कायम राहिलो आणि तिकडे गेलो नाही तर त्याला जबाबदार कोण आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्या धोरणाची अंमलबजावणी करताना वस्तुस्थितीत एखाद्याची चुक असेल तर त्याला जबाबदारी करता येते. धोरणामध्येच काही प्रॉब्लेम असतील, ईम्प्लीमेंटेशनला इश्यु असतील तर त्याला तुम्ही जबाबदारी कशी निश्चित करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जबाबदारी प्रशासनाची राहिल ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

असे म्हणू शकत नाही.

**अनिल सावंत :-**

श्री. खतगांवकर साहेब, मी प्रश्न केला होता की, अजुनपर्यंत रेव्हेन्यु एक्स्पेन्डीचर किती झाला? त्याचे काही उत्तर आले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी त्याचा खुलासा केलेला आहे. या उपकरासाठी नव्याने कोणतेही अधिकारी, कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत. म्हणून याच्यावर एक्स्ट्रा एक्स्पेन्डीचर केलेला नाही. जे कर्मचारी कार्यान्वीत आहेत. त्यांचाच वापर केलेला आहे. आणि एस्टाब्लिशमेंट म्हणून जो स्टेशनरी खर्च आहे. तो साधारणतः पाच ते सहा लाखाचा आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहेब, मैने अभी जो पुछा था, आपने छह करोड का फिगर बताया है, आप इसको सात करोड कर लिजिए या यह बताईए की, भविष्य मे सेस वसुल करने के लिए आपका जो ॲडमिनिस्ट्रेशन बनेगा उसका कुल कीतना खर्च पडेगा? क्योंकी आपने कुल इन्कम कितना चाहिए गिना है। पर कितना खर्च आएगा यह पकडा नही है। वह खर्चा आपको वसुली मे पकडना पडेगा। जरा वह बताईए की, कितना खर्चा करते है की, साल का कम से कम दस करोड का खर्चा एक्स्ट्रा पडेगा।

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

उपकरामध्ये किंवा जकातमध्ये आस्थापना खर्च हा १५ टक्के पेक्षा खाली आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. आयुक्त साहेब, मेरी एक सुचना है। मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. ०१/९/२००८ पासून जकात ऐवजी उपकर लागू केलेला आहे. महानगरपालिकेचे सन २००७-०८ मध्ये ७३०९.८६ लाख मागणी होती. सन २००८-०९ ह्या आर्थिक वर्षात १० टक्के वाढ विचारात घेतली असती तर देकार ८०.८४ लक्ष इतका राहिला असता म्हणजेस पालिकेस प्रती माह जकातीचे उत्पन्न ६७१ लक्ष उत्पन्न मिळाले असते. म्हणजेच दोन महिन्या करिता जकातीचे उत्पन्न १३४२ लक्ष मिळाले असते. तथापी महानगरपालिकेने दि. ०१/११/२००८ पासून महानगरपालिका क्षेत्रात उपकर लागू केला. उपकराने दोन महिन्याची वसुली ६५०.८६ लक्ष इतकी झालेली आहे. म्हणजेच महापालिकेस जवळपास ५९२ लक्ष इतकी तुट दोन महिन्यात आली आहे. सदरची तुट कालावधीत भरुन निघणेबाबत प्रशासन देखील साशंक आहे. उपकरा ऐवजी जकात कर सुरु करावी असे लेखी निवेदन महानगरपालिकेस दिलेले आहे. तसेच, व्यापाऱ्यांनी दि. १०/१२/२००८ रोजी व्यापार बंद ठेवून महानगरपालिकेवर मोर्चा आणला होता. व्यापाऱ्यांच्या बंदमुळे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवू शकतो. वरील वस्तुस्थिती विचारात घेता आजची महासभा या निर्णयाप्रत आलेली आहे की, महानगरपालिकेची होणारी वित्तीय तुट भरुन काढण्यासाठी उपकराच्या वसुलीच्या कामासाठी नेमलेले कर्मचारी वर्गामुळे वाढणारा आस्थापनेचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने तसेच महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसानामुळे महानगरपालिकेच्या विकास कामावर, नियमित कामकाजावर विपरीत परिणाम होउ नये याकरिता उपकराऐवती जकात कर लागू करण्यात यावा. जकात कर वसुल करण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीन जकात कर लागू करण्याच्या विषयासाठी विशेष महासभा तातडीने बोलवण्यात यावी. जकात कर सुरु करण्यासाठी बोलवण्यात येणारी महासभा होईपर्यंत मा. आयुक्त सो. यांनी या सुचनेनुसार जकात कर सुरु करण्यासाठी तयारी करुन आवश्यकता भासल्यास शासनाच्या मंजूरीसाठी आजच प्रस्ताव तयार करुन शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, जेव्हा आपण लोक विषयांवर मा. महासभा बोलवता. तुम्हाला योग्य वाटेल तर मा. महासभा बोलवा. खास सभा काय चार दिवसानंतर सभा लावा. त्याच्यात काही बिघडत नाही. तुम्ही असा ठराव मांडून एकतर तुम्ही आढावा घेणेसाठी सभा बोलवली आहे.

**मा. महापौर :-**

ठराव नाही. सुचना आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सुचना आलेली आहे. या १००-१५० व्यापाऱ्यांसाठी यांनी फासाचा दोर गळ्यात ओढून घेतला आहे आणि दहा लाख जनतेला आपण वेठीस धरणार आहोत. ज्या व्यापाऱ्यांची जकात पाटेवाले त्या नाक्यावरच भरतात, जे इथे व्यापार करतात त्यांच्यापासुन सेसचेही उत्पन्न नाही. आणि जकात आल्यानंतर त्यांना जकातही भरावी लागणार नाही. मात्र या शहरातील लोकांना जकातीच्या गर्तेत घालण्याचा घाट घालण्याचा जो कार्यक्रम चालू आहे तो चांगला नाही. तुम्हाला उत्तर द्यावे लागेल. आमदारकीची तयारी करणारे बरेच लोक या शहरामध्ये आहेत त्यांना याचा जबाब द्यावा लागणार आहे. चुकीचे काही चाललेले नाही. सेसची व्यवस्थित वसुली होते. याच्यातुन सामान्य नागरिकांना कुठेच त्रास होत नाही. पण जे करतात त्यांना जनतेसमोर उघडे केल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, ठराव नसेल तर सुचना होउ शकते का? सुचना ठरावावर होते.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आम्ही १००-१५० लोकांकरिता पुर्ण शहरवासीयांना त्रास देणार आहोत. मा. महापौर साहेब, आमचा या सुचनेला विरोध आहे.

**मा. महापौर :-**

दोन सुचना आलेल्या आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

सुचनेवर मतदान होत नाही.

**मा. महापौर :-**

दोन सुचना आलेल्या आहेत. दोन्हीही सुचना फेटाळत आहे आणि विशेष सभा लावण्यात यावी.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, तुमचा पुढचा विषय आहे, शासनाकडील पत्रे.

**चंद्रकांत वैती :-**

शासनाकडून पत्रे आलेली आहेत. ती वाचा.

(सभागृहामध्ये सदर विषयाचा आढावा घेण्यात आला.)

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**नगरसचिव :-**

सभा संपलेली आहे असे मा. महापौरांनी जाहीर केलेले आहे. सर्वांनी राष्ट्रगितासाठी उभे रहावे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ४३ :- सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी मा. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरित कालावधीसाठी नेमणूक करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्य सौ. प्रभात प्रकाश [illegible] यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दि. ०२/१२/२००९ रोजी दिलेला आहे. स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम २३ अन्वये एका सदस्याची उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक करावयाची आहे.

नगरविकास खात्याकडील दि. २०/१०/२००८ च्या पत्रान्वये ज्या पक्षाचा सदस्य निवृत्त झाला असेल, राजीनामा दिला असेल तर त्याच पक्षाचा सदस्य नव्याने नेमणूक करता येईल असे कळविले होते व त्यानुसारच आजपर्यंतच्या नेमणूका झालेल्या आहेत.

तरी सौ. प्रभात प्रकाश पाटील ह्यांचा राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागेवर उर्वरीत कालावधीसाठी नविन सदस्य नेमणूकीचा निर्णय घेणेस विनंती.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१०

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ४४ :- परिवहन समितीवर नगरसेवक किंवा बाहेरुन सदस्य घेणेबाबत धोरण ठरविणेबाबत विचार विनिमय करणे.

[illegible] भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवरील [illegible] सदस्य माहे फेब्रुवारी [illegible] च्या पहिल्या तारखेस निवृत्त झाले आहेत. निवृत्त [illegible] सदस्यांच्या जागी प्रशासनाने नेमणूक कोणती पध्दत अवलंबावी याबाबत नगरविकास विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते. क्र. मिभामनपा/११०९/२५९/नवि-२८ नगरविकास विभाग [illegible] जानेवारी २०१० नुसार मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५१७५/२००७ प्रकरणी दि. २५/[illegible]/२००७ रोजी दिलेला निर्णय व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५ मधील तरतुदींकडे लक्ष वेधले आहे.

परिवहन समितीवर पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांमधून काही सदस्य नियुक्त / नेमणूक करावयाचे असतील तरच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) मधील तरतुदी लागू होतील. तथापी महानगरपालिकेने रिक्त पदांवरील नियुक्तीसाठी पालिका सदस्य म्हणून बाहेरुन सदस्यांची नियुक्ती करावयाचे ठरविल्यास कलम ३१(अ) च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता महानगरपालिकेच्या परिवहन समितीवर नगरसेवक किंवा बाहेरुन सदस्य नेमणूक करावयाचे असल्यास त्याबाबत महासभेने धोरण ठरविणे आवश्यक आहे. त्यानुसार विचार विनिमय होवून धोरण ठरविणेबाबत शिफारस करीत आहे.

(सही)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ११/०२/२०१०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ४५ :-** राज्य ग्रंथालय परिषदेवर २ सदस्य नामनियुक्त करणे बाबत.

राज्य ग्रंथालय परिषदेवर महानगरपालिका, नगरपालिका जिल्हा परिषद प्रतिनिधींची शासनातर्फे नियुक्ती करण्याची तरतुद महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये १९६७ मध्ये आहे

त्या तरतुदीनुसार प्र. सहाय्यक ग्रंथालय संचालक, मुंबई विभाग कोकण भवन ह्यांचेकडील दि. २२/१२/२००९ च्या पत्रानुसार ग्रंथालय चळवळीची आस्था असलेल्या दोन सन्माननीय सदस्यांची नावे देण्याची मागणी केलेली आहे.

तरी ह्या विषयी आवड असलेल्या दोन सदस्यांची नावे मा. महासभेने निर्णय घेउन देण्याची शिफारस करीत आहे.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि. ११/०२/२०१०

// गोषवारा //

प्रकरण क्र. ( ४९ ) मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मे. रिलायन्स एनर्जी लि. कंपनी मार्फत देखभाल व दुरूस्ती करण्यात येत असलेले स्ट्रीट लाईट पोल मनपाच्या ताब्यात घेवून खाजगी ठेकेदारास वार्षिक ठेकापध्दतीने देखभाल व दुरूस्तीसाठी देणे व टाटा पावर कंपनीकडून वीज पूरवठा घेणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीत मुख्यत्वे रिलायन्स एनर्जी मार्फत वीजपूरवठा करण्यात येतो. महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तांना देखिल रिलायन्स मार्फत वीजपूरवठा करण्यात येतो. मुंबई उपनगराना रिलायन्स एनर्जी मार्फत वीज पूरवठा करण्यात येत असल्याने त्यांच्यामार्फत सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने स्ट्रीट लाईट बसविण्यात येत असल्याने त्याच धर्तीवर ग्रामपंचायत काळापासून मिरा-भाईदर शहरात देखिल रिलायन्स एनर्जी मार्फत स्वखर्चाने सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात येतात. मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी रिलायन्स एनर्जी लि. कंपनीचे एकूण १०४६ इलेक्ट्रीक पोल असून, सदर पोलचे विदयुत पुरवठा, देखभाल दुरूस्तीचे काम रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीकडून केले जात आहे. सदर देखभाल दुरूस्ती व विदयुत पुरवठा इ. च्या देयकापोटी महानगरपालिकेकडून दरमहा रू. ८० ते ८५ लाख पर्यंतचे देयक अदा करण्यात येते. सदर देयकामध्ये विदयुत बिला सोबत इतर आकार आकारले जातात. (उदा. Fixed demand charges, Energy charges, Reliability charges, fuel adjustment charges, Govt Service Tax, Tax on sale of Electricity) अशा प्रकारे विविध प्रकारचे आकार रिलायन्स एनर्जी कंपनी मनपाकडून विदयुत देयकाच्या माध्यमातून वसुल करते. महानगरपालिकेस स्ट्रीट लाईट देखभाल व दुरूस्ती या शिर्षाखाली एकूण रू. १० कोटी सरासरी वार्षिक खर्च होतो.

ठाणे जिल्हातील इतर महानगरपालिकांनी स्ट्रीट लाईट देखभाल व दुरूस्तीवरील खर्चाचे ओघे कमी करण्यासाठी एम.एस.ई.बी व सरकार अंगीकृत कंपन्याकडून स्ट्रीट लाईट

देखभाल / दुरूस्ती करण्याचे काम काढून घेउन सदरची कामे खाजगी शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून करून घेतले जात आहे. त्यामुळे त्या महानगरपालिकांची स्ट्रीट लाईट देखभाल व दुरूस्तीवरील वायफळ जाणाऱ्या खर्चात बचत झालेली आहे. स्ट्रीट लाईटचे वार्षिक देखभाल व दुरूस्तीचे काम खाजगी ठेकेदारांकडून करून घेतले जात आहे. त्यामुळे मनपाची मोठी आर्थिक बचत कशी झालेली आहे ते खालील उदाहरणावरून दिसून येईल.

| अ.क्र. | मनपाचे नांव | वार्षिक देखभाल व दुरूस्तीचा प्रतिपोल खर्च रूपये. | वार्षिक विदयुत वापरावर येणारा प्रति पोल खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिका | रू. ९८०/- | रू. १७६८/- | रू. २७४८/- |
| २ | नवी मुंबई महानगपालिका | रू. १०२०/- | रू. १३०४/- | रू. २३२४/- |
| ३ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका | रू. १२४०/- | रू. २१७८/- | रू. ३४१८/- |
| ४ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका | रू. १३५०/- | रू. ६७०/- | रू. २०२०/- |

मात्र सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिका सन २००९ – १० या आर्थिक वर्षात स्ट्रीट लाईट देखभाल / दुरूस्ती व इलेक्ट्रीक बील करीता मे. रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीस एकूण ९०४६ पोलवर खालीलप्रमाणे खर्च होत आहे.

- दरमहा सरासरी रू. ३७.०० लक्ष एवढी रक्कम देखभाल व दुरूस्तीवर खर्च होत आहे. म्हणजेच सरासरी रू. ४१०/- प्रतिपोल मासिक खर्च होतो.
- दरमहा सरासरी रू. ४८.५४ लक्ष एवढी रक्कम इलेक्ट्रीक बीलावर खर्च होत आहे. म्हणजेच सरासरी रू. ५३६/- प्रतिपोल मासिक खर्च होतो.
- प्रति पोलवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून दुरूस्ती व इलेक्ट्रीक बीलासह एकूण रू. ९४६/- खर्च प्रति महिना होत आहे.
- त्यानुसार प्रति पोलवर मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून वार्षिक देखभाल दुरूस्ती व इलेक्ट्रीक बीलासह एकूण रू. ११३५२/- एवढा खर्च होत आहे.

मिरा-भाईदर महानगरपालिकेस ठाणे जिल्हातील इतर महानगरपालिकेप्रमाणे खाजगी मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरूस्ती करण्याचे काम प्रभावीपणे राबवून आर्थिक बचत करावयाची गरज आहे. रु.५ साधारणपणे वर्षाच्या शेवटी ४ ते ५ कोटी रकमेची महानगरपालिकेची बचत होवून नागरीकांच्या हिताच्या इतर सेवा सुविधा पुरविण्यासाठी निधी वापरणे शक्य होणार आहे. स्ट्रीट लाईटचे पोल मनपाच्या मालकीचे झाल्यानंतर शहरांतील मोक्याचे व मुख्य रस्त्यावरील इलेक्ट्रीक पोलवर जाहिरातीचे बोर्ड लावून त्यापासून मनपास मोठयाप्रमाणात जाहिरातीपासून उत्पन्न मिळू शकणार आहे.

याकरीता रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीच्या मालकीचे दि. ३०/०६/२००९ अखेर पर्यंत एकूण ९०४६ इलेक्ट्रीक पोल असून सदर पोलची किंमत खालीलप्रमाणे असल्याबाबतची खात्रीशीर माहिती प्राप्त झालेली आहे.

As on 30/06/2009 Total Poles – 9046/-

As on 30/06/2009 Gross Value Rs. 15,19,58,590/-

As on 30/06/2009 After Depreciation Value of Total 9046 Poles Rs. 11,70,56,870/-

सदरची रक्कम रू. ११,७०,५६,८७०/- रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीस एकरकमी दयावी लागणार आहे. त्यानंतर इलेक्ट्रीक पोलची मालकी हक्क मनपाकडे येईल. तद्नंतर स्ट्रीट लाईटसाठा विदयुत पुरवठा टाटा विदयुत कंपनीकडून घेतल्यास विदयुत देयकात देखिल बचत होईल व महानगरपालिकेस हिताचे ठरेल. तसेच स्ट्रीट लाईटची देखभाल व दुरूस्ती महानगरपालिकेच्या उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून करून घेणे शक्य होणार नसल्याने यासाठी खाजगी ठेकेदाराकडून देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी दिल्यास इतर महानगरपालिके प्रमाणेच देखभाल व दुरूस्तीवर खर्च होईल. तथापी यापुढे नव्याने बसवावयाच्या स्ट्रीट लाईट पोलचा संपूर्ण खर्च मिरा-भाईदर महानगरपालिकेस करावा लागेल व त्याकरीता पुढील अर्थसंकल्पात दरवर्षी सुमारे ३०० पोल करीता अंदाजे १.०० कोटी एवढी तरतूद ठेवावी लागेल. तसेच रिलायन्स एनर्जीचे सर्व प्रलंबित देयके सुध्दा प्रदान करावी लागतील.

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या सर्व मालमत्ताना देखिल टाटा कंपनीकडून वीजपूरवठा करून घेतल्यास महानगरपालिकेच्या मासिक देयकात बचत होवु शकेल.

वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होवुन निर्णय घेण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

2009-10/DKV/DK/SG 49

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि. ११/०२/२०१०

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ४९ -

विषय :- उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार शिफ़ारशींची अमंलबजावणी करणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा विरोधात स्थानिक नागरिकांनी दि.१३/०९/०९ रोजी जनआंदोलन केले होते. जन आंदोलना विरोधात महापालिकेने मा. उच्च न्यायालयात दि. २३/०९/०९ रोजी सिव्हील ॲप्लीकेशन क्र ९८/२००९ अन्वये मा. उच्च न्यायालयात जनहितार्थ याचिका क्र ३६/०७ मध्ये अर्ज दाखल केला होता. दि. २४/०९/०९ रोजी मा. उच्च न्यायालयाने जनहितार्ध याचिकेची सुनावणी करुन पोलिस संरक्षणात घनकचरा प्रकल्प ठिकाणी कचरा वाहून नेणारी वाहने नेणेबाबतचे आदेश दिले होते. दि. ०५/१०/०९ रोजी झालेल्या बैठकीत मा. सचिव नगरविकास विभाग यांनी घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची पाहणी करुन प्रकल्प तपासणीचे आदेश दिले.

शासनाने नियुक्त केलेल्या समितीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची पाहणी करुन दि. १४/१०/०९ रोजी मा. सचिव, नगरविकास यांना अहवाल सादर केला होता. दि.०९/१०/०९ रोजी शासनाने क्र.मिभाम –११०९/१६२०/नवि-२८ पत्रान्वये शासनाने नियुक्त केलेल्या समितीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प तात्काळ सुरु करण्यासाठी सुचविलेल्या सुचना व शिफ़ारशीवर कार्यवाही करण्याबाबत महापालिकेस कळविले होते.

शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या सुचना व शिफ़ारशीनुसार प्रकल्पाच्या क्षेत्राभोवती असणा-या सुरक्षा भिंतीच्या आतल्या परिसरात पर्जन्यवाहिनी (Storm Water Drain) बांधणे, सुरक्षा भिंत (Compound Wall) बांधणे याबाबत कळविलेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात आलेले असून ४७५ मीटर RCC Retaining Wall Leachate Well व गटाराकरिता रु. ७,२७,५८,५४६/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तथापि सदर खर्च जास्त असल्याने UCR Wall (दगडी भिंत) व गटार घेतल्यास ४७५ मीटर लांबीकरिता फ़क्त रु. १,१४,९२,३६३/- अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

प्रकल्पात व प्रकल्प परिसरात मोठ्या प्रमाणावर समितीच्या शिफ़ारशीनुसार सुवासिक व उंच वाढीच्या झाडांची लागवडीचे काम सुरु झालेले आहे.

शासनाने दिलेल्या आदेशानुसार घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पुनःश्च सुरु करणे प्रकल्पात व प्रकल्प परिसरात वरीलप्रमाणे शिफ़ारशींची अमंलबजावणी करणेकरिता येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेस शिफ़ारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\GHANKACHAR PRKALPA\GHOSHWARA\SADAR 15-12-09.doc

(१)

# मिरा भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दिनांक ११/०२/२०१०

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ५० :-

**विषय :- केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत येणाऱ्या बस मार्गस्थ करणेच्या धोरणाबाबत....**

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना परिवहन सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता ५० बस खरेदि करण्याचे प्रयोजन केले आहे व त्या प्रस्तावास केंद्र शासन व राज्य शासन यांनी मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने ५० बस खरेदि (५० चेसीज खरेदि करणे व ५० बस चेसीजवर बॉडि बिल्डिंग करणेच्या दोन स्वतंत्र्य कामाकरिता) करण्याच्या दृष्टीकोनातुन महानगरपालिकेने राज्य स्तरिय दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन संबधितांकडून देकार मागवण्यात आले होते. प्राप्त झालेल्या देकारांबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाहि पूर्ण करुन प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरी करिता ठेवला असता ठराव क्रमांक :- ७६, दि. १७/१२/२००९ अन्वये मा. स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. सदर प्रकल्पाकरिता एकूण खर्चाच्या ३५% व १५% रक्कम अनुक्रमे केंद्र शासन व राज्य शासन अनुदानाच्या स्वरुपात देणार असुन उर्वरित ५०% रक्कम महानगरपालिकेस उभारावयाची आहे. केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत घ्यावयाच्या बस पी.पी.पी. (Public Private Partnership) तत्वावर मार्गस्थ करण्याचे शासनाने निश्चित केले आहे व त्यामुळे प्रकल्पाबाबत महानगरपालिकेवर कोणत्याहि स्वरुपाचा आर्थिक भार पडणार नाहि. याबाबत माहनगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रकल्पाअंतर्गत घ्यावयाच्या ५० बस पी.पी.पी. तत्वावर मार्गस्थ करावयाच्या प्रस्तावाकरिता तीन पध्दती आहेत.... १) ५०% गुंतवणूक, २) ७५% गुंतवणूक व ३) १००% गुंतवणूक. याबाबत विस्तृत :- प्रकल्पा करिता येणाऱ्या खर्चापैकी मा. महासभेने मंजूरी दिलेल्या धोरणत्मक निर्णयाच्या अनुषंगाने वरिल प्रमाणातील गुंतवणूकीची रक्कम खाजगी संस्थांकडून महानगरपालिकेने उभारावयाची व त्या खाजगी संस्थांनी मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयास अधीन राहून निश्चित केलेल्या दराने महानगरपालिकेस रॉयल्टी द्यावयाची. सदर पी.पी.पी. तत्वावर बस सुरु करणेकरिता चालक, वाहक, तिकिट तपासनीस, कार्यालयीन कर्मचारी, देखभाल-दुरुस्ती, इंधन, वंगण व अन्य LIABILITY संबधीत

६...

कंत्राटदारावरच राहिल्याने मिरा भाईदर महानगरपालिकेच आर्थिक हित जोपासले जाईल. प्रकल्पात कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांना अदा करावयाचे किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी, वैद्यकिय सुविधा, बोनस, गणवेष इत्यादि बाबतचे दायीत्व कंत्राटदारावर राहिल्याने त्याबाबत भविष्यात उद्‌भवू शकरणाऱ्या समस्यांना महानगरपालिकेस सामोरे जावे लागणार नाहि. सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर सुरु केल्यास महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंत्राटदार गुंतवणुकीच्या माध्यमातुन महानगरपालिकेस देईल व त्यामुळे कोणताहि आर्थिक भार न सोसता महानगरपालिकेस "रॉयल्टी" च्या रुपाने उत्पन्न प्राप्त होणार आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत बस खरेदि करण्याच्या प्रकल्पास खालिलप्रमाणे खर्च होणार आहे....

| अ. क्र. | बसची संख्या | प्रकल्पाचा खर्च | | | | प्रकल्पाकरिता केंद्र शासनाने अंदाजलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चेसीज | बॉडी बिल्डिंग | एकूण खर्च | ५० बस करिता | |
| १. | ५० | रु. १२,८७,५७६/- प्रती चेसीज | रु. ६,९०,०००/- प्रती बस | रु. १९,७७,५७६/- प्रती बस | रु. ९,८८,७८,८००/- प्रती बस | रु. ११,००,००,०००/- |

प्रकल्पाच्या वरिल खर्चाची रक्कम उभारणेबाबत.....

| अ. क्र. | प्रकल्पाचा एकूण खर्च | केंद्र शासन अनुदान ३५% | राज्य शासन अनुदान ३५% | मनपास सुरुवातीस उभारावयाची रक्कम ५०% | पी.पी.पी. च्या माध्यमातुन उभारावयाची रक्कम (१००% गुंतवणूक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | रु. ९,८८,७८,८००/- ५० बस करिता | रु. ३,४६,०७,५८०/- | रु. १,४८,३१,८२०/- | रु. ४,९४,३९,४००/- | रु. ४,९४,३९,४००/- |

५० बस पी.पी.पी. तत्वावर चालवणेकामी कंत्राटधारकाने महानगरपालिकेने सुरुवातीस उभारलेल्या रक्कमेच्या ५०%, ७५% व १००% इतकी रक्कम महानगरपालिके सोबतच्या भागीदारीत गुंतवणूक करुन महानगरपालिकेच्या ५० बस मार्गस्थ करुन त्यापोटि रॉयल्टीची किती रक्कम घेणे बाबत धोरण ठरवून त्याबाबत राज्यस्तरिय दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१७/०२/२०१०

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- ५१

विषय :- **मिरारोड येथील रूग्णालय इमारतीत रक्तपेढी चालविण्यासाठी अशासकीय संस्थांना चालविण्यास देणेकरिता विचार विनिमय होणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे. सदर इमारतीत तळमजल्यावर रक्तपेढी सुरू करणे प्रस्तावित आहे. रक्तपेढीतील अंतर्गत बांधकाम जवळपास पूर्ण झालेले आहे. तसेच रक्तपेढी चालविण्यासाठी आवश्यक १) Central Drugs Standard Control Organization Govt. of India 2) State Blood Transfusion Council Govt. of Maharashtra यांची परवानगी घेण्यात आलेली अहे.

सदर रक्तपेढी महानगरपालिकेने चालविल्यास आवश्यक अधिकारी व कर्मचारी कंत्राटी पध्दतीने घेणेकरिता अंदाजे रू. १,५०,०००/- ते २,००,०००/- प्रति महा खर्च अपेक्षित आहे. तसेच उपकरणे व साहित्य खरेदी करणेकरिता अंदाजे रू. ९०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. यासाठी कुठलीही तरतुद अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात करण्यात आलेली नाही. सदर रक्तपेढी रूग्णालयाच्या सोबत चालू करणे गरजेचे आहे. ही रक्तपेढी अनुभवी अशासकीय संस्थेस योग्य त्या अटीशर्तीनुसार चालविण्यास दिल्यास आर्थिक बचत होईल. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस होईल.

तरी अशासकीय संस्थेस रक्तपेढी सुरू करणेकरिता आवश्यक जागा, अखंडीत विज जोडणी, पाणी जोडणी, दुरध्वनी जोडणी, फर्निचर (टेबल, खुर्ची रॅक्स) वातानुकुलन यंत्रे इत्यादी महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येऊन व उर्वरीत रक्तपेढीसाठी आवश्यक अधिकारी, कर्मचारी वर्ग, उपकरणे व साहित्य, संगणक, विज, दुरध्वनी यांचे मासिक देयक, द्रावणे तपासणी किट्स इतर आवश्यक सर्व साहित्य व परवाने मंजूरी अशासकीय संस्थेने पुरवठा करून रक्तपेढी सुरू केल्यास महापालिकेची आर्थिक बचत होईल.

तरी सदर रक्तपेढी महानगरपालिकेने चालवावी अथवा अशासकीय संस्थेस चालविण्यास द्यावी याबाबत चर्चा करून निर्णय घेणेस मा. महासभेस शिफारस असे.

उपायुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Maha 2009

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१७/०२/२०१०

## // गोषवारा //

**प्रकरण क्र (७२) – मिरा भाईंदर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावलीत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज व सार्वजनिक सोई सुविधा करिता वापर करण्यात येणा-या इमारतींना वाढीव चटईक्षेत्र मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/नपा/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि.१५/०७/९७ व दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून एकूण क्षेत्र ७९४०.५६ हे. आहे. त्यापैकी २१३४.७९ हे. क्षेत्र हे मंजूर विकास योजना प्रमाणे विकसनशील (Developable) क्षेत्र आहे.

सदर विकसनशील क्षेत्रापैकी बहूतांश भाग हा सि.आर.झेड. ने तसेच सॉल्ट विभागाच्या जमीनीनी बाधीत होत आहेत. तसेच मंजूर विकास योजनेत एकूण ३८६ आरक्षणे असून त्यापैकी १५६ आरक्षणे सि.आर.झेड. ने बाधीत होत आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका ही मुंबई व ठाणे महानगरपालिकेच्या लगत असल्याने शहराचा विकास झपाट्याने होत आहे. लोकसंख्या वाढीचा वेग शहराचा दशकातील २९७% असा आहे. आजमितीस शहराची लोकसंख्या सुमारे १० लक्ष इतकी आहे. महानगरपालिका क्षेत्रात लोकसंख्येच्या मानाने अद्यावत हॉस्पीटल, शाळा, कॉलेज नाहीत. तसेच विकसनशील क्षेत्र सि.आर.झेड. सॉल्ट विभागाने प्रभावित असल्यामुळे फक्त २५% इतकेच क्षेत्रावर विकास होवू शकतो. शहरात हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधा विकसीत करण्याकरिता आवश्यकते प्रमाणे जमीन उपलब्ध नाही. तरी हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधासाठी लागणा-या इमारती बांधणेकरिता वाढीव म्हणजे ३.० चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध झाल्यास मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना वाढीव लोकसंख्येप्रमाणे जास्त प्रमाणात सोईसुविधा उपलब्ध होवू शकतील. सदर विषयाच्या अनुषंगाने हॉस्पीटल, शाळा, कॉलेज, सार्वजनिक सोईसुविधा करिता इमारतींना ३.० चटईक्षेत्र निर्देशांक मिळावा असा विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकरिता शासनाच्या मंजूरीकरिता सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**